कॉंटिनेंटल् प्रकाशन......६९ वें

# चिरस्मृति

संग्राहक

त्र्यं. र. देवगिरीकर

३० जानेवारी १९४९

किंमत अडीच रुपये

प्रकाशक
अ. अं. कुलकर्णी
कॉंटिनेंटल प्रकाशन,
१९६/१९ सदाशिव, पुणे २

सर्व हक्क संग्राहकाकडे

चित्रकार : श्री. डी. डी. दलाल, मुंबई

मुद्रक
द. ग. गपचूप
शिवाजी प्रिंटिंग वर्क्स
४९५ शनवार, पुणे २.

## दोन शब्द

म. गांधींच्या संबंधीं वाङ्मयद्वारां श्रद्धा व्यक्त करावी व शक्य तर दरवर्षीं त्यांच्या पुण्यातिथीला हा उपक्रम सुरू ठेवावा या बुद्धीनें हा पाहिला प्रयत्न करीत आहें. या चिरस्मृतींत एकंदर ५८ स्मृती आहेत. त्या आठवणी प्रसिद्ध झालेल्या वाङ्मयांतूनच घेतलेल्या आहेत. त्यांतल्या कांहीं खुद्द गांधींच्याच आत्मवृत्तांतून घेतलेल्या आहेत. आठवणींच्या सत्यासत्यतेबद्दल जी कधीं कधीं शंका येत असते, तशी या आठवणींच्या बाबतींत येणें शक्य नाहीं. या आठवणींच्या आधारांची यादी पाहिली म्हणजेच ती शंका दूर होईल.

या आठवणींची रचनाहि कालानुक्रमें केली आहे. यामुळें या पुस्तकद्वारां गांधींचें चरित्रच लिहिलें गेलें आहे. अर्थात् हें समग्र चरित्र नाहीं. गांधींच्या जीवनांत ज्या कांहीं ठळक ठळक गोष्टी घडल्या त्यांचें प्रतिबिंब या पुस्तकांत पहावयास सांपडेल. 'गांधींनीं चरखा कसा शोधला,' 'प्रार्थनेचें महत्व काय,' 'गांधीजी अपरिग्रही कां झाले,' 'ईश्वराचा साक्षात्कार त्यांना कसा झाला' वगैरे महत्वाच्या आठवणी यांत आहेतच त्यांशिवाय गांधींच्या स्वभावाचें दिग्दर्शनहि झालेलें यांत पहावयास सांपडतें.

सत्य–अहिंसेच्या उपासकाच्या जीवनाचें हें एक प्रतिबिंब आहे. गांधींच्या असंख्य आठवणींपैकीं, अतिशय थोड्या अशा या आठवणी आहेत, पण त्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत, व तशा करण्याचा प्रयत्न केला आहे.

ह्या आठवणी अनेक ग्रंथांतून घेतल्या आहेत व त्यांबद्दल मी त्या त्या ग्रंथकर्त्यांचा आभारी आहें. या आठवणी गांधींच्या जीवनकार्यासंबंधीं व तत्त्वज्ञानासंबंधीं असल्यामुळें त्यांचा प्रचार होणें जरूर आहे. जरूरी पुरताच भाग त्या त्या आठवणींतून घेतला आहे. नवजीवन प्रकाशनाचे चालक श्री. जीवनजीभाई देसाई यांनीं मोठ्या आनंदानें गांधी–वाङ्मयांतील आठवणींचे कांहीं भाग घेण्यास परवानगी दिली याबद्दल त्यांचा मी आभारी आहें.

कॉंटिनेन्टल प्रकाशनाचे श्री. कुळकर्णी यांनीं हें पुस्तक अत्यंत आत्मीयतेनें प्रकाशित केलें. मी अन्य कार्यांत गुंतलों असल्यामुळें मला मुद्रितें पहाण्याची तसदी न देतां गांधींच्या प्रथम पुण्यतिथीला हें पुस्तक प्रकाशित व्हावें या इच्छेनें त्यांनीं स्वतःच मुद्रितें तपासण्याची व्यवस्था केली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. श्री. दलाल यांनीं गांधींचें सुंदर चित्र काढून दिलें याबद्दल त्यांचे आभार मानतों.

३० जानेवारी १९४९ — त्र्यं. र. देवगिरीकर.

नगर वाचनालय, सातारा.

# अनुक्रमणिका


| आठवण | पृष्ठ | आधार |
|---|---|---|
| १ गीता व गांधी | ९ | आत्मवृत्त. |
| २ गांधीजींची निर्वैरवृत्ति | ११ | ,, |
| ३ चौदा हजारांत एक धडा | १२ | ,, |
| ४ सेवा-शुश्रूषा कीं भूतदया? | १३ | ,, |
| ५ धोबी व न्हावी | १४ | ,, |
| ६ मास्तरकीकरतां अर्ज | १६ | महादेवभाईंची डायरी |
| ७ कारकून व शागीर्द | १८ | आत्मवृत्त |
| ८ इंडियन ओपिनिअन | २० | ,, |
| ९ गोखले व गांधी | २२ | Gandhiji as We Know Him —Gokhale |
| १० आश्रम कसा स्थापला | २३ | आत्मवृत्त |
| ११ प्रार्थनेचा उगम | २५ | हरिजन ५।१।४७ |
| १२ गांधी व भारत-सेवक-समाज | २७ | महादेवभाईंची डायरी |
| १३ राजेंद्रबाबूंची व कृपलानींची ओळख | २८ | चंपारण्यांतील सत्याग्रह |
| १४ जिवावरचें दुखणें. शेळीचें दूध कसें घेतलें ! | ३० | आत्मवृत्त |
| १५ खादीचा शोध | ३३ | ,, |

| आठवण | पृष्ठ | आधार |
|---|---|---|
| १६ गांधीजी संन्याशाच्या वेषांत | ३६ | Seven Months with Gandhiji —Krishandas |
| १७ सामान नेण्याची तयारी | ३८ | ,, |
| १८ तारांच्या कागदाचे लिफाफे | ३९ | ,, |
| १९ प्रोफेसरांना संदेश | ४० | ,, |
| २० दर्शनाकरतां गर्दी | ४१ | ,, |
| २१ काय या गार्डीत गांधी आहेत ? | ४१ | ,, |
| २२ गांधींची शस्त्रक्रिया | ४३ | Gandhiji as We Know Him —ना. शास्त्री |
| २३ इंग्लंडला तीन गोष्टी सांगा | ४६ | Gandhiji as We Know Him —Muriel Leister |
| २४ लष्करची वृत्ति बदलली | ४८ | हरिजन १०।१२।३८ |
| २५ गांधीजींचा वक्तशीरपणा | ४९ | Gandhiji as We Know Him —Alexander |
| २६ गांधीजींचा असंग्रह | ५१ | Nation's Voice |
| २७ गरीबांचा प्रातिनिधि | ५३ | ,, |
| २८ राजेसाहेबांचें आमंत्रण | ५५ | ,, |
| २९ आम्ही पोटावर सरपटूं | ५६ | ,, |
| ३० गांधीजी व वर्तमानपत्रांचे बातमीदार | ५७ | ,, |
| ३१ बालकांच्या सहवासांत | ५९ | ,, |
| ३२ गुप्त पोलिस घरचे झाले | ६२ | Gandhiji as We Know Him —Harrison |

| आठवण | पृष्ठ | आधार |
|---|---|---|
| ३३ गांधीजींचें सौंदर्य | ६३ | Gandhiji as We Know Him —Haynes Holmes |
| ३४ लॉर्ड सँकीची आठवण | ६६ | Mahatma Gandhi ( Radha Krishnan ) —Lord Sankey |
| ३५ मिस रॉयडन यांची मुलाखत | ६८ | Mahatma Gandhi (R.K.) —Miss Royden |
| ३६ क्लेअर शेरिडन यांनीं घेतलेली मुलाखत | ७० | Mahatma Gandhi (R.K.) —Clare Sheriden |
| ३७ काथ्याची बाज व वल्लभभाईंचें संस्कृत | ७५ | महादेवभाईंची डायरी |
| ३८ एका म्हणीच्या दोन कल्पना | ७७ | ,, |
| ३९ बुक-बाइंडर वल्लभभाई | ७८ | ,, |
| ४० ईश्वरी साक्षात्कार ? | ७९ | हरिजन १०।१२।३८ |
| ४१ खरी भक्ति | ८१ | ,, |
| ४२ एकवीस रुपये तीन वार | ८३ | Seven Months with Gandhiji —Krishnadas |
| ४३ हरिजन फंड व लिलांवावर लिलांव | ८४ | ,, |
| ४४ जवाहरलालना काय वाटतें ? | ८६ | Gandhiji as We Know Him —Jawaharlal |
| ४५ मौनाला सुरुवात | ८८ | हरिजन १०।१२।३८ |
| ४६ तुम्हांला हिंदुस्थानी आलें पाहिजे | ८९ | On Tour with Gandhiji —B. Kumarappa |

| आठवण | पृष्ठ | आधार |
|---|---|---|
| ४७ लिफाफ्यांतील नोट | ८९ | हरिजन १९३८ |
| ४८ पठाणांच्या मुलखांत | ९१ | ,, |
| ४९ पठाणांचें आदरातिथ्य | ९२ | ,, |
| ५० निस्सीम भक्ताचें प्रेम | ९३ | ,, |
| ५१ पौर्वात्त्य तत्त्वज्ञानाचा जीवंत पुरावा | ९४ | ,, |
| ५२ गांधींची हरिजनांसंबंधीं तळमळ | ९६ | ,, |
| ५३ गांधीजींची आपुलकी | १०१ | संग्राहक |
| ५४ अग्निदिव्य | १०४ | हरिजन १६।२।४२ |
| ५५ आगाखान वाड्यांतील शेवटचा दिवस | १०५ | Gandhiji as We Know Him —प्यारेलाल |
| ५६ गांधींचा प्रसाद | १०९ | संग्राहक |
| ५७ बुद्धाचें अनुकरण करा | १११ | In the Path of Mahatma Gandhiji —Katlin |
| ५८ शेवटची आठवण | ११४ | मार्गारेट बर्क व्हाईट मासिकांतील आठवण |

## १. गीता व गांधी

गांधींनीं ख्रिश्चन व्हावें, मुसलमान व्हावें असा प्रयत्न त्या त्या धर्मीं-थांनीं केला. पण गांधी जरी सर्व धर्म समभाव मानीत तरी त्यांची हिंदू-धर्मावर अनन्य श्रद्धा होती. ती श्रद्धा डोळस होती. आमच्यासारखी अंध नव्हती.

१९०३ सालीं थिऑसॉफिस्टांनीं गांधींना आपल्यांत ओढण्याचा प्रयत्न केला. त्यांचा हेतु चांगला होता. त्यांचा पुनर्जन्मावर व पूर्वसंस्कारांवर विश्वास असल्यामुळें गांधींकडून त्यांना त्यांसंबंधीं माहिती हवी होती. गांधींनीं आपलें संस्कृतचें अध्ययन अगदीं तुटपुंजें आहे असें सांगितलें. पण तेव्हांपासून ते वेदांताचे ग्रंथ वाचूं लागले. त्यांनीं पतंजलीचीं योगसूत्रें वाचलीं. विवेकानंदांचा राजयोग वाचला. ते गीतेकडे वळले. गीतेच्या इंग्रजी भाषांतराच्या साहाय्यानें त्यांना संस्कृत समजूं लागलें.

त्यानंतर त्यांनीं गीता पाठ करण्याचा निश्चय केला. ते दररोज एक दोन श्लोक पाठ करीत. गीता पाठ करण्याची त्यांची पद्धतीहि अभिनव होती. सकाळीं पंधरा मिनिटें ते दांत घासण्यांत आणि वीस मिनिटें स्नान करण्यांत घालवीत. त्यांनीं न्हाणीघरांतील भिंतीवर दररोज दोन श्लोक कागदावर लिहून चिकटवावेत व पस्तीस मिनिटांत ते पाठ करावेत. अशा प्रकारें त्यांनीं तेरा अध्याय पाठ केले.

गीतेला त्यांनीं आपल्या जीवनाचा विश्वासू वाटाड्या केलें. ‘ माझ्या दैनंदिन जीवनांत गीता ही शब्दकोशासारखी आहे ’ असें ते म्हणत.

ज्या वेळीं त्यांच्यावर संकटें येत व त्यांच्या परीक्षेची वेळ येई तेव्हां ते गीतेला शरण जात. त्यांना अपरिग्रह आणि समभाव या दोन शब्दांनीं तर वेडच लावलें. मनाची साम्यावस्था कशी राखावयाची ? दुर्गुणी, दुराचारी अधिकारी आणि सद्‌गुणी व सदाचारी मित्रांना सारखें कसें वागवावयाचें ?

अपरिग्रही व्हायचें म्हणजे काय करायचें ? शरीर, स्त्री, मुलेंबाळें, पुस्तकें, कपाटें हा सारा परिग्रह नाहीं का ? मी त्यांचा त्याग करून ईश्वरा-मागें जायचें का ? ' होय. मी सर्वांचा त्याग केल्याशिवाय ईश्वराच्या मागें जाऊं शकणार नाहीं ' असें त्यांच्या बुद्धीनें उत्तर दिलें.

गांधीजी म्हणतात, ' त्या वेळीं इंग्लिश कायद्याचें ज्ञान माझ्या मदतीला धांवून आलें.' त्यांनीं स्नेलचें 'इक्विटी' पुस्तक वाचलें होतें. त्यांतील इक्वि-टीचे शब्दप्रचार त्यांना आठवले. विश्वस्त शब्दाचा त्यांतील अर्थ गीतेच्या वाचनानें स्पष्ट झाला. त्यांना ' ज्युरिसप्रुडन्स ' आवडूं लागलें. ' त्यांत मला धर्म सांपडला ' असें गांधीजी म्हणतात. अपरिग्रह म्हणजे काय ? ज्यांना मुक्ति हवी असेल त्यांनीं अपरिग्रही झालें पाहिजे, म्हणजे आपण आपल्या संपत्तीचे विश्वस्त आहों या भावनेनें वागलें पाहिजे. विश्वस्ता-जवळ अपार संपत्ति असते; पण तो ती आपली आहे असें मानीत नाहीं. ' वृत्तींत अपरिग्रह आणि समभाव यावयास अंतःकरण बदललें पाहिजे, वृत्ति बदलली पाहिजे. ' असा गांधींनीं कायद्याच्या मदतीनें गीतेंतील त्या शब्दांचा अर्थ लावला. गीतेला ते अनासक्ति योग असें म्हणत.

हा अर्थ पटतांच त्यांनीं पितृतुल्य असणाऱ्या आपल्या बंधूंना—रेवाशंकर-भाईंना—लिहिलें, ' परमेश्वर माझ्या बायकामुलांची काळजी घेईल. माझ्या विम्याची पॉलिसी विकून टाका किंवा बुडूं द्या. यापुढें मला हप्ते भरायचे नाहींत. ' त्यांनीं असेंहि त्यांना सांगितलें कीं, मी यापुढें तुम्हांला पैसे पाठविणार नाहीं. माझ्याजवळ पैसे राहिलेच तर ते मी सार्वजनिक कार्यांत खर्च करीन. त्यांच्या बंधूना हें पटलें नाहीं. त्यांनीं त्यांना कुटुंबधर्माची व

[library stamp] वाचनालय.

कौटुंबिक कर्तव्याची जाणीव करून दिली. गांधी म्हणाले, 'तें मला मान्य आहे. आतां विश्व हें माझें कुटुंब झालें आहे.' त्यांचा भाऊ रागावला व त्यानें पत्रव्यवहार बंद केला. गांधींच्या या अभिनव संशोधनामुळें त्यांच्या कुटुंबावर आपत्तिच आली. पण शेवटीं त्यांच्या भावाला मृत्युशय्येवर असतांना गांधींचें तत्त्वज्ञान पटलें. त्यांनीं गांधींची क्षमा मागितली. आफ्रिकेंत येण्याची इच्छा व्यक्त केली. गांधींनीं तारेनें होकार कळविला; पण त्यांची इच्छा तृप्त झाली नाहीं. ते अगोरदच मरण पावले.

## २. गांधीजींची निर्वैर वृत्ति

आफ्रिकेंत गांधींच्यावर पठाणांनीं केलेल्या हल्ल्याची हकीगत गांधींच्या अहिंसावृत्तीची द्योतक आहे. जे. जे. डोक यांनीं गांधींवरील त्या, प्रसंगाचें वर्णन केलें आहे. जोसेफ डोक म्हणतात,

'पठाणांनीं गांधींवर हल्ला चढविला होता. त्यांना त्यांनीं खालीं पाडलें होतें व क्रूरपणें त्यांना बडवीत होते. गांधीजी शुद्धीवर आले तेव्हां त्यांना जवळच्या एका ऑफिसांत नेऊन ठेवलेले होते. मी त्यांना अत्यल्प वेळानें भेटलों. ते असाहाय झाले होते व त्यांच्या जखमांतून रक्त वहात होतें. डॉक्टर जखमा धूत होते आणि पोलीस अधिकारी त्यांच्यावर पहारा ठेवीत होते व त्यांचें म्हणणें ऐकत होते. गांधींजी आपली उरलीसुरली शक्ति एकवटून सांगत होते, 'माझ्या मारेकऱ्यांना शिक्षा करण्याकरतां कांहीं करूं नका.' गांधी म्हणाले, 'त्यांना वाटलें असेल आपण करतों तें बरोबर करीत आहों. तेव्हां त्यांच्यावर खटला करावा अशी मला इच्छा नाहीं.' पण कायद्याला व्यक्तीच्या इच्छेचें बंधन नसतें. तो आपलें कर्तव्य बजावित असतो. गांधींच्या मारेकऱ्यांना शिक्षा झाल्या; पण गांधींनीं खटल्यांत भाग घेतला नाहीं.'

## ३. चौदा हजारांत एक धडा

एका पाश्चात्त्य देशांतील स्त्रीनें दक्षिण आफ्रिकेंत एक शाकाहारी उपाहारगृह काढलें. ती स्त्री थिऑसॉफिस्ट होती. ती मोठी कलाप्रिय होती; पण उधळी व गैरहिशेबी होती. तिनें लहान प्रमाणावर आपलें दुकान चालू केलें होतें. पण तिला त्यांत समाधान नव्हतें. म्हणून तिनें आपलें दुकान मोठ्या प्रमाणावर वाढविण्याचें ठरविलें. ती गांधींच्याकडे गेली. गांधींनीं तिचें अंदाजपत्रक न पहातां तिला पैसे देण्याचें कबूल केलें.

पण गांधी पैसा कोठून देणार ? त्यांच्याजवळ अनेक पक्षकार मोठमोठ्या ठेवी आणून ठेवीत. त्यांतला बद्री नांवाचा एक मुदतबंदी मजूर म्हणून आलेला गृहस्थ होता. गांधींनीं त्याला विचारलें व तो हो म्हणाला. त्यानें चांगला पैसा कमावला होता. गांधींनीं त्या बाईला या अशिलाचे १३।१४ हजार रुपये दिले.

दोन तीन महिन्यांत गांधींना कळून चुकलें कीं, ती बाई पैसा परत करण्याच्या स्थितींत नाहीं. पुढें तर हा पैसा बुडाला. पण पैसा बुडाला तरी बद्रीला गांधी काय सांगणार ? त्या वेळीं एक अशील मित्र गांधीजीकडे गेला आणि गांधींना या मूर्खपणाबद्दल चांगलाच रागें भरला. त्या वेळीं गांधी महात्मा किंवा बापू म्हणून प्रसिद्ध नव्हते. त्यांना सर्वजण भाई म्हणत.

तो मित्र म्हणाला, 'तुम्ही जर आपल्या पक्षकारांचे पैसे असे खर्चूं लागलांत, तर त्यांचा नाश होईल आणि तुम्हींहि भिकारी व्हाल. कारण तुम्ही कुळांचे पैसे परत केल्याशिवाय राहणार नाहीं. तुम्ही आमचे विश्वस्त आहां आणि आमचा विश्वस्त भिकारी झाला तर आमचें सार्वजनिक काम बंद पडेल.'

गांधींनीं स्वतः बद्रीचे पैसे पुढें दिले. पण ते चांगलाच धडा शिकले. 'शाकाहाराच्या' स्थंडिलावर केलेला स्वार्थत्याग सहेतुक किंवा अपेक्षित नव्हता.

तो परिस्थितींतून निर्माण झाला होता. याची गांधींना जाणीव झाली. त्यांनीं आपल्या उत्तर आयुष्यांत असा कर्जबाजारी होण्याचा व्यवहार केला नाहीं.

## ४. सेवा-शुश्रूषा कीं भूतदया

गांधींच्या घरीं कोणीहि आला तरी त्याला आसरा मिळे. एकदां एक महारोगी त्यांच्याकडे आला. गांधींना सेवा हें सिद्धीचें साधन वाटे. त्या महारोग्याचें काय करावयाचें ? तो बिचारा दुःखी व गांजलेला होता. गांधींनीं विचार केला, 'त्याला जेवायला घातलें आणि जा म्हणून सांगितलें तर ? ' छे ! त्यामुळें गांधींना वेदना झाल्या असत्या.

तेव्हां त्यांनीं त्या महारोग्याला आपल्या घरीं ठेवून घेतलें. पण तेवढ्या-नेंहि आपलें कर्तव्य झालें असें त्यांना वाटेना. ते त्याच्या जखमा रोज धूत. महारोग्याच्या जखमा धुणें म्हणजे स्वतःचा जीव धोक्यांत घालणें होतें. पण गांधी इतर लोकांना घाणेरडें वाटणारें काम करीत. बरेच दिवस त्यांनीं ही शुश्रूषा केली. पण महारोग्याचें दुखणें हें चार दोन महिन्यांत थोडेंच बरें होणार ? तें जन्माचें दुखणें. गांधींनीं शेवटीं त्याला सरकारी इस्पितळांत नेऊन पोचविलें.

पण गांधींना आपण कांहीं तरी मनुष्यमात्राची सेवा करावी असें वाटे. जवळच एक इस्पितळ होतें. तेथें डॉ. बूथ हे सहृदय गृहस्थ रोग्याला फुकट औषधोपचार करीत. गांधी त्या डॉक्टरांकडे गेले व मला रोग्याच्या शुश्रूषेचें काम द्या म्हणाले. पण शुश्रुषेचें काम बॅरिस्टरला कसें जमणार ? तेव्हां गांधींनीं कंपौंडरचें काम घेतलें. ते वकिलीचें काम करीत असत; पण त्यांची वकिली सल्लामसलतीची व खटले मिटवण्याचीच असे. तथापि ते दररोज दोन तास दवाखान्यांत जात आणि औषधें तयार करण्याचें काम करीत.

त्या सेवेमुळें आपल्या मनाला शांति मिळाली असें गांधीजी म्हणतात. हा बॅरिस्टर कंपौंडर प्रत्येक रोग्याकडे जाई, त्याच्या तक्रारी समजावून घेई, त्या डॉक्टरपुढें ठेवी आणि नंतर स्वतःच्या हातानें डॉक्टरांच्या पाठाप्रमाणें औषधें मिसळून देई. ते सारे रोगी तामील तेलगू होते व ते मजूर होते. याच अनुभवाचा फायदा आपल्याला बोअर युद्धांत शुश्रूषापथक चालविण्यांत मिळाला असें गांधी म्हणतात.

पण दुसराहि एक प्रसंग त्यांच्यावर आला. त्यांच्या पत्नी बाळंत व्हावयाच्या होत्या. त्यांचें पोट दुखूं लागलें. डॉक्टर किंवा दाई येईपर्यंत त्या कळ काढूं शकल्या नाहींत. आतां काय करणार ?

गांधींनीं प्रसूतीसंबंधीं कांहीं पुस्तकें वाचलीं होतीं. गांधीजी पुढें झाले आणि त्यांनीं न घाबरतां शांतपणें आपल्या पत्नीची प्रसूति केली. मूल सुखरूपपणें प्रसूत झालें आणि गांधींजींचा जीव खालीं पडला.

## ५. धोबी व न्हावी

' स्वतःचीं कामें स्वतः करण्यांत काय सौंदर्य आहे हें मी माझ्या मित्रांना पटवूं शकलों नाहीं. हळू हळू मी उत्तम धोबी झालों आणि माझी धुलाई भट्टींतल्या धुलाईपेक्षां कमी चांगली नसे ' असें गांधी म्हणतात. धोबी कामच काय, पण गांधी, भंगीकाम, केशकर्तनाचें कामहि करीत आफ्रिकेंत परीट फार पैसे घेत म्हणून ते स्वतःचे कपडे स्वतः धूत. एकदां ना. गोखले द. आफ्रिकेंत गेले होते. त्यांच्याजवळ न्यायमूर्ति रानडे यांनीं दिलेलें एक उपरणें होतें. त्या उपरण्याला ते पावन-स्मृति म्हणून जपत आणि अगदीं विशेष प्रसंग असला तरच तें ते अंगावर घेत. एकदां गोखल्यांना जोहान्सबर्गच्या हिंदी लोकांनीं जेवायला बोलावलें. तो विशेष प्रसंग होता व गोखल्यांना रानड्यांनीं दिलेलें उपरणें वापरावयाचें होतें. उपरण्याला घडी घातली होती; पण त्याला इस्त्री केलेली नव्हती. धोब्याकडे उपरणें पाठवून

... वाचनालय, ...

आणण्यास पुरेसा वेळ नव्हता. तेव्हां गांधी म्हणाले, 'माझ्यावर हें काम सोंपवा. मी तें उपरणें चापूनचोपून ठीक करतों. त्यालाहि इस्त्री करतों.'

त्यावर गोखले म्हणाले, 'मी तुमच्यावर वकील म्हणून विश्वास टाकीन; पण परीट म्हणून टाकणार नाहीं. तुम्ही तें खराब केलेंत तर ? तुम्हांला ठाऊक आहे मला तें किती मोलाचें वाटतें तें.'

ना. गोखल्यांनीं उपरण्याचा साद्यंत वृत्तांत सांगितला. तो ऐकून झाल्यावरहि गांधी म्हणाले, 'तर मग मला तें उपरणें द्याच. मीं काम कसें करतों तें तर पहा.' असें म्हणून गांधींनीं गोखल्यांची अनुमति मिळवली आणि तें रजककार्य उत्कृष्ट केल्याबद्दल गोखल्यांचें शिफारसपत्र मिळविलें. गांधी म्हणाले, 'त्या शिफारसपत्रानंतर जग माझ्या धोबीकामाबद्दल मला काय म्हणेल याची पर्वाहि वाटली नाहीं.'

गांधी म्हणतात, 'धोब्याच्या गुलामगिरींतून मी जसा मुक्त झालों, तसाच न्हाव्याच्या गुलामगिरींतूनहि झालों.' गांधी हे वृत्तीनें स्वावलंबी होतेच; पण परिस्थितीनेंहि त्यांना स्वावलंबी बनणें भाग पाडलें.

त्याचें असें झालें. ते एकदां केस कापून घेण्याकरतां प्रेटोरियांतील इंग्लिश सलूनमध्यें गेले. 'काळ्या आदमीचे' केस कापण्याचें त्या इंग्लिश न्हाव्यानें नाकारलें. गांधींना त्यामुळें धक्काच बसला. ते तसेच दुकानांत गेले आणि त्यांनीं केस कापण्याचें मशिन विकत आणलें. आरसा पुढें ठेवून त्यांनीं केस कापण्याचा प्रयोग केला.

गांधी म्हणतात, 'पुढचे केस कापण्यांत मी बरेंच यश संपादन केलें; पण मागचे केस चांगले निघाले नाहींत.' गांधींची स्वारी अशा थाटांत कोर्टांत गेली. वकीलवर्गांत त्यांचा हा अवतार पाहून हंसू लोटलें.

'गांधीजी, तुमच्या केसांना काय झालें? उंदरांनीं कुरतुडले का हो ?'

गांधी म्हणाले, 'नाहीं. गोऱ्या न्हाव्यानें माझ्या काळ्या केसांना स्पर्श

करण्याचें नाकारलें. म्हणून मी स्वतःचे केस स्वतःच कापण्याचें ठरविलें. कसेहि केस कापले गेले तरी हरकत नाहीं असा मी निर्णय घेतला. ’

वकीलमित्रांना या उत्तरानें आश्चर्य वाटलें नाहीं.

गांधीजी म्हणतात, ‘तो गोऱ्या न्हाव्याचा दोष नव्हता. त्याचें सारें गिऱ्हाईक बुडालें असतें. आम्ही अस्पृश्यांना असेंच नाहीं का वागवीत ?’

गांधींच्या हरिजनसेवेचें मूळ त्यांना आफ्रिकेंत आलेल्या अनुभवांत व मिळालेल्या वागणुकींत सांपडतें.

## ६. मास्तरकीकरतां अर्ज

म. गांधींच्या जीवनकथा बहुतेक उजेडांत आल्या आहेत. पण कांहीं अद्याप उजेडांत यावयाच्या आहेत.

जगांतल्या मोठ्या माणसांचीं चरित्रें पूर्वनियोजित असतात असें आपण समजतों. तें खरेंहि असतें. प्रथमपासूनच त्या व्यक्ती महत्त्वाकांक्षी असतात व आपलें जीवन घडवीत असतात. गांधींचें तसें नव्हतें. त्यांचा जन्म सत्याच्या प्रयोगाकरतां होता. एकदां बोलतां बोलतां गांधीजी म्हणाले, ‘मी बॅरिस्टर होऊन मुंबईस आलों. प्रपंचाचा खर्च चालू होता. बॅरिस्टरी चालेल किंवा नाहीं याविषयीं खात्री नव्हती. तेव्हां मनांत विचार आला, कोठें तरी नोकरी धरावी. म्हणून मी एका शाळेंत मास्तरकीकरतां अर्ज केला ती नोकरी ७५ रु. पगाराची होती. अर्ज केल्यावर मला मुलाखतीकरतां बोलाविलें. ’ आणि गांधींना त्या शाळेंतल्या मुख्य अध्यापकानें नालायक ठरविलें. ती शाळा कोणती, ते अध्यापक कोणते आणि गांधींना नालायक कां ठरविलें गेलें, याचा आतां थांगपत्ता लागणें कठीण. एका दृष्टीनें गांधींना ही नोकरी मिळाली नाहीं हें बरेंच झालें. नाहींतर मास्तरकींतच त्यांचा जन्म गेला असता.

महादेवभाईनीं एकदां गांधींना विचारलें, ' पण ही ७५ रु. ची नोकरी करावी असें तुम्हांला कसें वाटलें ? मला हें खरें वाटत नाहीं. '

गांधी म्हणाले, 'मला कसलीच महत्त्वाकांक्षा नव्हती. कसा तरी निर्वाह करावा, पडेल तें काम करावें व सेवा करावी या पलिकडे दुसरा विचार मजपुढें नव्हता. ' घरच्या श्रीमंतीवर जगण्याची मात्र गांधींची इच्छा नव्हती. वकिली चालत नाहीं, म्हणून मास्तरकी करणारे किती तरी अगतिक समाजांत दिसतात. त्यांचीं चरित्रें कुठें प्रसिद्ध आहेत ? मोठा पुढारी व्हावें ही गांधींची महत्त्वाकांक्षा असती तर त्यांनीं त्याकरतां निराळेच उद्योग केले असते.

महादेवभाई व गांधी यांचा हा संवाद चालू असतां वल्लभभाई तेथें होते. त्यांनीं तो संवाद ऐकला आणि स्वतःसंबंधींची एक मजेदार हकीगत सांगितली.

वल्लभभाई म्हणाले, 'माझा मामा म्युनिसिपालिटींत ओव्हरसिअर होता. त्याला वाटे, हा पोरगा काय शिकणार ? त्याला नोकरी लावून द्यावी. म्हणून ते मला वारंवार म्हणत कीं 'अरे, तूं इकडे ये. मी तुला मुकादमाची जागा देतों; म्हणजे उद्यांपासून तूं पैसे मिळवूं लागशील. '

वल्लभभाई मुकादम झाले असते आणि गांधीजी मास्तर झाले असते म्हणजे हिंदुस्थानचें भाग्य चांगलेंच उजळलें असतें ! वल्लभभाईंना महत्त्वाकांक्षा होती का नाहीं हें कळायला मार्ग नाहीं; पण त्यांच्या जीवनांत गांधी प्रविष्ट झाले आणि गांधींनीं त्यांचें जीवन बदललें. वल्लभभाई मुकादमच झाले; पण साऱ्या हिंदुस्थानची मुकादमी त्यांच्याकडे आली आणि गांधीजीहि मास्तर झाले; पण ती मास्तरकी साऱ्या हिंदुस्थानची होती.

## ७. कारकून व शागीर्द

दक्षिण आफ्रिकेचा प्रश्न कॉंग्रेसपुढें मांडावा म्हणून गांधी हिंदुस्थानांत आले होते. कॉंग्रेस सुरू व्हायला दोनच दिवस अवकाश होता. या दोन दिवसांत काय करायचें ? गांधी कलकत्त्याला आल्यावर, स्नान वगैरे उरकून कॉंग्रेस कचेरींत जाऊन दाखल झाले. १९०१ ची ती कॉंग्रेस होती. भूपेंद्रनाथ बसू व घोषाल हे कॉंग्रेसचे मंत्री होते. गांधी प्रथम भूपेंद्रांकडे गेले व कांहीं काम असेल तर सांगा; मी तें करावयास तयार आहे असें म्हणाले. भुपेंद्र म्हणाले, ' मजजवळ काम नाहीं; पण घोषालबाबूंकडे जा. त्यांच्याजवळ कांहीं काम असेल. '

घोषालबाबूंनीं गांधींचें आपादमस्तक निरीक्षण केलें व म्हटलें, ' मजजवळ काम आहे; पण तें कारकुनी काम आहे. तुम्ही कराल का ? '

' हो, हो. माझ्या शक्तीच्या बाहेर नसणारें कोणतेंहि काम करायला माझी तयारी आहे. ' गांधी म्हणाले. 'बरोबर. हीच तरुणांची वृत्ति असावी' असें घोषालबाबू गांधींना म्हणाले आणि आपल्याभोंवतीं असलेल्या स्वयंसेवकांना उद्देशून बोलले, 'ऐकलेंत हा तरुण काय म्हणत आहे तें ? '

नंतर गांधींकडे वळून ते म्हणाले, ' हा पहा पत्रव्यवहाराचा ढीग सांचला आहे. ती खुर्ची घ्या आणि लागा कामाला. शेकडों लोक मला भेटायला येतात. मी तरी काय करूं ? मी त्यांना मुलाखती देऊं, का पत्रांचा पाऊस पाडणाऱ्या या गृहस्थांना उत्तरें देत बसूं ? कोणावर मी हें काम सोपवूं ? माझ्याजवळ काय कारकून आहेत ? खरं सांगायचं म्हणजे, पुष्कळशा पत्रांत कांहींच उत्तर देण्यासारखें नाहीं; पण तुम्ही तीं वाचा. कांहींची नुसती पोंच द्या आणि जीं विचारपूर्वक उत्तरें देण्याच्या लायकीचीं असतील, तीं माझ्याकडे आणा. ' गांधींना आपल्यावर इतका विश्वास टाकल्याबद्दल आनंद झाला.

घोषालबाबूंना आपण हें काम कोणाला सांगितलें याची दाद नव्हती. मागाहून त्यांना तें कळलें.

गांधींना त्या कामांत कांहींच अवघड वाटलें नाहीं. त्यांनीं त्या ढिगाचा लवकर फडशा पाडला. घोषालबाबूंना त्यामुळें मोठें समाधान वाटलें. घोषालबाबू फार वाचाळ होते. तासन्तास ते बोलत. गांधींच्या तोंडून जेव्हां त्यांना गांधींचें पूर्ववृत्त समजलें तेव्हां त्यांना हें कारकुनी काम गांधींना दिल्याबद्दल वाईट वाटलें. पण गांधी म्हणाले, 'त्याचें मनाला लावून घेऊं नका. मी तुमच्यापुढें कोण आहे.? कॉंग्रेसची सेवा करतां करतां तुमचे केस पिकले आहेत. मी तर एक अननुभवी तरुण आहें. माझ्यावर हें काम सोंपवून तुम्ही मला ऋणी केलें.'

घोषालबाबू म्हणाले, 'खरें सांगायचें म्हणजे, तुमची वृत्ति हीच रास्त वृत्ति आहे. पण अलिकडच्या तरुणांना हें पटत नाहीं. मी या कॉंग्रेस कार्यकर्त्यांना कॉंग्रेसच्या जन्मापासून ओळखतों. वस्तुस्थितीच सांगायची म्हणजे ह्यूम साहेबाबरोबर कॉंग्रेस स्थापनेचें श्रेय मलाहि अंशतः घेतां येईल.'

गांधी व घोषाल दोस्त बनले. घोषालबाबू गांधींना जेवायला येण्याचा आग्रह करूं लागले.

घोषालबाबू आपल्या गड्याकडून आपल्या शर्टचीं बटनें घालून घेत. गांधी आपणहून घोषालना म्हणत, 'मी हें गड्याचें काम करतों. मला त्याची आवड आहे. वृद्धाची सेवा करणें मला आवडतें.'

घोषालबाबूंना गांधींचा वृद्धाबद्दलचा आदर पटल्यावर ते त्यांना स्वतःचीं कामें सांगू लागले. 'शर्टला बटनें घाला' असें सांगतांना ते गांधींना म्हणाले, 'कॉंग्रेस सेक्रेटरीला बटनें घालण्याससुद्धां फुरसत नाहीं. त्याच्या मागें कामाचा सारखा लकडा आहे.' घोषालबाबूंच्या ह्या साधेभोळेपणाच्या उद्गारांमुळें गांधींची मोठी करमणूक झाली.

## ८. इंडियन ओपिनिअन

१९०४सालची गोष्ट आहे. गांधींच्या दक्षिण आफ्रिकेंत चाललेल्या घडामोडींसंबंधीं गांधींचीं मतें काय आहेत हें जाणण्याची बऱ्याच जणांना उत्सुकता होती. पण हें जमावें कसें ? श्री. मदनजित नांवाचे गृहस्थ गांधीकडे गेले व 'इंडियन ओपिनिअन' सुरू करा म्हणाले. आफ्रिकेंतल्या जनतेला हिंदी लोकांचें मत कळणें जरूर आहे म्हणून गांधींनीं पत्र काढण्यास परवानगी दिली; पण ते स्वतः संपादक झाले नाहींत. त्यांना मनसुखलाल नाझर नांवाचे एक गृहस्थ भेटले. ते पहिले संपादक झाले. पण नांवाचे संपादक कोणीहि असले तरी वृत्तपत्र चालविण्याची जबाबदारी गांधींच्यावरच होती. मनसुखलाल हे हिंदुस्थानांत वृत्तपत्रव्यवसायी होते; पण त्यांना आफ्रिकेंतल्या सूक्ष्म परिस्थितीची तितकीशी माहिती नव्हती.

सुरुवातीला गांधींचें हें पत्र गुजराथी, हिंदी, तामिल व इंग्लिश भाषांमध्यें निघत असे. पण गांधींनीं तामिल व हिंदी आवृत्त्या लवकरच बंद केल्या. त्या पत्रद्वारां अपेक्षित कार्य त्या आवृत्त्यांनीं होऊं शकत नव्हतें.

'हें पत्र सुरू करतांना' गांधी म्हणतात, 'मला त्यांत पैसा घालवा लागेल याची कल्पना नव्हती.' पत्र सुरू करणें सोपें असतें; पण तें बंद करणें कमीपणाचें असतें. त्यामुळें गांधी पत्रांत पैसा ओतूं लागले. तीं पत्रें इतका पैसा खाऊं लागलीं कीं, गांधींच्या आयुष्यांतील सर्व कमाई त्यांत खर्चीं पडली. दरमहा ७५ पौंड म्हणजे १००० रु. च्यावर गांधी पदरचे पैसे त्यांत घालीत.

पण त्यामुळें गांधींना दुःख झालें नाहीं. त्या पत्रांनीं आपलें इष्ट तें कार्य केलें. त्यांना त्या पत्रांतून फायदा करावयाचा नव्हता किंवा व्यापारी दृष्ट्या त्याकडे पहावयाचें नव्हतें. 'माझ्या जीवनाचा आरसा' अशा स्वरूपाचीं तीं पत्रें होतीं असें गांधींनीं त्यांचें वर्णन केलें आहे. गांधींच्या

जीवनांत होणारे सारे बदल आरशाप्रमाणें त्यांच्या पत्रांत दिसत. इंडियन ओपिनिअनचें कशाला, यंग इंडिया, नवजीवन, हरिजन, वगैरेंसंबंधीं हेंच म्हणतां येईल.

१९०४ पासून १९१४ पर्यंत गांधी प्रत्येक अंकांत संपादकीय लेख लिहीत. एकाहि अंकांत गांधींचा लेख नाहीं असें घडलें नाहीं. सत्याग्रहाच्या तत्त्वाची व व्यवहाराची मीमांसा त्यांत असे. 'माझ्या लेखांतील शब्दन् शब्द मीं विचारपूर्वक लिहिला आहे' असें गांधी म्हणतात. कोणाला खूष करावें किंवा अतिरंजित लिहावें हें गांधींच्या स्वभावांत नव्हतें. या पत्राचा उपयोग स्वतः गांधींना फार झाला. संयमाचें शिक्षण त्यांना याच पत्रांनीं दिलें. टीकाकारांना गांधींवर हल्ला करण्यासारखें कांहींच नसे. इंडियन ओपिनिअन काढलें नसतें तर सत्याग्रहची कल्पना सुचणें अशक्य होतें असें गांधी म्हणत.

इंडियन ओपिनियन जन्माला आल्यानंतर पहिल्याच महिन्यांत वृत्तपत्राचें ध्येय सेवा आहे हें गांधींना कळून आलें. 'वृत्तपत्र ही एक प्रचंड शक्ति आहे;पण नियंत्रण नसणारा पाण्याचा प्रचंड लोंढा जशीं पिकें नासून टाकतो आणि गांवेंचीं गांवें बुडवून टाकतो, तशी संयमरहित लेखणीची स्थिति होते, गांधी म्हणतात, 'लेखणी ही पाण्याच्या लोंढ्याप्रमाणें नाशाला कारणीभूत होते. वृत्तपत्रांना बाहेरचें नियंत्रण असणें हें तर नियंत्रण नसण्यापेक्षां अधिक विषारी असतें. स्वयंनियंत्रण हेंच उपयुक्त असतें. ह्या निकषावर जगांतील किती पत्रें पारखतां येतील? चांगल्या व वाईट पत्रांत कोण निवड करणार? ज्याप्रमाणें चांगलें व वाईट हे सहप्रवासी असतात, तसेंच वृत्तपत्रांचें आहे. चांगल्यावाईटाची पारख माणसानेंच केली पाहिजे.'

## ९. गोखले व गांधी

ना गोखल्यांना महात्माजी गुरुस्थानीं मानीत. गोखल्यांनाहि गांधींच्याबद्दल अत्यंत आदर होता. गोखले १९०९ सालीं केलेल्या लाहोरच्या भाषणांत म्हणाले, 'गांधींचा व माझा अत्यंत निकटचा परिचय आहे. ही माझ्या जीवनांतील एक भाग्याची गोष्ट आहे. गांधींच्यापेक्षां अधिक पवित्र, अधिक उदार, अधिक शूर आणि अधिक उन्नत आत्मा या जगांत कधींच झाला नाहीं.' ना. गोखल्यांनीं, गांधींनीं आफ्रिकेंत केलेल्या कार्याचें वर्णन मुंबईस १९१२ सालीं असेंच केलें आहे.

गोखले म्हणतात, 'गांधींच्याजवळ अशी विलक्षण दैवी शक्ति आहे कीं, त्या शक्तीनें त्यांनीं सामान्य माणसांना शूर वीर आणि हुतात्मे बनविले. त्यांनीं २७०० लोकांना निःशस्त्र प्रतिकाराच्या लढ्यांत आपल्या देशाचा मान राखण्याकरतां शिक्षा भोगावयास लावलें.' गरीबापासून श्रीमंतापर्यंत सर्वजण कसे लढले, त्यांचीं घरेंदारें कशीं उध्वस्त झालीं, स्त्रियांनीं व मुलांनीं कसे हाल सहन केले, इत्यादींचें वर्णन करून गोखले म्हणतात, 'माझ्या जीवनावर गांधींखेरीज दोनच व्यक्तींनीं दैवी प्रभाव पाडला. एक दादाभाई नौरोजी व दुसरे माझे गुरु न्यायमूर्ति रानडे. द. आफ्रिकेच्या गाऱ्हाण्याकरतां गांधींनीं आपल्या सर्वस्वाचा त्याग केला. त्यांचें वकिलीचें सालिना उत्पन्न ५ ते ६ हजार पौंड होतें. तें उत्पन्न आफ्रिकेंत अत्यंत उत्तम मानीत. पण त्यांनीं वकिली सोडली आणि आतां ते महिन्याला ३ पौंडावर रहातात. रस्त्यावरच्या गरीब माणसाचें हें उत्पन्न आहे.

'त्यांनीं युरोपिअनाविरुद्ध लढा चालविला असला तरी त्यांच्या मनांत युरोपिअनाविरुद्ध कटुता नव्हती. द. आफ्रिकेंत दौऱ्यावर असतांना युरोपिअन समाजाला गांधींच्याविषयीं किती आदर आहे हें पाहून मला जो आनंद झाला तो दुसऱ्या कशानेंहि झाला नाहीं. प्रत्येक सभेंत, गांधीजी आले आहेत हें कळतांच युरोपिअन लोक त्यांच्याभोंवतीं गोळा होत व त्यांच्याशीं हस्तांदोलन

करण्यास उत्सुक असत. ते म्हणत, 'आम्ही गांधींच्याविरुद्ध अटीतटीनें लढत असलों, त्यांना चिरडून टाकण्याचा प्रयत्न करीत असलों तरी व्यक्ति म्हणून आम्ही त्यांना मान देतों.'

गांधींच्या जीवनांत निर्वैर वृत्ति नसती तर हें शक्य झालें नसतें.

## १०. आश्रम कसा स्थापला

हिंदुस्थानांत गांधी रहावयास आले तेव्हां त्यांनीं आपल्या प्रांतांत स्थाईक व्हावें असें अनेकांना वाटलें. स्वामी श्रद्धानंद त्यांना हरद्वारला बोलावीत होते आणि कलकत्त्याचे मित्र वैद्यनाथधामाला या असें म्हणत होते. त्यांचें जन्मस्थान राजकोट. तेथेंहि त्यांना आमंत्रण होतें. पण गांधी अहमदाबादवरून चालले असतां डॉ. हरिप्रसाद मेहतांनीं साबरमतीचें पावित्र्य व पूर्व इतिहास सांगून अहमदाबादला बोलावलें. अहमदाबादच्या मंडळींनीं आश्रमाचा खर्च चालविण्याचें व घर पाहून देण्याचेंहि कबूल केलें. गांधींनीं अहमदाबाद मात्र अन्य कारणाकरतां निवडलें. हातमागाचें जुनें केंद्र म्हणून त्यांनीं तें पसंत केलें. तेथें ग्रामोद्योग सुरू करतां येतील आणि शिवाय श्रीमंतांच्या वास्तव्यामुळें खर्चाची काळजी उरणार नाहीं असें त्यांना वाटलें.

'मी माझ्या आश्रमांत अस्पृश्यांना ठेवणार' हें गांधींनीं आधींच आपल्या आश्रयदात्यांकडून कबूल करवून घेतलें. अहमदाबादला श्री. जीवनलाल देसाई नांवाचे बॅरिस्टर होते. त्यांनीं गांधींना मदत केली. त्यांनीं आपला कोचराब बंगला आश्रमाकरतां भाड्यानें दिला.

या आश्रमाला नांव काय द्यावें? कोणी 'सेवाश्रम,' कोणी 'तपोवन,' अशीं नांवें सुचवलीं. पण गांधींना सत्याच्या द्वारां सेवा करायची होती, म्हणून त्यांनीं सत्याग्रहाश्रम हें नांव निश्चित केलें. त्याचबरोबर आश्रमाचे नियमहि त्यांनीं ठरविले. गांधींच्या परिवारांत आफ्रिकेंतून आलेले कांहींजण होते.

एकंदर १३ तामिळ बांधव व दुसरे १२ असें २५ स्त्रीपुरुष त्या आश्रमांत राहूं लागले.

आश्रम सुरू होऊन कांहीं महिने झाले होते. इतक्यांत गांधींच्या परीक्षेची वेळ आली. श्री. ठक्करबापांनीं गांधींना पत्र पाठविलें, 'एक गरीब व प्रामाणिक हरिजन कुटुंब तुमच्या आश्रमांत येऊं इच्छितें. तुम्ही त्यांना घ्याल का ?'

गांधींनीं आपल्या सहवासीयांचा सल्ला घेतला व तें हरिजन कुटुंब बोलावलें. त्या कुटुंबांत दुदाभाई, दानीबेन व त्यांची नुक्तीच चालूं लागलेली मुलगी लक्ष्मी होती.

त्यांच्या आगमनामुळें आश्रमाला देणग्या देणाऱ्यांत खळबळ उडाली. बंगल्याचा मालक अर्ध्या भागांत राही. दोघांची विहीर एकच. मालकांचा गडी आश्रमांतल्या मंडळींच्या बादलींतला पाण्याचा शिंतोडा उडाला तरी त्यांना व दुदाभाईना शिव्या देई. गांधींनीं सांगितलें, 'मुकाट्यानें शिव्या खा. उत्तर देऊं नका.' अक्रोधानें क्रोध जिंकला. शिव्या बंद झाल्या. त्याची त्यालाच लाज वाटली.

पण गांधींचे आश्रयदाते आश्रमाकडे फिरकेनात. त्यांनीं पैसा बंद केला. पैशाबरोबर आश्रमीय मंडळीवर सामाजिक बहिष्कार घालण्याच्या वाटाघाटी सुरू झाल्या. दुधदुभतें, धान्यधुन्य, लाकूडफाटा बंद झाला तर काय करणार ? गांधींचे आरंभींचे पाठीराखे दुरावले. पण गांधी म्हणाले, 'काहीं झालें तरी अहमदाबाद सोडायचें नाहीं. आपण अस्पृश्य वस्तींत जाऊन राहूं व तेथें शरीरश्रम करून पैसे मिळवूं.'

एके दिवशीं मगनलाल गांधी महात्माजींना म्हणाले, 'पैसा संपला आहे. पुढच्या महिन्याची वाट काय ?'

'तर मग अस्पृश्य वस्तींत चला.' गांधींनीं उत्तर दिलें. पण गांधींचा देवावर विश्वास होता. तो आपल्या मदतीला धांवून येईल अशी त्यांची श्रद्धा होती. ज्या दिवशीं मगनलालनीं पैसा संपल्याचें सांगितलें, त्यानंतर

देवगिरिकर त्र्यं. र.

थोड्याच दिवसांनीं सकाळीं एक मुलगा गांधींकडे धांवत आला आणि म्हणाला, 'बाहेर एक शेट मोटरमधून तुम्हांला भेटण्याकरतां आले आहेत.'

गांधी बाहेर गेले. शेटजींनीं आश्रमाला देणगी घेतां का म्हणून गांधींना विचारलें. गांधी म्हणाले, 'अत्यंत आनंदानें. खरं सांगायचें म्हणजे आमचा पैसा संपलाच आहे.'

'तर मग उद्यां मी याच वेळीं येईन. तुम्ही असालना इथं?' शेटजींनीं विचारलें.

'हो, अवश्य.' गांधींनीं उत्तर दिलें. दुसऱ्या दिवशीं ठरलेल्या वेळीं शेटजी आले. मोटारचा भोंगा वाजला. मुलें गांधींकडे धांवत गेलीं. गांधी बाहेर गेले. त्या शेटजींनीं गांधींच्या हातांत १३००० रुपयांच्या नोटा ठेवल्या व ते निघून गेले.

नगर वाचनालय सातारा
पाने - ११६
८८९९४
कि - २.५० रु
पृ - ६४

## ११. प्रार्थनेचा उगम

गांधीजी नोआखलीमध्यें हिंडत होते. ता. २८-११-४६ रोजीं श्रीरामपूर येथें त्यांचा मुक्काम होता. संध्याकाळच्या प्रार्थनेच्या वेळीं त्यांनीं आश्रमीय प्रार्थनेची सुरुवात कशी झाली व तिला सध्यांचें स्वरूप कसें प्राप्त झालें याचा इतिहास सांगितला.

गांधीजी म्हणाले, 'मी १९१५ सालीं हिंदुस्थानांत आलों. दीनबंधु अँड्र्यूज यांच्या मार्फत गुरुदेवानीं मला शांतिनिकेतनामध्यें यावयास व राहावयास बोलावलें. माझ्याबरोबर फिनिक्स वसाहतींल रहिवाशी होते, त्यांनाहि हें आमंत्रण होतें. काकासाहेब व हरिहर शर्मा तसेच अँडयूज व पिअर्सन तेथें होते. या मित्रांनीं तेथें एक दक्षिण आफ्रिका संघ बनविला होता. हें छोटें मंडळ त्या सुरुवातीच्या काळांत जी प्रार्थना करीत असे ती, विशेषतः त्या प्रार्थनेंतला संस्कृत भाग, आजहि तसाच आहे.'

गांधीजींनीं त्रावणकोरमध्यें हरिजनांच्या करतां दौऱ्यावर असतांना ईशोपनिषदांतील पहिला मंत्र त्या प्रार्थनेंत अंतर्भूत केला. तो मंत्र म्हणजे हिंदु आध्यात्म्यविचाराचा अर्क आहे असें गांधींचें मत. त्यानंतर रहिना तैयबजींनीं कुराण शरीफमधील एक उतारा प्रार्थनेंत घ्यावा असें सुचविलें व त्याला संमति मिळाली.

कस्तुरबांचें आगाखान राजवाड्यांत देहावसान झाल्यावर डॉ. गिल्डरनीं झोरास्ट्रिअन धर्मग्रंथांतील एक उतारा म्हटला, तोहि आश्रमीय प्रार्थनेंत प्रविष्ट झाला. त्याशिवाय हिंदी भजन व रामधुन यांचाहि प्रार्थनेंत समावेश केला आहे. अशा प्रकारें घडलेल्या प्रार्थनेला एका जातीची किंवा धर्माची प्रार्थना म्हणतां येत नाहीं. त्या प्रार्थनेला सर्वव्यापी स्वरूप आहे. त्यामुळें कोणीहि कोणत्याहि धर्माचा किंवा पंथाचा असला तरी त्यानें ती प्रार्थना म्हणावी, असें गांधींनीं सांगितलें.

गांधींनीं आपल्या सेवाग्रामच्या आश्रमांत 'नम्यो होरेंजे क्यो' असा पहिला मंत्र प्रार्थनेंत जो म्हटला जातो, त्याचा अर्थ ' बुद्धिमंतांना प्रमाण ' असा असल्याचें सांगितलें. एक जपानी बुद्धधर्मीय भिक्षु सेवाग्रामला दोन तीन वर्षे राहिला होता त्यांनीं हा मंत्र प्रार्थनेंत घातला. तो भिक्षु हिंदुस्थानांत जो आला तो, बुद्धधर्माचा उगम झालेल्या या देशांत, त्या धर्माचें रहस्य समजून घेण्याकरतां आला. तो भिक्षु स्वभावानें गोड होता. त्यानें आपल्या साध्यासुध्या वर्तनानें व निरवतेनें सर्वांचें प्रेम संपादन केलें. दररोज सकाळीं तासभर तो आश्रमाभोंवतीं प्रदक्षिणा घाली, आपल्याजवळील ढोलगें वाजवी आणि हा मंत्र म्हणे. त्या मंत्रांत गूढ संगीत असे व ऐकणाराचें चित्त त्या संगीतानें थरारे. पुढें जपानबरोबर ब्रिटिशांचें युद्ध सुरू झालें व त्या भिक्षूला आश्रमांतून नेण्यांत आलें. त्यानंतरहि तो मंत्र तेथें म्हटला जाई.

अशा प्रकारची आश्रमीय प्रार्थनेची कथा आहे.

नगर वाचनालय ता. सातारा

## १२. गांधी व भारत-सेवक-समाज

बापूजींनीं अस्पृश्यतेसंबंधीं आपलीं व भारतसेवकसमाजांतील मंडळींचीं जीं बोलणीं झालीं त्यांसंबंधीं एकदां येरवड्याच्या तुरुंगांत चालतां चालतां हकीगत सांगितली. प्रश्न डॉ. आंबेडकरांवरून निघाला. गांधीजी म्हणाले, 'मी विलायतला जाईपर्यंत मला आंबेडकर अस्पृश्य आहेत हें माहित नव्हतें. मी समजत होतों कीं, ते ब्राह्मण आहेत; आणि अस्पृश्यांबद्दल फार कळवळा वाटत असल्यामुळें ते तळमळून त्यांच्या दुःखांबद्दल अत्युक्तीनें बोलतात.'

बोलतां बोलतां भारतसेवकसमाजाच्या अस्पृश्यतेकडे पहाण्याच्या दृष्टी-संबंधीं प्रश्न निघाला.

गांधी म्हणाले, 'या प्रश्नाला आज जें स्वरूप आलें आहे, त्याला या लोकांची वृत्ति जबाबदार आहे. १९१५ सालीं गोखले वारल्यावर मी भारतसेवकसमाजाच्या हॉलमध्यें राहिलों होतों, तेव्हांच मी तें पाहिलें. त्या प्रसंगाची मला बरोबर आठवण आहे. मी देवधरांकडे त्यांची ह्या प्रश्नाकडे पहाण्याची प्रवृत्ति काय आहे हें समजून घेण्याकरतां छोटेंसें टिपण मागितलें. त्या टिपणांत, अस्पृश्यांत जावें व भाषणें करावींत, त्यांच्यावर चाललेल्या जुलमाची कल्पना देऊन त्यांना जागृत करावें, वगैरे लिहिलें होतें. मीं देवधरांना म्हटलें, "हें तर मीं भाकरी मागितली त्याच्या बदला दगड मिळाले असें झालें. या रीतीनें तुम्ही अस्पृश्योद्धार कसा करणार? ही सेवा नाहीं. ही श्रेष्ठत्वाची वृत्ति आहे. अस्पृश्यांचा उद्धार करणारे आपण कोण? आप-ल्याला तर या लोकांसंबंधीं केलेल्या पापाचें प्रायश्चित्त घ्यायचें आहे, ऋण फेडावयाचें आहे. ऋण त्यांना आपलेंसें करून फेडतां येईल; भाषणें केल्यानें काय होणार—?" शास्त्री अडखळले आणि म्हणाले, "तूं अशा प्रकारें न्यायासनावर चढून बोलशील अशी आशा आम्हीं बाळगली नव्हती." हरि

नारायण आपटे पण पुष्कळ चिडले. त्यांना मीं म्हटलें, " तुम्ही समाजांत बंड कराल असें मला वाटतें." आपटे म्हणाले, "होईना बंड. मी तें करीन." अशा प्रकारें पुष्कळ चर्चा झाली. मी दुसऱ्या दिवशीं शास्त्री, देवधर, आपटे, या सर्वांना म्हटलें, " मी तुम्हांला दुःख देईन असें मला वाटलें नाहीं. " मी त्यांची क्षमा मागितली. त्याचा त्या मंडळीवर चांगला परिणाम झाला. त्यांचें व माझें जमलें. "

वल्लभभाई म्हणाले, ' तुमचें तर सर्वांबरोबरच जमतं. तुमचं काय ? वाण्याची मिशी खालीं. ' गांधी म्हणाले, ' पहाना, म्हणून तर मी मिशा काढून टाकल्यात. '

## १३. राजेंद्रबाबूंची व कृपलानींची ओळख

गांधी नांवाचा कोणी एक गरिबांचा वाली हिंदुस्थानांत आला आहे, अशी बातमी चंपारणांतील निळीच्या लागवडीनें त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या कानांवर गेली होती. गांधींनीं आपल्या प्रदेशांत यावें व 'गजेंद्रमोक्ष' करावा अशी त्यांची साहजिक इच्छा होती. पण हें घडावें कसें ? १९१६ च्या डिसेंबरमध्यें लखनौ कॉंग्रेस झाली. लो. टिळक सुरतेनंतर प्रथमच कॉंग्रेसमध्यें आले होते. त्या कॉंग्रेसमध्यें निळीच्या गाऱ्हाण्यांसंबंधीं एक ठराव बिहारच्या प्रतिनिधींनीं मांडला. म. गांधींनीं त्यावर बोलावें अशी त्यांची इच्छा. पण गांधींना चंपारण कुठें आहे व तेथें काय गाऱ्हाणीं आहेत याची यत्किंचित्‌हि माहिती नव्हती.

पण गांधींनीं आपण चंपारणांत येऊं व प्रत्यक्ष परिस्थिति पाहूं असें तेथील शेतकऱ्यांजवळ कबूल केलें. शेतकऱ्यांचे प्रतिनिधि राजकुमार शुक्ल हे त्या कॉंग्रेसमध्यें निळीच्या दुःखांबद्दल फार कळवळ्यानें बोलले. गांधी कलकत्त्याला ऑल इंडियाच्या सभेकरतां एप्रिलमध्यें गेले होते व त्यांनीं राजकुमार शुक्लांना

कळविलें कीं, मी चंपारण्यांत यावयास तयार आहें. त्याप्रमाणें ९ एप्रिल रोजीं म. गांधी, हे राजकुमारबरोबर कलकत्त्याहून निघाले व १० एप्रिलला पाटण्याला पोहोंचले. बिहारचे प्रतिनिधि कलकत्त्यालाच होते. त्यांना या घडामोडी ठाऊक नव्हत्या.

राजकुमार शुक्ल म. गांधींना उतरवण्याकरतां बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या घरीं घेऊन गेले. पण राजेंद्रबाबू कलकत्त्याला होते. पाटण्याच्या स्टेशनावर गांधींच्या स्वागताकरतां अगर दर्शनाकरतां कोण हजर असणार ? असा ह्या अज्ञात पुरुष राजेंद्रबाबूंच्या घरीं गेला, तेव्हां त्यांची चांगलीच संभावना झाली. राजेंद्रबाबूंच्या घरीं एका नोकराशिवाय कोणी नव्हतें. त्या नोकरानें 'बाबूजी घरीं नाहींत' एवढेंच सांगितलें. त्या बिचाऱ्याला काय ठाऊक एक थोर पुरुष आपल्या घरीं आला आहेत तें !

आतां काय करणार ? राजकुमार शुक्लांना कांहीं सुचेना. गांधीजी थोडा वेळ विश्रांतीकरतां तेथेंच बसले. म. गांधी आल्याची वार्ता मझरुल हक यांना नंतर समजली व ते गांधींना आपल्या घरीं घेऊन गेले. पाटण्याला राजेंद्रबाबूंच्या घरीं अशा प्रकारें गांधी आले व गेले.

पाटण्याच्या मंडळींनीं गांधींना मुझफरपूरला त्याच दिवशीं सायंकाळीं पाठविण्याचें ठरविलें. मुझफरपूरला याच अनुभवाची आवृत्ति व्हावयास नको म्हणून तेथील मंडळींनीं प्रो. जे. बी. कृपलानी यांना तार केली. त्या वेळीं आचार्य कृपलानी हे तेथील कॉलेजांत प्रोफेसर होते. महात्माजी राजकुमारबरोबर मुझफरपूरला निघाले. रात्रींचे १० वाजतां गाडी मुझफरपूरला पोहोंचली. प्रो. कृपलानी आपल्या कांहीं शिष्यांसह स्टेशनावर आले होते. त्यांनीं गांधींचें नांव ऐकलें होतें; पण त्यांना पाहिलें नव्हतें. त्यांनीं गांधीबरोबर पत्रव्यवहारहि केला होता. आचार्य कृपलानी आपल्या शिष्यांसह गांधींना धुंडत इकडे तिकडे धांवपळ करीत होते. राजकुमारांनाहि कृपलानी ठाऊक नव्हते. पण त्यांनीं स्टेशनवरील गर्दी पाहिली व अनुमानानें ताडलें कीं, हेच

कृपलानी असावेत व तेच गांधीकरतां आले असावेत. ते त्या गर्दीकडे गेले व त्यांनीं कृपलानींना गांधी दाखविले. अशा प्रकारें आचार्य कृपलानींची व गांधींची ओळख झाली.

स्टेशनवर लोकांनीं गांधींचें स्वागत केलें, आरती ओवाळली व त्यांची गाडी ओढली. त्या रात्रीं गांधी कृपलानींबरोबर विद्यार्थ्यांच्या वसति-गृहांत राहिले.

एका दिवसांत राजेंद्रबाबू व कृपलानी यांच्याबरोबर अशा प्रकारें गांधींचा परिचय झाला !

## १४. जिवावरचें दुखणें. शेळीचें दूध कसें घेतलें

गांधी एक विचित्र गृहस्थ होते. ते आपल्या प्रकृतीबरोबरहि अहिंसेचे खेळ खेळत. पहिल्या महायुद्धांत ते सरकारला रिक्रूट पुरवीत. त्याकरतां वणवणा हिंडत. या दौऱ्यांत ते लिंबें व भुईमुगाचें लोणी खात. हें लोणी खाण्यांत त्यांनीं संयम पाळला नाहीं. त्यामुळें त्यांना अतिसार झाला. उपास, नियमित आहार, वगैरे गांधीजी पुढें करूं लागले. एकदां सण होता. कस्तुरबांच्या आग्रहामुळें गांधींनीं त्या सणाला तेलांतली गव्हाची खीर आणि वाटीभर मुगाची उसळ खाल्ली. त्यामुळें त्यांचें हें अति-साराचें दुखणें वाढलें.

त्याच रात्रीं त्यांना नडियादला जायचें होतें. ते साबरमती स्टेशनवर मोठ्या प्रयासानें चालत गेले. वल्लभभाई अहमदाबादला त्यांना भेटले. गांधींच्या पोटांत पिळवटून येत होतें; पण त्यांनीं वल्लभभाईंना त्याची दाद लागूं दिली नाहीं. रात्रीं दहा वाजतां ते नडियादला पोहोंचले. स्टेशनपासून उतरण्याचें ठिकाण अर्ध्या मैलावर होतें. पण गांधींना तें अंतर दहा मैल वाटलें. त्यांचा प्राण हैराण झाला होता. गांधींनीं घरीं पोचल्यावर कमोड

मागवला. गांधींना त्याची लाज वाटली. गांधींच्या भोंवतीं सचिंत मुद्रेनें सारे जण जमा झाले. डॉक्टरना बोलावलें. पण गांधींना डॉक्टरांचा काय उपयोग ? औषधाचे ते वैरी. त्यांना चोवीस तासांत ३० ते ४० जुलाब होत. खाणेंपिणें गांधींनीं अजिबात बंद केलें.

डॉ. कानुगा आले व औषध घ्या म्हणूं लागले. इंजेक्शनहि घेण्याचा ते आग्रह करूं लागले. पण गांधींचें इंजेक्शनबद्दल अगाध ज्ञान होतें ! त्यांत प्राण्याची लस असते असलें त्यांचें ज्ञान ! पुढें त्यांना इंजेक्शनमधील द्रव्यांत प्राणिज पदार्थ नसतो हें समजलें; पण तें फार उशीरां. त्यांना ताप येऊं लागला. त्यांत वात झाला. कमालीचा थकवा आला. स्नेहीमंडळी घाबरली. त्यांनीं पुष्कळ डॉक्टर्स आणले. पण डॉक्टर्स औषध न घेणाऱ्या रोग्याला कसें बरें करणार ? शेट अंबालाल आपल्या पत्नीसह नडियादला गेले; व ते गांधींना अहमदाबादला घेऊन परतले. एका बंगल्यांत त्यांना ठेवलें. तेथें त्यांची इतकी प्रेमळपणें शुश्रूषा करण्यांत आली कीं, गांधीहि कृतज्ञतेनें गहिंवरले. त्यांना आतां बारीक ताप सुरू झाला. आपण आतां मरणार असें गांधींना वाटूं लागलें. मरायचें तर आश्रमांत मरावें या भावनेनें त्यांनीं आश्रमांत मला न्या असा हट्ट धरला. त्यांच्या हट्टापुढें कोणाचें चालणार ? आश्रमांत आल्यावर त्यांना एके रात्रीं आपला अंतकाळ आतां जवळ आला असें वाटलें. अनुसूया बेनना त्यांनीं बोलावणें पाठवलें. त्या घाबरत घाबरतच आल्या. वल्लभभाई डॉ. कानुगांना घेऊन धांवत आले. डॉक्टरनीं नाडी पाहिली. नाडी उत्तम आहे, तुम्हांला भय नाहीं, प्रकृति फार क्षीण झाली आहे त्यामुळें तुमचा जीव घाबरा झाला आहे असा डॉक्टरनीं अभिप्राय दिला. गांधींना खात्री वाटेना. रात्रभर ते मृत्यूची वाट पहात होते. सकाळ झाली; पण मृत्यु कांहीं आला नाहीं. तथापि मृत्यूच्या कल्पनेनें गांधींना सोडलें नाहीं. त्यांनीं आश्रमांतल्या मंडळींना गीतापठण करण्यास सांगितलें. दिवसभर

गीतापाठ सुरू होता. पण मृत्यूनें तोंड दाखवलें नाहीं. गीतापाठाला तो भ्याला तर नसेल ना ?

गांधींची प्रकृति इतकी क्षीण झाली कीं, तोंडांतून शब्द निघेना. गांधी म्हणतात, 'अंथरुणावर पडून दुसऱ्याकडून सेवा करून घेण्याचे आणि कणाकणानें देह झिजत जाण्याचे क्लेश मला असह्य झाले.'

मृत्यूची मार्गप्रतीक्षा करीत असतांना एकदां डॉ. तळवळकर एका विचित्र प्राण्याला घेऊन गांधींकडे गेले. तो विचित्र प्राणी महाराष्ट्रीय होता. 'माझ्यासारखाच तो चक्रम होता' असें गांधींनीं त्याचें वर्णन केलें आहे. तो गांधींवर प्रयोग करण्याकरतां तेथें गेला होता. ग्रँट मेडिकल कॉलेजांतला त्याचा अभ्यास संपला होता; पण परीक्षा झाली नव्हती. त्यांचें नांव केळकर होतें. ते म्हणत, कोणताहि रोग बर्फाच्या उपचारानें बरा होतो. त्यांना 'आईस डॉक्टर' असें नांव आश्रमांतल्या मंडळीनें दिलें. त्यांची हिमोपचाराची श्रद्धा गांधींत प्रविष्ट झाली नाहीं. पण गांधींनीं आपला देह प्रयोगाकरतां त्यांच्या स्वाधीन केला. साऱ्या शरीरावर ते बर्फ ठेवीत. त्यांच्या प्रयोगामुळें आपल्याला बरें वाटतें का नाहीं हें स्वतः गांधींना जरी सांगतां आलें नाहीं तरी त्या उपचारामुळें नवी आशा व नवा उत्साह त्यांना वाटला आणि मन प्रफुल्लित झालें. पुढें त्या राजश्रींनीं गांधींना इतर डॉक्टरांप्रमाणें अंडीं घेण्यास सांगितलें, निर्जीव अंडीं घेण्यास सांगितलें, आणि गांधींनीं त्यांचा उपचार सोडला.

त्यानंतर डॉक्टरांनीं त्यांना माथेरानला हवा पालटण्यास जाण्याचा सल्ला दिला. गांधी माथेरानला गेले. पण तेथील जड पाणी त्यांना मानवेना. आठवड्याच्या आंत ते तेथून परतले. नंतर त्यांना डॉ. दलालांना दाखवण्यांत आलें. डॉ. दलाल म्हणाले, 'तुम्हीं दूध घेतलें नाहीं, तर मला तुमच्या शरीराची पुनर्रचना करतां येणार नाहीं. त्याशिवाय तुम्ही लोहाचीं व अर्सेनिकचीं

नगर वाचनालय सातारा



इंजेक्शनें घेतलीं पाहिजे. एवढें केलेंत म्हणजे तुमची प्रकृति सुदृढ करण्याची मी हमी घेतों.'

गांधींनीं 'दूध घेणार नाहीं; फार तर इंजेक्शन्स घेईन. दूध न घेण्याची मीं प्रतिज्ञा घेतली आहे" असें उत्तर दिलें.

डॉक्टरनीं दूध न घेण्याची प्रतिज्ञा कां केलीत असें विचारलें असतां गांधींनीं फूका पद्धतीमुळें मला दुधाची शिसारी वाटते असें सांगितलें. शिवाय तें नैसर्गिक अन्न नाहीं असेंहि गांधी म्हणाले.

कस्तुरबा जवळ उभ्या होत्या. त्या म्हणाल्या, 'तर मग शेळीच्या दुधाला तुमची हरकत असतां कामा नये.'

डॉक्टर म्हणाले, 'शेळीचें दूध घेतलेंत तरी चालेल.' गांधी या युक्तिवादाला शरण गेले. पण त्यांना जन्मभर आपण प्रतिज्ञा मोडली असें सारखें वाटत होतें. सत्याग्रहाच्या लढ्याकरतां जिवंत राहिलें पाहिजे या विचारानें त्यांना पराभूत केलें. पुढें गांधींच्यावर शस्त्रक्रिया करण्यांत आली व त्यांची प्रकृति सुधारली.

## १५. खादीचा शोध

गांधी म्हणतात, 'मी १९०८ सालीं हिंद स्वराज्यांत हातमाग व चरखा हे हिंदुस्थानच्या दारिद्र्यावर रामबाण इलाज आहेत असें म्हटलें तेव्हां मी चरखा किंवा हातमाग पाहिला नव्हता.' १९१५ सालीं गांधीजी आफ्रिकेंतून हिंदुस्थानांत आले तेव्हांहि त्यांनीं ह्या वस्तू पाहिल्या नव्हत्या.

एकदां आश्रमांत त्यांनीं ठरविलें, उद्यांपासून गिरणीचा कपडा टाकायचा व हातमागाचा कपडा वापरायचा. सर्व आश्रमवासीयांनीं तो निर्णय घेतला. हातमागाच्या कपड्याचा निश्चय केल्यामुळें गांधींना विणकऱ्यांचीं दुःखें व गाऱ्हाणीं समजून आलीं.

ते विणकर परदेशी सूत वापरत. देशी सूत वापरण्याइतका त्याग करणारे विणकर गांधींनीं फार कष्टानें शोधून काढले. देशी सुताला हात लावणें ते कमीपणाचें मानीत. विणकरांना देशी सूत पुरविणेंहि कमी त्रासाचें नव्हतें. ज्या गिरण्या सूत तयार करीत, त्याच तें सूत विणीत. हातमागाला कोठून सूत आणावयाचें ? गिरण्यांची मनधरणी करण्याची पाळी गांधींवर आली. गिरणीवाल्यांनीं मोठ्या नाखुषीनें सूत पुरविण्याचें कबूल केलें. विणकर म्हणत, 'आम्ही जो कपडा विणूं तो तुम्ही सर्वच्या सर्व खरेदी केला पाहिजे.' गांधीजी त्याला कबूल झाले.

पण गिरणीवर अवलंबून रहाणें मोठें सुखावह नव्हतें. शिवाय गिरणीच्या सुतानें हिंदुस्थानच्या प्रश्न कसा सुटणार ? आपण स्वतः सूत कांतलें पाहिजे. तसें झालें तरच हिंदुस्थानांतील गरीब माणूस स्वावलंबी होईल. पण सूत कसें कांतावयाचें ? चरखा कुठें आहे ? एकदां कालिदास जव्हेरीनें एक बाई सूत कांतते अशी गांधींना बातमी दिली. गांधींनीं आश्रमांतला एक कलातज्ज्ञ तिजकडे पाठवला. पण तोहि ती कला आपल्याला उमगत नाहीं असें म्हणत परत आला.

१९१७ सालीं महात्माजींना भडोच येथें गंगाबेन मुजूमदार नांवाची एक असामान्य स्त्री भेटली. ती विधवा होती. घरची श्रीमंत होती. ती धाडशी होती, फार हुशार होती. तिच्या जवळ गांधींनीं आपल्या चरख्याची करुण कहाणी अंतःकरण उलगडून सांगितली. तिनें गांधींना वचन दिलें, 'मी चरखा पाहतें.'

गंगाबेन हिंडल्या. वणवण हिंडल्या. शेवटीं त्यांना बडोदा संस्थानांत विजापूरला चरखा सांपडला. विजापूरला पुष्कळांच्या घरीं चरखे होते; पण ते अडगळींत पडले होते. गंगाबेनला ते म्हणाले, 'आम्ही सूत कांतूं. आम्हांला पेळू द्या आणि आमचें सूत विकत घेण्याचें कबूल करा.' कोलंबसाला अमेरिका सांपडल्यानें जितका आनंद झाला तितका आनंद चर-

ख्याच्या शोधामुळें गंगाबेनला झाला. गांधींना त्यांनीं ही वार्ता कळवली. पण पुढें काय ? पेळू कोठून आणावयाचे ? गांधींच्याजवळ उमर सोभानी बसले होते. ते म्हणाले, मी गिरणींतून पेळू पाठवितों. उमर सोभानींकडून आलेले पेळू गांधींनीं गंगाबेनकडे दिले. विजापूरहून सूतच सूत येऊं लागलें. आतां निराळाच प्रश्न आला. या सुताचें करायचें काय ? किती सूत विकत घेणार व तें ठेवणार तरी कुठें ?

गांधींना वाटलें गिरणीचे पेळू वापरणें चूक आहे. पेळू वापरायचे तर गिरणीचें सूत कां वापरायचें नाहीं ? पूर्वी कुठें पेळू पुरवणाऱ्या गिरण्या होत्या ? गंगाबेनना गांधी म्हणाले, 'पिंजारी शोधून आणा. त्यांना पेळू करायला सांगूं.' गंगाबेननें पिंजारी आणला. त्यानें महिना ३५ रुपये मागितले. गांधी अडलेच होते. गंगाबेननीं लहान मुलांना पिंजलेल्या कापसाचे पेळू कसे करतात तें शिकविलें.

अशा प्रकारें गांधींना नव्हे पण गंगाबेनना ह्या खादी संशोधनाचें श्रेय दिलें पाहिजे. पुढें हा चरखा आश्रमांत आला. मगनलाल हे मोठे कल्पक होते. त्यांनीं जुन्या चरख्यांत नवें कौशल्य घातलें. आश्रमांत चरखे होऊं लागले. 'अशा प्रकारें जन्म पावलेला खादीचा पाहिला तुकडा' गांधी म्हणतात, '१७ आणे वार पडला'. त्या वेळीं २ आणे वार कापड मिळत होतें. त्या मानानें खादी म्हणजे एक रेशमी वस्त्राचेंच मोल पावली होती.

गांधी आपल्या मित्रांना ही महाग खादी घ्यायला लावीत व ते एक अपरूप वस्तू म्हणून घेत.

गांधींनीं पुढें आश्रमांतच पिंजण शिकणारे तयार करविले. कपड्याच्या बाबतींतला संपूर्ण स्वावलंबनाचा प्रयोग यशस्वी झाला.

गांधी म्हणतात, 'संपूर्ण खादीधारी होण्याला मी उतावळा झालों होतों. माझें धोतर अद्याप गिरणीचें होतें. आमच्या आश्रमांतली जाडीभरडी

खादी ३० इंच पन्ह्याची होती. मी गंगाबेनना कळविलें, महिन्यांत ४५ इंची खादी तयार केली नाहींत, तर मी ३० इंची पंचा नेसेन. '

बिचाऱ्या गंगाबेन हें ऐकून घाबरल्या. त्यांनीं गांधींची प्रतिज्ञा खोटी होऊं दिली नाहीं.

अशा प्रकारें खादीधारी झालेले गांधी हिंदुस्थानला खादीधारी करण्याचा व चरख्याच्या द्वारां हिंदुस्थानला अहिंसावादी व स्वतंत्र करण्याचा मार्ग आक्रमूं लागले.

## १६. गांधीजी संन्याशाच्या वेषांत

१९२१ च्या सप्टेंबरमधील हकीगत. गांधीजी मद्रास प्रांतांत दौऱ्यावर होते. ती लोकांची गर्दी, ती बेशिस्त, ती आरडाओरड, तो गोंधळ पाहून गांधींचें मन खिन्न होई. या गिलाव्यांतून त्यांना सत्याग्रहाचे सैनिक तयार करावयाचे होते !

गांधींना वाटे, आपण खादीचा इतका प्रचार करतों; पण लोक कांहीं खादी वापरीत नाहींत. या प्रकाराचा गांधींच्या मनावर इतका परिणाम झाला कीं, त्यांनीं स्वतःलाच शिक्षा करून घेण्याचें ठरविलें. ही शिक्षा प्रायश्चित्त म्हणून होती.

डिंडिगलला आगगाडींत बसल्या बसल्या त्यांनीं एक पत्रक गर्दीनें लिहिलें आणि तें पत्रक सर्व वृत्तपत्रांकडे पाठवून दिलें. त्या पत्रांत त्यांनीं लिहिलें, 'मी महिनाभर धोतर, सदरा, टोपी टाकून देणार असून फक्त पंचा व जरूर तर उपरणें वापरणार आहें.' जणूं काय महिन्या भराचें अशौच पाळावें असा त्या लिहिण्यांत सूर होता. जे अत्यंत गरीब होते व ज्यांना खादी वापरणें अशक्य होतें त्यांच्याकरतां हा फकिरी वेष होता. महात्माजींनीं त्या पत्रकांत

आपल्या सर्व कार्यकर्त्यांना सांगितलें कीं, महिनाभर सर्व कार्यक्रम थांबवा आणि खादी उत्पत्तीचा कार्यक्रम हातीं घ्या.

गांधीजींचा मुक्काम त्या वेळीं मदुरेला होता. त्यांना असंख्य लोक भेटायला येत. कांहीं स्त्रिया आल्या, त्यांनीं संस्कृतमध्यें गांधीजींच्या स्तुतिपर गाणीं म्हटलीं; पण गांधींचें तिकडे लक्ष नव्हतें. ते अत्यंत गंभीर झाले होते. ज्वालामुखीचा स्फोट जवळ व्हावा, तसे भाव त्यांच्या चेहऱ्यावर उमटत होते. रात्रीचें १० वाजतां त्यांनीं एका न्हाव्याला बोलवा म्हणून सांगितलें. रात्रीं १० वाजतां न्हावी ! काय, बापूजींच्या मनांत तरी काय आहे ! चहूंकडे गंभीरता पसरली.जो तो आपल्या ठिकाणीं चूर झाला. न्हावी आला. त्यानें प्रथम गांधींच्या पायांवर डोकें ठेवलें. गांधींनीं त्याला माझी सारी हजामत कर म्हणून सांगितलें. तो बिचारा अत्यंत काळजीपूर्वक हजामत करूं लागला. त्याला गांधींनीं पैसे देऊं केले; पण त्यानें ते नाकारले.

गांधीजी आतां राजकारण सोडून संन्यासी होणार हीच एक भीति सर्वांना वाटली. सर्वजण त्यांच्याभोंवतीं गोळा झाले आणि बरीच रात्र झाली तरी प्रत्येकजण शब्द दोन शब्द बोलून त्यांना 'असें करूं नका' अशी प्रार्थना करीत राहिला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यांचा दौरा सुरू होणार होता. गांधी पहांटे उठले व त्यांनीं आपला नवा वेष धारण केला. श्री. राजगोपाळाचार्य व डॉ. राजन यांना ही; बातमी कळली. राजाजींनीं पुष्कळ युक्तिवाद केला पण गांधींच्यापुढें कोणाचें काय चालणार ? गांधी म्हणाले, 'मी संन्याशी होणार नाहीं. मद्रासमध्यें असला वेष तर अनेकांचा आहे; तेव्हां माझ्या वेषामुळें तुम्हांला आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. मद्रासमध्यें मला खादी दिसत नाहीं व खादी वापरण्याची प्रवृत्तीहि नाहीं. माझें अंतःकरण ही अवस्था पाहून रक्तबंबाळ झालें आहे. माझा पोशाख त्या दुःखाचें प्रतिबिंब आहे.' त्या रात्रीं गांधींच्या डोळ्याला पळभर सुद्धां डोळा लागला नाहीं.

त्यांनीं ३ वाजतांच अंथरुण सोडलें. रात्रभर ते या नव्या निर्णयावर डोकें शिणवीत होते.

महात्माजी या नव्या वेषांत प्रथम कराई-कुडीला गेले. चार गाड्या बाहेर उभ्या होत्या. सारेजण दुःखित चेहऱ्यानें अगदीं गपचूप उभे होते. सूर्य उगवला त्याच्या किरणांची रक्तिमा गांधींच्यावर पडली आणि एक नवें तेजोवलय त्यांच्याभोंवतीं निर्माण झालें.

## १७. सामान नेण्याची तयारी

११ ऑक्टोबर १९२१ ची एक आठवण गांधींचे चिटणीस कृष्णदास यांनीं आपल्या पुस्तकांत दिली आहे. आठवण साधीच आहे; पण उद्बोधक आहे.

१९३० सालापासून म. गांधी हे रेल्वे स्टेशनवर उतरत नसत. गर्दी, जयजयकार, दर्शन, वगैरेंची उपाधि त्यांच्या प्रकृतीला मानवेनाशा होत होती. त्यामुळें ते कोठें तरी चढत व कोठें तरी उतरत. रेल्वे त्यांच्याकरितां एवढी सोय करी. गर्दीचा संभव नसला तर गांधी इतर उतारूंप्रमाणें स्टेशनवर चढत-उतरत.

१९२१ सालीं गांधींच्या मागें जनसमुदाय नसे असें नाहीं. पण एकदां असें घडलें. त्यांना मुंबईहून सुरतला जायचें होतें. १० वाजेपर्यंत मुंबईला त्यांच्या भेटीगांठीं चालल्या होत्या. ग्रँडरोड स्टेशनवरून ते सुरतला जाणार होते. त्यांच्या जाण्याचा कोणाला सुगावा नसावा. गाडीला दोनच मिनिटें कमी असतां ते स्टेशनवर पोंहोचले. देवदासनें गर्दी करून तिकिटें काढलीं. कृष्णदासनें हमालाच्या डोक्यावर सामान दिलें आणि लहान लहान वस्तू हातांत घेतल्या. गांधींनीं दोन्ही हात पुढें केले आणि 'आण, मी सामान घेतों' असें म्हटलें. अर्थात् कृष्णदासनें त्यांना सामान घेऊं दिलें नाहीं.

पण गांधींची वृत्ति आपण कोणी मोठें आहों ही नव्हतीच. ते आपल्या परिवारांतल्या मंडळीपेक्षां स्वतःला निराळे मानत नव्हते.

गांधींना सामान दिलें नाहीं, तरी ते मागें राहून सर्व सामान येतें का नाहीं आणि तें गाडींत व्यवस्थितपणें ठेवलें जातें कीं नाहीं हें बारकाईनें पहात होते. कांहीं मदत लागली तर ती करावयास ते तयार होते. त्यांची मदत देवदास व कृष्णदास यांना लागली नाहीं. पण त्यांची मदत करण्याची उत्सुकता मोठी हृदयाला भिडणारी होती.

## १८. तारांच्या कागदाचे लिफाफे

एकदां कृष्णादास दुपारच्या वेळीं गांधींच्या खोलींत गेले. गांधी मोठ्या आनंदानें स्वतःशींच हसत आहेत, असें त्यांना दिसलें. गांधींच्या हंसण्याचें व आनंदाचें कारण काय ?

कृष्णदासना गांधी म्हणाले, ' आपल्याकडे इतक्या तारा येतात, त्यांचें काय करावें हें मला कळत नव्हतें, म्हणून मी तारांचे कागद फाडून टाकीत असें. मला हा कागदांचा नाश करतांना बरें वाटत नसे. त्यांचा काय उपयोग करतां येईल त्याचा मी विचार करीत होतों. पण मला आतां एक उपाय सांपडला.' असें म्हणून त्यांनीं तारेचा एक कागद घेतला आणि त्याची घडी कशी घालावी व लिफाफा कसा करावा हें दाखवलें. कृष्णदासना हा नवाच उद्योग लागला.

गांधीजी आपल्या पत्राकरितां ह्या लिफाफ्यांचा उपयोग करूं लागले. त्या लिफाफ्यांना त्यांनीं ' पेटंट एन्व्हलप्स ' असें नांव दिलें. ते स्वतः हे लिफाफे आनंदानें वापरीत. आश्रमांत कांहीं काळ ही सांथच पसरली असेल. पण गांधींची उपयोगप्रवण दृष्टि त्यांत दिसते. प्रत्येक वस्तूचा जास्तींत जास्त उपयोग केला पाहिजे हें त्यांचें तत्त्व होतें. त्यामुळें पैसे

वांचत. गांधीजी हे लिफाफे जसे वापरत तसेच आलेले लिफाफे फाडून त्याचा लिहिण्याकरितां उपयोगहि करीत. पत्र लिहिण्याऐवजीं कार्ड लिहिण्याकडे त्यांचा कटाक्ष. चार ओळींकरितां पत्र लिहिणें आणि पोस्टांना जास्त पैसे देणें त्याना पसंत नसे. कोणी अशीं पत्रें लिहिलीं तर त्याला ते असला अनाठायीं खर्च न करण्याकरतां बजावीत व थोडक्यांत पत्र लिहा असें म्हणत. वॉर एकॉनमी म्हणून शेवटीं शेवटीं ज्या गोष्टी सरकार करूं लागलें आहे, त्याची सुरुवात गांधींनीं फार पूर्वीच केली होती.

## १९. प्रोफेसरांना संदेश

गांधी मोठे विनोदी होते. विनोदामुळें मी जिवंत रहातों असें अनेक वेळ ते म्हणत. त्यांचा विनोद अभिजात व मार्मिक असे.

एकदां मुंबईच्या एका राष्ट्रीय विद्यालयाचे कांहीं शिक्षक त्यांना भेटावयास आश्रमांत गेले. दिवस दिवाळीचे होते व शिक्षकांना सुटी होती. तेव्हां सुटी कोठें तरी घालवावी म्हणून ते साबरमतीला गेले. आम्ही आमची सुटी कशी घालवावी असा एक प्रश्न त्यांनीं गांधींना विचारला. तो गांधींचा मौनवार होता. त्यांनीं एका कागदावर पुढील संदेश दिला:

पिंजा, काता, विणा<br>
काता, विणा, पिंजा,<br>
विणा, पिंजा, काता.

## २०. दर्शनाकरतां गर्दी

गांधींचा आश्रम पहाणें व त्यांचें दर्शन घेणें ह्याचें वेड स्थानिक व परप्रांतिक लोकांना फारच लागलें. त्याकरतां गरीब-श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित असे सर्वचजण आश्रमांत जात. एकादशीला आणि सणावाराला आश्रमांत दर्शनोत्सुक लोकांची मोठी गर्दी लोटावयाची.

हे भाविक सज्जन गांधींना नमस्कार करून जाते तरी ठीक होतें. त्यांच्या जाण्यायेण्यामुळें, भेटींमुळें व प्रश्नोत्तरांमुळें गांधींचा वेळ जायचा तो गेला असता. पण त्याशिवाय ते आणखी एक गोष्ट करीत. जसें आपण देवाला गेलों म्हणजे देवापुढें पैसा ठेवतों, तसे हे दर्शनेच्छु त्यांच्यापुढें पैशापासून दहादहा रुपयांपर्यंत रकमा ठेवीत. देवळांत ज्याप्रमाणें तांदुळ, सुपारी, खारका, पेरू जमा होतात तसाच हा प्रकार होऊं लागला. गांधींना पैसा नको होता असें नाहीं; पण ज्यांत ही अंधश्रद्धाळूपणाची वृत्ति आहे ती त्यांना अमान्य होती. गांधींच्या खोलीकडे गर्दी लोटत असे, त्यामुळें काम करणें त्यांना अशक्य होऊं लागलें. त्यामुळें त्यांच्या खोलीकडे जाण्यास बंदी करण्यांत आली.

## २१. काय या गाडींत गांधी आहेत ?

८ नोव्हेंबर १९२१ ची ही गोष्ट आहे. लालाजींनीं अनेक वेळ विनंति केल्यावरून गांधींनीं पंजाबांत जाण्याचें कबूल केलें. मथुरेचा कार्यक्रम आटोपून गांधीजी आपल्या परिवारासह पेशावर मेलनें लाहोरला चालले होते. मथुरेला मंडळी गाडींत चढली. वाटेंत दिल्लीला तासभर गाडी थांबे. रात्रीं ९ वाजतां गांधी आपल्या डब्यांत झोंपीं गेले. ते सेकंड क्लासांत होते आणि त्या डब्याशेजारीं ‘ सर्व्हंट्सचा ’ डबा होता. त्या डब्यांत गांधींचे मंत्री कृष्णदास बसणार होते. पण ते आंत जाणार तों दारांत उभ्या असलेल्या

सशस्त्र गुरखा शिपायानें त्यांना रोकलें. मौलाना आझाद, सोभानी, बरोबर असलेले अनवार पुढें झाले व त्यांनीं त्या गुरख्याला चांगलें झाडलें. त्यामुळें तो गुरखा संतापानें लाल होऊन आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला ही हकीगत सांगण्यास गेला. त्याचे अधिकारी हे इंग्लिश गृहस्थ होते. ते आले व असभ्य शब्दांत जोरानें ओरडून कृष्णदासना खालीं उतरण्यास सांगूं लागले. कृष्णदास शांतपणें व सभ्यपणें आपण खालीं उतरणार नाहीं असें सांगत होते. पण या सौम्यपणामुळें साहेबबहाद्दर अधिकच क्रुद्ध झाले. प्रकरण हातघाईवर आलें. धक्काबुक्की होणार असा रंग दिसूं लागला.

महात्माजींच्या जवळ देवदास बसले होते. कृष्णदासानीं देवदासांना बोलावून आणलें. देवदास आले आणि ते कृष्णदासना घेऊन सर्व्हंट्सच्या डब्यांत बसले. ते इंग्लिश अधिकारी पुनः धमकावण्या देऊं लागले आणि त्यांना बळजबरीनें बाहेर खेचून काढण्याच्या गोष्टी बोलूं लागले. डब्याबाहेर गर्दी जमूं लागली. धमकावण्यांना हे लोक दाद देत नाहींत असें पाहिल्यावर सदर साहेब रेल्वेच्या युरोपिअन अधिकाऱ्याला घेऊन आले. भांडाभांडीला खूप जोरानें सुरुवात झाली. बोलतां बोलतां अनवधानानें देवदासच्या तोंडून 'आम्ही गांधींचे नोकर आहोंत' असे शब्द बाहेर पडले.

मांत्रिकाचें नांव उच्चारतांच जसें भूत पळतें तसें गांधींचें नांव ऐकतांच त्या रेल्वेच्या युरोपियन अधिकाऱ्याची स्थिति झाली. वीज चमकावी तसा प्रकार झाला. त्यांची सारी गुर्मी त्या एका शब्दानें उतरली.

'काय गांधी या गाडींत आहेत ?' रेल्वे अधिकारी क्षमायाचनेच्या सुरांत विचारूं लागले. 'तर मग तुम्ही कृपा करून बसा,' असें म्हणून रेल्वे अधिकारी निघून गेले आणि दुसऱ्या साहेबांनींहि हळूच पाय काढला. त्या बिचाऱ्या गुरख्याला आपल्या अधिकाऱ्याची फजिती झाल्यामुळें मेल्याहून मेलें झालें आणि तो एखाद्या गरीब व सालस माणसाप्रमाणें हूं का चूं न करतां बसून राहिला.

## २२. गांधींची शस्त्राक्रिया

१९२४ च्या जानेवारींत गांधीजी येरवड्याच्या तुरुंगांत सहा वर्षांची शिक्षा भोगीत होते. त्यांची प्रकृति एकाएकीं बिघडली आणि तत्काळ ॲपेंडिसायटीसचें ऑपरेशन केल्याशिवाय गत्यंतर नाहीं अशा निर्णयाला डॉक्टर आले. गांधींना ताबडतोब पुण्यास ससून हॉस्पिटलमध्यें हलवण्यांत आलें. ती शस्त्राक्रिया सामान्य नव्हती. विशेषतः गांधींची प्रकृति व वय याचा विचार करतां तो मृत्यूबरोबरचा झगडा होता. गांधींना विचारलें, 'तुमचे खासगी डॉक्टर. मित्र कोणी बोलवायचेत.का?' त्यांनीं मुंबईच्या डॉ. दलाल व डॉ. जिवराज मेथांचीं नांवें सांगितलीं. पण मेथा होते बडोद्याला आणि दलाल यांस फोन केला तरी ते भेटलेच नाहींत. मग पुण्याचे कोणी मित्र जवळ हवेत का, असें गांधींना विचारलें. त्यांनीं श्रीनिवास शास्त्री, न. चिं. केळकर, हरीभाऊ फाटक, वगैरेंचीं नांवें सांगितलीं. केळकर साताऱ्याला गेले होते. बाकीची मंडळी गेली.

त्या प्रसंगाचें वर्णन ना. शास्त्र्यांनीं एका निवेदनांत केलें आहे. शास्त्री म्हणतात, 'मी खोलींत शिरतांच आम्ही एकमेकांना भेटलों आणि मी गांधींना विचारलें, 'ऑपरेशनबद्दल तुम्हांला काय वाटतें.' गांधीजी म्हणाले, 'डॉक्टरनीं शस्त्रक्रिया करण्यावांचून गत्यंतर नाहीं असें ठाम मत दिलें आहे आणि तें मत मान्य करण्यांत मला समाधान आहे. माझ्या भोंवतालच्या डॉक्टर मंडळींवर माझा पूर्ण विश्वास आहे, ते फार दयाळू आहेत. आणि काळजीपूर्वक वागत आहेत.'

'कस्तुरबांना तुमच्या दुखण्याची माहिती आहे का?' असें शास्त्र्यांनीं विचारतां गांधी म्हणाले, 'मी अलीकडे बरा नाहीं एवढेंच तिला ठाऊक आहे. मीं तिच्या पत्राची वाट पहात आहें.' नंतर गांधींनीं ना. शास्त्र्यांच्या पत्नीची व त्यांच्या सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटींतील सहकाऱ्यांची पूस-

तपास केली. 'बाहेरदेशीं वारंवार जाण्यानें तुमच्या प्रकृतीला कांहीं फायदा झाला का ?' असें शास्त्र्यांना त्यांनीं विचारलें.

त्याच वेळीं हरीभाऊ फाटकानांहि त्यांच्या प्रकृतीविषयीं विचारलें आणि खादी कार्य कसें चाललें आहे याची चौकशी केली. ऑपरेशन म्हणजे मृत्यूच्या दाढेंत प्रवेश आहे ह्याची कल्पना गांधींना नसावी असें नाहीं; पण त्यांच्या चित्ताची साम्यावस्था यत्किंचित् ढळली नव्हती व ते मनमोकळें बोलत होते.

ऑपरेशन करण्यापूर्वी रोग्याची संमति घ्यावी लागते. कमी अधिक झाल्यास सर्जनवर जबाबदारी नाहीं असें लिहून द्यावें लागतें. क. मॅडॉकनीं तयार केलेला मसुदा डॉ. फाटकांनीं वाचून दाखविला. गांधींनीं चष्मा घातला व स्वतः मजकूर वाचला. तो वाचल्यावर ते क. मॅडॉकना म्हणाले, 'मी शब्दांतर करूं इच्छितों. तुमची कांहीं हरकत आहे का ?' क. मॅडॉक म्हणाले, 'तुम्हीच चांगली शब्दयोजना करूं शकाल. माझ्या मसुद्याला अर्थात् महत्त्व नाहीं.'

नंतर गांधींनीं एक लांबलचक निवेदन केलें व तें ना. शास्त्र्यांनीं पेन्सिलीनें लिहून घेतलें. त्यांत डॉक्टर, सर्जन जनरल, वगैरेंच्याबद्दल विश्वास व्यक्त केला होता. सरकारबद्दलहि त्यांनीं कृतज्ञता व्यक्त केली आणि तत्काळ ऑपरेशन करावें अशी विनंति केली. तें निवेदन ऐकून क. मॅडॉक संतुष्ट झाले. गांधींनीं नंतर गुडघे पोटाशीं घेतले व पेन्सिलीनें त्यावर सही केली. 'त्यांचा हात थरथरा कांपत होता. त्यांनीं I वर टिंब दिलें नाहीं हें मीं पाहिलें' शास्त्री म्हणतात. 'पहा माझा हात कसा कांपत आहे! तुम्हांला तो नीट करायला पाहिजे.' गांधी म्हणाले. क. मॅडॉकांनीं उत्तर दिलें, 'आम्ही तुमच्यांत टन टन भर शक्ति घालूं.'

तिकडे शस्त्रक्रियेची तयारी चालू होती. डॉक्टर बाहेर गेले व मी एकटाच गांधीजींजवळ होतों. अगदीं वैयक्तिक एक-दोन प्रश्न विचारल्यावर मीं त्यांना म्हटलें, 'तुम्हांला कांहीं सांगायचें आहे का ?' गांधीजी त्या-

करतां उत्सुक दिसले. ते म्हणाले, ‘ ऑपरेशननंतर माझ्या सुटकेकरितां कांहीं चळवळ झाली तर ती योग्य प्रकारें व्हावी. मला सुटायची इच्छा नाहीं. माझें सरकारबरोबर भांडण आहे व मूळ तक्रार दूर होईपर्यंत तें कायम रहाणार आहे. अर्थात् सुटकेला कोणत्याहि अटी असूं शकणार नाहींत. मला दीर्घ काल ठेवलें आहे असें सरकारला वाटत असेल तर त्यांनीं मला सोडावें. कोणत्याहि खोट्या सबबीखालीं मला सुटका नको आहे. कोणतीहि चळवळ अनत्याचारी मार्गानें व्हावी . ’ ना. शास्त्र्यांना असें वाटत असावें कीं, न जाणो, गांधी शस्त्रक्रियेंत जगले नाहींत तर ? ते पुनः गांधींनां म्हणाले, ‘ लोकांना, तुमच्या अनुयायांना किंवा देशाला तुमचा कांहीं संदेश आहे का ? ’

गांधींनीं उत्तर दिलें, ‘ मी सरकारचा कैदी आहें. कैद्यानें प्रामाणिकपणें कैद्याचे नियम पाळले पाहिजेत. ’ बाहेरच्या जगाच्या दृष्टीनें आपण मेलेले आहों असें गांधी म्हणत होते. ‘ मला कांहींहि संदेश द्यावयाचा नाहीं’ असें गांधींनीं उत्तर दिलें.

इतक्यांत नर्स आली. गांधींच्या अंगावर शस्त्रक्रियेच्या वेळचे कपडे होते व ते स्ट्रेचरवरूनच बोलत होते. गांधींना ऑपरेशन-थिएटरमध्यें नेण्यांत आलें. क. मॅडॉकनीं त्यांच्या पोटांत पहिला चाकू खुपसला. इतक्यांत विजेचे दिवे गेले. तेथें काळोख झाला. नर्सेस व डॉक्टरांची धांवपळ सुरू झाली. सर्जनच्या तोंडचें पाणी पळालें. घाईघाईनें हरीकेनचे कंदील आणण्यांत आले आणि शस्त्रक्रिया पुढें सुरू झाली.

ना. शास्त्री व इतर मंडळी बाहेर बसली होती. त्यांची मनःस्थिति काय झाली असेल याची कल्पना केलेलीच बरी. ना. शास्त्री म्हणतात, ‘मी बाहेर बसलों होतों व जें पाहिलें त्यानें आश्चर्यमुग्ध झालों होतों. केवढी मनाची ती भव्यता, ती क्षमाशीलता, तें दाक्षिण्य आणि तें प्रेम ! सामान्य माणसाच्या स्वभावापेक्षां किती तरी पलीकडचें होतें तें. असा शुद्ध दृष्टीचा आणि

स्वाभिमानाबद्दल हळवा असणारा पुढारी असहकारितेच्या चळवळीला मिळाला ही केवढी कृपा ! ज्या वेळीं इन्स्पेक्टर जनरल आणि सर्जन बाहेर आले आणि म्हणाले, 'रोग्यानें शस्त्रक्रिया चांगल्या रीतीनें सहन केली. थोडासा पू निघाला; पण शस्त्रक्रिया रेंगाळली नाहीं ही अभिनंदनीय गोष्ट झाली.'

त्या रात्रीं गांधींच्या जवळ कस्तुरबा नव्हत्या किंवा दुसरें कोणी जिव्हाळ्याचें माणूस नव्हतें. पण हिंदुस्थानची अदृश्य करुण दृष्टि त्यांच्यावर प्रेमळ पहारा करीत होती.

## २३. इंग्लंडला तीन गोष्टी सांगा

गांधीच्या राऊंड टेबल परिषदेच्या वेळच्या यजमानीणबाई, म्युरेल लिस्टर या १९२६ सालीं हजारों मैलांवरून गांधींना भेटावयास आल्या होत्या. गांधींनीं त्यांचें अंतःकरणपूर्वक स्वागत केलें. गांधींचा वाढदिवस त्या वेळीं साजरा होत होता. त्यांना आलेल्या हारांतला एक झेंडूंचा हार गांधींनीं त्यांना अर्पण केला.

'बापू, तुम्ही इंग्लंडला याल का ?,' लिस्टरनें विचारलें. थोडीशी चर्चा केल्यावर गांधी म्हणाले, 'मी येईन; पण माझ्या अटी आहेत.'

'कोणत्या त्या सांगा.' लिस्टर म्हणाल्या.

'तीन अटी आहेत. माझी पहिली अट अशी आहे, तुम्ही मँचेस्टरच्या कापूस कांतणारांना सांगा कीं, तुम्ही हिंदुस्थानकारितां कापड पाठवूं नका. त्यांचें मन वळवलें पाहिजे.' गांधी म्हणाले.

'माझ्या परिचयाचे कांहींजण आहेत,' हंसत लिस्टर बाई म्हणाल्या. 'मी निदान तुमची विनंति त्यांच्या कानांवर घालीन. दुसरी अट सोपी आहे का?

'माझी दुसरी अट तुम्ही तुमच्या मंत्रिमंडळाचें आणि पार्लमेंटच्या सभासदांचें मन हिंदुस्थानला स्वराज्य देण्याकरितां वळविलें पाहिजे.'

'आणि तिसरी'? ते गंभीरपणें बोलत आहेत असें पाहून लिस्टर बाईनें विचारलें.

थोडेंसें थांबून मोजक्या व विचारपूर्वक शब्दांत गांधीजी म्हणाले, 'इंग्लंडला परत गेल्यावर तुम्ही तुमच्या बांधवांना येथें जें पाहिलेंत तें सांगा. तुम्ही आमच्या लोकांत मिसळलां आहांत. तें तुम्ही कराल तर मी इंग्लंडला येईन. येथील मुलांना अफू घालण्याबद्दल आणि अस्पृश्य मुलांच्या मद्यपानाच्या संवयीबद्दल त्यांना सांगा. जरी हिंदु व मुसलमान धर्मांत मद्यपान निषिद्ध आहे, आणि आमच्या जन्मजात संवयी व उपजतबुद्धि मद्याच्या स्पर्शाला विरोधी आहेत, तरी जेथें आम्ही व युरोपियन एकमेकांत मिसळतों तेथें दारूची संवय वाढत आहे. आम्ही अफू व दारूपासून मुक्त होण्याचें ठरविलें हें त्यांना सांगा. या बाबतींत सर्व पक्षांचें एकमत आहे. पण सरकारी उत्पन्नाच्या प्रश्नामुळें आम्ही त्या विरुद्ध कांहीं करूं शकत नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या कायद्याप्रमाणें अबकारी खातें अशा रीतीनें सोंपविलें गेलें आहे कीं, शिक्षणाची वाढ आणि दुसऱ्या राष्ट्रवर्धक बाबी दारूच्या उत्पन्नावर अवलंबून ठेवल्या आहेत. अफूचें व्यसन दारूइतकें भयंकर नाहीं हें त्यांना सांगा. अफूबाज स्वतःच दुःख भोगतो; पण दारूबाज इतरांना सामान्यतः स्त्रियांना, दुःखी करतो. वेश्यागमन कायदेशीर करून त्याच्या उत्पन्नावर राज्य चालविणें जितकें तुम्हांला अनैतिक वाटेल, तितकेंच दारूच्या उत्पन्नावर राज्य चालविणें आम्हांला अनैतिक वाटतें. जनतेचें मन वळवून टाका, मंत्रिमंडळाचीं मनें बदलवा, चर्चेसना उठवा आणि साऱ्या राष्ट्राला सांगा कीं, मद्यपानविरोधी आमची आसक्ति त्यांनीं अटकवूं नये. काय तुम्ही याबद्दल केलेंत हें मला कळवलेंत म्हणजे मी आपल्या खर्चानें तेथें येईन, एक कोटी हिंदी लोकांच्या सह्या घेऊन येईन व काम पुरें करीन.'

त्यानंतर तेथें शांतता झाली. शेवटीं लिस्टर म्हणाल्या, 'मला वाटतें कीं, मी या कामांत प्रयत्न करीन.'

## २४. लष्कराची वृत्ति बदलली

एक प्रसंग म. गांधींना खान अब्दुल गफारखान सांगत होते तो; प्रसंग १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहांतला असावा. त्या वेळीं सरहद्द प्रांतांत सत्याग्रहाची चळवळ फैलावली होती.

चारसद्दाला खुदाई खिदमतगारांनीं एक जाहीर सभा घेतली होती. त्या वेळीं सरकार असल्या सभांना कशी परवानगी देणार ? त्यांना बंडाची भीति वाटे; आणि सरहद्द प्रांत म्हणजे त्यांना दारूचें कोठार वाटे. इतर प्रांतांतल्या सभा बंद करण्यास पोलिसांची पलटण पाठवली म्हणजे भागे. पण सरहद्द प्रांतांत पोलीस निरुपयोगी ठरतील असें वाटल्यावरून ती सभा बंद करण्याकरतां लष्कर पाठविण्यांत आलें. लष्करानें जमलेल्या लोकांना निघून जाण्याचा हुकूम फर्मावला. असहकारितेचें वारें प्यालेल्या लोकांनीं निघून जाण्याचें नाकारलें. सरकारी हुकुमाला अशा प्रकारें आव्हान मिळालें. अधिकाऱ्यांनीं प्रथम लाठीहल्ल्याचा आणि नंतर गोळीबाराचा हुकूम सोडला; पण तो हुकूम ऐकूनहि कोणी जागचें हलेना. त्यामुळें लष्करावर परिणाम झाला. त्यांना धक्काच बसला. भडकणारे पठण इतक्या शांतपणें वागतील व आपल्या निश्चयापासून परावृत्त होणार नाहींत ही त्यांना कल्पना नव्हती. पहिल्या फैरी झाल्यावर लष्कर थांबलें. त्यांच्याभोंवतीं लोकांचा गराडा पडला.

डॉ. खानसाहेबांचे चिरंजीव सादुल्लाखान तेथें होते. त्यांना लष्करी अधिकाऱ्यानें विचारलें, 'तुम्हांला काय हवें ?' 'कांहीं नको' असें सादुल्ला म्हणाले. 'आम्हांला जाऊं द्या. जरा दूर सरा.' असें म्हणून

[stamp]

सारेंचें सारें लष्कर निघून गेलें. तेथें जमलेल्या असंख्य जनसमुदायापैकीं कोणीहि त्यांना इजा केली नाहीं. ”

गांधींनीं हिंसावृत्तीच्या पठाणांना अशा प्रकारें अहिंसेची दीक्षा दिली.

## २५. गांधीजींचा वक्तशीरपणा

होरेस ॲलेक्झांडर हे गांधींचे चहाते. १९२९ सालीं ते साबरमतीला गांधींना भेटावयास गेले. त्यांनीं आपल्या भेटीचा प्रसंग वर्णन केला आहे. ‘संध्याकाळचे ७ वाजले होते. सूर्य अस्ताला चालला होता. प्रार्थनेची वेळ झाली. नदीकांठीं एका चौकांत जमिनीवर सर्वजण बसले होते. संपूर्ण शांतता तेथें नांदत होती. मधूनमधून निरनिराळ्या पक्ष्यांचे आवाज निघत व त्यामुळें शांततेचा भंग होई. हळूहळू आश्रमांतील एक एक जण तेथें आला आणि जमिनीवर बसला. सुमारें शंभर जण तेथें जमले असावेत. एकानें चादर व उशी आणली. ती भिंतीला टेकून ठेवली. गांधींना ती चैन वाटत असावी; पण अलीकडे प्रकृतीमुळें त्यांना ना म्हणवत नाहीं. नंतर एक ताठ आकृति, इतरांपेक्षां कृश किंवा लहान नसलेली, झपझप पावलें टाकीत तेथें आली; आणि इतरांप्रमाणें झटकन मांडी घालून तेथें बसली. त्यांनीं डोळे मिटले व प्रार्थनेला सुरुवात केली. मींहि डोळे मिटले. त्यामुळें ते काय करीत होते हें मला समजलें नाहीं. प्रार्थना संपल्यावर एकेकाचें नांव उच्चारलें गेलें आणि प्रत्येकजणानें आपण आज किती सूत कांतलें तें सांगितलें. आश्रमांतलें सारें जीवन संन्यस्त शिस्तीचें आहे.

‘ हीं नांवें उच्चारलीं जात असतां आणि अहवाल सांगितला जात असतां, गांधी आपल्याभोंवतीं पळणाऱ्या मुलांना जणुं काय पकडण्याकरितां हात पसरत होते आणि त्यांना पकडण्याचा प्रयत्न करीत होते. तीं मुलें गांधींच्या हातीं लागलीं म्हणजे मोठ्या आनंदानें ओरडत. ज्यांनीं विश्व

हालवलें अशा एका महात्म्याकडे मी पहात आहें याचें मला विस्मरण झालें. त्यांनीं आपला महान् आत्मा अत्यंत आश्चर्यकारक अशा नम्रतेमध्यें झांकून ठेवला होता. त्यामुळें तुम्हांला जो माणून दिसतो तो साध्या मानवी भावनांचा प्रतीक दिसतो. त्यांच्या डोळयांत मला चमक किंवा भेदक कांहीं दिसलें नाहीं; पण त्यांच्या डोळ्यांत सौंदर्य आहे, त्यांच्या तोंडावर आध्यात्मिक संघर्षांतून गेलेल्या माणसाचे भाव दिसतात. त्यांच्या चर्येवर विजय संपादन केलेली शांति दिसते.'

मि. अलेक्झांडर यांना गांधींची मुलाखत हवी होती. महादेवभाई देसाईकडे ते गेले. दुसऱ्या दिवशीं तीन प्रहरीं चार वाजतांची वेळ त्यांना देण्यांत आली. अलेक्झांडर म्हणतात :

'मला चार केव्हां वाजतात याची उतावीळ झाली होती. मी सारखा घड्याळाकडे पहात होतों. पण मी पूर्वेकडे कांहीं महिने घालविल्यामुळें पांच मिनिटें उशीरां जाणें म्हणजे आदर राखणें आहे असें मी समजलों. मी जेव्हां दिसलों, तेव्हां देसाई गांधींच्या खोलींत डोकावून आले आणि म्हणाले 'कांहीं वेळ थांबाल का?' त्याचें मला आश्चर्य वाटलें नाहीं. जे अनंतांत रहातात त्यांना दहापंधरा मिनिटांचें काय? पण मी जेव्हां आंत गेलों तेव्हां त्यांच्या पहिल्या शब्दावरून गांधीजी वेळेच्या बाबतींत पौर्वात्य नाहींत, असें मला समजलें. 'तुम्हांला तिष्ठत रहावें लागलें याबद्दल मला वाईट वाटतें. पण चारला दोन मिनिटें कमी असतां तुम्ही आलांत का म्हणून मीं चौकशी केली. पण तुम्ही आलां नसल्याचें समजल्यावर मी म्हटलें दूध घेऊन टाकावें, म्हणजे मनमोकळ्या बोलण्याला जास्त वेळ लागला तरी चालेल.' गांधी म्हणाले. चारला दोन मिनिटें कमी असतां त्यांनीं मी आलों का पाहिलें हं! पण त्यांच्या आवाजांत अधीरतेची छटाहि नव्हती. आपल्या वाटणाऱ्या अवक्तशीरपणाबद्दल त्यांनीं केलेलें तें

साधें व स्नेहभावाचें कथन होतें; तसेंच आलेल्या पाहुण्यांच्या आदरातिथ्या-बद्दलची त्यांची त्यांत भावना होती.

पाने-११६
८८१९४
२-५० रु

## २६. गांधीजींचा असंग्रह

गोलमेज परिषदेला गांधीजींचें जाणें अगदीं आकस्मिक झालें. व्हाईसरॉयची व त्यांची सिमल्याला तडजोड झाली. सर कावसजी जहांगीरनें त्यांना स्पेशल गाडीनें दिल्लीला पोंचवलें व तेथून ते बोट सुटण्याच्या वेळीं मुंबईला आले.

'अगदीं खालच्या वर्गाच्या पांच जागा राखून ठेवा' अशी गांधींनीं एका मित्राला तार केली होती. राजपुताना बोटीवर अगदीं खालचा वर्ग म्हणजे दुसरा वर्ग. आपल्या खोलींत हें गाडीभर सामान कोठून आलें असा त्यांनीं प्रश्न विचारला.

'आम्हांला लवकर निघावें लागलें' 'आम्ही ह्या मागून आणलेल्या पेट्या परत करूं.' 'अनेक मित्रांनीं आमचें न ऐकतां हें सामान भरलें.' 'आम्हांला विलायतला काय लागतें ह्याची कल्पना नाहीं, म्हणून ज्यांनीं जें लागतें असें सांगितलें तें आम्हीं घेतलें.' अशी चार कारणें गांधींना त्यांच्या परिवारांतील मंडळींनीं सांगितलीं; पण त्यामुळें गांधींचें समाधान न होतां ते जास्तच बिथरले. हिंदुस्थानांतील अगदीं गरीबांचा प्रतिनिधि म्हणून जात असलेल्याच्या सहवासीयांनीं असल्या मौल्यवान वस्तू बरोबर घेतलेल्या पाहून त्यांच्या जिव्हारीं लागलें. कधीं कधीं ते रागावत, त्यांतलीच ही वेळ होती. अर्थात् ते राग आवरूं शकत; पण क्षणभर ते क्रोधाविष्ट होत.

एकेक मुद्दा ते खोडूं लागले. 'तयारीला वेळ नव्हता हें सांगण्यांत काय अर्थ आहे? कशाला तयारी हवी? मित्रांनीं दिलें म्हणून तुम्ही कां घेतलेंत?

जेराजानींच्या खादी भांडारांतून चार लोकरीचे व सुताचे तुकडे घेतले असते म्हणजे पुरले असते. जणुं काय पांच वर्षे इंग्लंडला आपल्याला रहावयाचें आहे अशा कल्पनेनें तुम्ही हा सोस केलात. तुम्ही पेट्या परत करणार आहांत यामुळें तुम्ही निर्दोषी ठरत नाहीं. तुम्ही या कातडी पेट्या घेतल्यात यावरूनच तुमची दारिद्र्याविषयीं आणि असंग्रहाविषयीं काय कल्पना आहे हें मला समजलें.

'तुम्ही म्हणतां कांहीं वस्तू जुन्या आहेत आणि त्या मित्रांच्या अनावश्यक संग्रहांतील आहेत. तुम्ही एकतर मला फसवतां किंवा स्वतःला तरी फसवतां. जर मित्रांना त्या वस्तू नको होत्या, तर त्यांनीं त्या टाकून द्यावयास पाहिजे होत्या. तुम्ही मागितल्याशिवाय त्यांनीं तुम्हांला त्या दिल्या नाहींत. ज्यांना इंग्लंडची माहिती आहे, त्यांच्या सल्ल्यानें तुम्ही चाललांत हें म्हणणें मूर्खपणाचें आहे. त्यांचा सल्ला ऐकावयाचा होता, तर त्यांच्याबरोबर तुम्ही जावयाचें होतेत. तुम्ही माझ्याबरोबर आहांत, तेव्हां माझा सल्ला तुम्ही ऐकला पाहिजे.'

महात्माजी कित्येक दिवस ही हजेरी घेत होते. महादेवभाई म्हणतात, 'आम्हांला जरी बोट लागली नाहीं, तरी गांधींच्या या बोलण्यानें आमचीं डोकीं गरगरूं लागलीं. आम्ही अवश्य वस्तूंची यादी तयार केली व बाकीच्या वस्तू एडनहून परत पाठविण्याचें ठरविलें.'

चवथ्या दिवशीं त्यांनीं गांधींच्या पुढें यादी ठेवली. 'मी तुमच्या यादींत फेरफार करणार नाहीं; पण तुम्ही सिमल्यांत जसे रहातां तसे लंडनमध्यें राहिलें पाहिजे. सिमल्याला जर धोतर, कुडता व चप्पल चालतें तर, इंग्लंडला कां चालूं नये ? जर तुमचे कपडे पुरेसे नाहींत असें मला दिसलें, तर मीच तुम्हांला सांगेन व कांहीं लोकरीचें सामान घेऊन देईन.'

नंतर गांधी एकेका वस्तूवर टीका करूं लागले. एका कारखानदारानें देणगी म्हणून दिलेल्या कातडी पिशवीकडे पाहून ते म्हणाले, 'हिंदुस्थानांत तुम्हांला

ता.

खादीची थैली चालते; मग इंग्लंडमध्यें कां चालू नये ? तुम्हांला काय वाटतें, इंग्लंडमधील लोक असल्या सुबक पिशव्यांतून आपले कागदपत्र नेतात, आणतात ? बिलकूल नाहीं. लोंबर्ड स्ट्रीटमधील मोठाले श्रीमंत व्यापारी व सावकार किंवा मुत्सद्दी असल्या कातडी पिशव्या वापरतात; पण तुमच्या हातांत त्या हास्यास्पद दिसतील.' एका दुर्बिणीसंबंधीं गांधीजी असेंच बोलले; पण अशा प्रकारची चेष्टा होत असतां बरीच करमणूक झाली आणि गांधींचा राग उतरला.

एका व्यापाऱ्यानें दयार्द्र होऊन गांधींना बोटीवर निजण्याकरतां घडीची अमेरिकन कॅंट कॉट दिली होती. तिच्याकडे पाहून गांधी म्हणाले, 'मला वाटलें ही हॉकीची काठी आहे. जाऊं द्या हॉकी स्टिक परत !'

नंतर श्वेब कुरेशीकडे पाहून ते म्हणाले, 'जर एखाद्या राजेसाहेबांच्या परिवाराला शाली पाहिजे असतील तर मला सांगा. मला मिळालेल्या शालींचें मी एक दुकान सहज काढीन. मला एका व्यापाऱ्यानें ७०० रु. ची शाल दिली आहे. ती आंगठींतून जाते. त्याला वाटलें कोट्यवधी लोकांचा प्रतिनिधि कसा आहे हें गोलमेज परिषदेंत दिसावें याकरितां मीं ती वापरावी ! राणीसाहेबांनीं मला ७००० रु. गरीबाकरतां या शालीचे द्यावेत व माझें ओझें हलकें करावें. हिंदुस्थानच्या गरीबांचा एकमेव प्रतिनिधि एवढेंच करूं शकेल.' गांधींच्या ह्या रागें भरण्यानंतर एडनहून बरेंच सामान परत गेलें आणि बोटींत खूप जागा झाली.

## २७. गरीबांचा प्रतिनिधि

हिंदुस्थानांत गांधी जसे हरिजन वस्तींत रहाणें पसंत करीत तसें लंडन-मध्यें गेल्यावर ते असेच गरीबांच्या वस्तींत राहूं लागले. त्या म्युरेल लिस्टर बाई आणि तो किंग्स्ले हॉल ! गोलमेज परिषदेला आलेला हा कॉंग्रेसचा

एकमेव प्रतिनिधि इतर प्रतिनिधींप्रमाणें एखाद्या बादशाही हॉटेलांत किंवा एखाद्या शानदार राजवाड्यांत न उतरतां भिकार भणंगाच्या वस्तींत उतरला याचा अर्थ अनेकांना कळेचना. पण गांधी म्हणत, 'हिंदुस्थान गरीब आहे व त्याचा प्रतिनिधि गरीब वस्तींतच उतरला पाहिजे.'

'ईस्ट एंड 'ला रहात असतां गांधी पहांटेच बाहेर फिरायला पडत. त्या बाजूचे बरेच जण त्यांच्या परिचयाचे झाले होते. तेहि सकाळीं उठत व गांधींना 'गुड मॉर्निंग' म्हणत. लहान मुलें तर त्यांच्या भोंवतीं घोळका करून असायचीं. त्या मुलांच्या संगतींत आपण आश्रमांत आहों असें गांधींना वाटायचें.

'मि. गांधी, तुमची भाषा कोणती हो?' असा प्रश्न तीं मुलें विचारीत आणि मग गांधी इंग्लिश व हिंदी शब्दांच्या व्युत्पत्ती त्यांना सांगत. इंग्लिशमधले आणि आमच्या भाषांतले पुष्कळ मूळ शब्द एकच आहेत असें सांगतां सांगतां गांधी त्यांना आपण सर्व एकाच परमेश्वराचीं मुलें आहोंत हें पटवीत.

कधीं कधीं गांधीजी आपल्या बाळपणाच्या गोष्टी त्यांना सांगत. त्या सांगतांना, कोणीं आपल्याला मारलें, इजा केली तर त्याला आपण मारूं नये, इजा करूं नये हें त्या बालकांच्या मनांवर ते बिंबवीत. आपण असले कपडे कां वापरतों व तुमच्यामध्यें कां रहातों हेंहि गांधी त्यांना सांगत.

'माझी खरी गोलमेज परिषद हीच आहे.' असें ते म्हणत. 'मला याच घरीं आपल्या घरीं राहिल्यासारखें वाटतें. लिस्टरबाईनीं माझ्याकरतां जादा खर्च केला नाहीं; पण त्यांनीं व त्यांच्या सहकाऱ्यांनीं गैरसोय मात्र करून घेतली. त्या सहकाऱ्यांनीं आपल्या खोल्या रिकाम्या केल्या व ते व्हरांड्यांत निजूं लागले. त्यांना माझ्याकरतां अधिक कामहि पडतें. पण तें काम ते आनंदानें करतात. मी अशा प्रेमळ मित्रांना सोडून दुसरीकडे कुठें जाऊं?' असें गांधी म्हणत. गरीबांची वस्ती, प्रेमळ सहवास, निरा-

गस बालकांचा लाभ त्यांना अन्यत्र कुठें मिळणार होता? किंग्स्ले हॉल हा एक आश्रमच होता. तेथील प्रत्येकजण स्वतःचीं कामें स्वतः करी. अशा ठिकाणींच गांधींचें निवासस्थान असणें योग्य होतें.

## २८. राजेसाहेबांचें आमंत्रण

म. गांधी गरीबांचे प्रतिनिधि म्हणवत; मग ते राजेसाहेबांना कां भेटायला गेले? बादशहाच्या भेटीमुळें त्यांना आनंद झाला? आपण मोठे ठरले गेलों असें वाटलें? छे. त्यांना मनापासून ही भेट नको होती. त्या भेटींत कांहींच अर्थ नसतो. तो सारा नाटकी व औपचारिक प्रकार होता. बादशहांना गांधींची भेट घेण्यावांचून गत्यंतर नव्हतें आणि गांधींना बादशहांना भेटण्यावांचून गत्यंतर नव्हतें. दोघे परस्परांना भेटले. एक धोतरपंचांत होता, उघडाबोडका होता, त्याच्या पायांत वहाणा होत्या आणि दुसरा लोकरीच्या कपड्यांच्या राशींनीं वेढलेला होता. परस्परांनीं हातांत हात मिळविले. ती हिंदुस्थान-इंग्लंडची हातमिळवणी किंवा सख्य तडतोड नव्हती.

फ्रेंड्सच्या बैठकींत गांधीजी या भेटीसंबंधीं म्हणाले, 'मी मोठ्या बुचकळ्यांत पडलों आहें. मी या राष्ट्राचा पाहुणा म्हणून आलों आहें. माझ्या राष्ट्राचा मी निवडलेला प्रतिनिधि नाहीं म्हणून मला जपून चालावें लागतें आणि मी किती जपून चालतों हें सांगण्याची जरूरी नाहीं.... .. या आठवड्यांत मला बादशहानें बोलावलें आहे. हिंदुस्थानांत सध्यां ज्या गोष्टी घडत आहेत त्यामुळें माझें अंतःकरण इतकें दुःखी व व्यथित झालें आहे कीं, मला असल्या समारंभाला जाणें आवडत नाहीं. मी जर माझ्या हक्कानें येथें आलों असतों तर मला निर्णय

घेण्याला वेळ लागला नसता. पण मी पाहुणा आहें, म्हणून मी कोणतीहि गोष्ट तडकाफडकी करूं शकत नाहीं. क्षणोक्षणीं मला कायद्याच्या दृष्टीनें नव्हे पण नीतीच्या दृष्टीनें प्रत्येक प्रश्न पहावा लागतो !' गांधीजी रित्या हृदयानें गेले आणि रित्या हृदयानें परत आले.

## २९. आम्ही पोटावर सरपटूं

ऑक्सफर्ड विद्यापीठाचे प्राचार्य व त्यांच्या पत्नी डॉ. व मिसेस लिंडसे यांना गांधींबद्दल फार प्रेम होतें. ते हिंदुस्थानांत आले होते तेव्हांच त्यांनीं गांधीजींना आपल्या घरीं येण्याचें आमंत्रण देऊन ठेवलें होतें. गांधींना विद्यापीठाच्या प्रशांत वातावरणांत शारीरिक व मानसिक शांति मिळावी हा त्या आमंत्रणाचा हेतु होता. पण गांधींना कोण रिकामे सोडतो ? ऑक्सफर्डमधील मोठमोठे विद्वान् तेथें येऊन ठाकले. चर्चा, वादविवाद सुरू झाले. डॉ. गिल्बर्ट मरे, डॉ. स्लेटर, प्रो. कूपलंड, वगैरे प्राध्यापकांशिवाय बुद्धिवान विद्यार्थ्यांचाहि त्या ज्ञानसत्रांत तुटवडा नव्हता. सर्व विद्वान् गांधींना हतबुद्ध करण्याकरतां जमले होते. कोणी अहिंसेची, कोणी त्यांच्या यंत्रविरोधाची, कोणी सत्याची कसून परीक्षा घेत. कोणी गांधींचें अर्थशास्त्र किती पंगू आहे हेंहि दाखवीत. पण गांधी असल्या पढिक पंडितांना काय थोडेच हार जातात ? त्यांची विचारसरणी मूलग्राही, अभिनव अशी असे. त्यामुळें ठराविक चौकशीचा विचार करणारेच गांधीजींपासून शिकून जात.

एकदां अशीच सभा भरली होती. गांधीजींनीं ज. डायरनें अमृतसरला पोटावर सरपटत जाण्याचा जो हुकूम सोडला होता, त्यासंबंधीं उल्लेख केला. प्रेक्षकवर्ग अत्यंत सहानुभूतिपूर्ण होता. त्या उल्लेखामुळें वीज चमकावी

तशी श्रोत्यांच्या चित्ताची स्थिति झाली. त्यांच्या अंगावर शहारे आले. भाषण संपतांच मिसेस लिंडसे गांधींजवळ आल्या आणि म्हणाल्या,

'आम्ही पन्नास वेळ पोटावर सरपटत गेलों तर त्या पापाचें क्षालन होईल असें तुमचें मत असेल तर आम्ही तें करावयास तयार आहों.'

'छे!' गांधीजी म्हणाले, 'तुम्ही करूं नका. कोणीहि तसें करण्याची जरूरी नाहीं. तुम्ही किंवा मी पन्नास वेळ स्वेच्छेनें तसें करूं; पण एखाद्या इंग्लिश मुलीला सक्तीनें तसें करावयास लावण्याचा प्रयत्न मला करूं द्या. ती मला लाथ मारील आणि तसें करण्यांत तिची चूक आहे असें मी म्हणणार नाहीं...हिंदुस्थानांत इंग्लिश लोक सेवक म्हणून—धनी म्हणून नव्हे—राहिले तरच त्या पापाचें क्षालन होईल.'

## ३०. गांधीजी व वर्तमानपत्रांचे बातमीदार

इंग्लंडमधील वृत्तपत्रें खऱ्या गोष्टी दडपतात व खोट्या छापतात असा तेथील वृत्तपत्रांचा लौकिक असे. जगांतील कोणत्याहि वृत्तपत्रांपेक्षां इंग्लंड-मधील कान्झर्व्हेटिव्ह पत्रें अत्यंत खोटा प्रचार करतात असें सामान्यतः समजलें जातें. गांधींना खुद्द तोच अनुभव आला. राजपुताना बोटीवरून ते मार्सेलीसला उतरतांच गांधींचें विद्यार्थ्यांनीं प्रचंड स्वागत केलें. त्या स्वागताच्या वेळीं डेली मेल पत्राचा बातमीदार हजर होता. त्यानें गांधींची मुलाखतहि घेतली. पण ती मुलाखत त्यानें विकृत करून पाठवून दिली. त्यांचें स्वागत बंडखोर हिंदी विद्यार्थ्यांनीं केलें असें सदर बातमीदारानें तारेंत लिहिलें. वास्तविकपणें तें स्वागत मार्सेलीसच्या सर्व विद्यार्थ्यांचें होतें. गांधींच्या तेथील संभाषणांतला एकहि मुद्दा तारेंत न लिहितां सदर पत्रकार म्हणाले, 'गांधींनीं ब्रिटिश राज्याविषयीं द्वेष फैलावला.' पुढें ह्या बात-मीदाराला गांधींनीं आपल्याजवळ बोलावलें. ते एका स्पेशल गाडीनें

मार्सेलीसहून बोलोनला चालले होते. गांधींनीं त्याला ही धडधडीत खोटी बातमी कां प्रसिद्ध केलीस म्हणून विचारलें. गांधींपुढें जाण्याचा प्रसंग आपल्यावर येईल अशी त्याला कल्पना नव्हती. तो गडबडलाच. मार्सेलीस-मध्यें गांधींचें दर्शन घेण्यास दुतर्फा लोक जमले होते. पण त्या बहाद्दरानें 'अत्यंत भिकार स्वागतानें गांधींची निराशा झाली.' अशी तार पाठवून दिली. पण त्या बातमीदारावर न रागावतां गांधी म्हणाले, 'तुम्ही जरी असत्य छापलेंत तरी मला त्याच्याशीं कांहीं करावयाचें नाहीं. मी माझ्या मुलाखती बंद करणार नाहीं. तुम्ही जितक्या वेळां माझी मुलाखत मागाल तितक्या वेळीं मी मुलाखत देत जाईन.'

डेली मेलचे अन्य सहकारी याच वर्गात मोडत होते. अमेरिकेच्या असोसिएटेड प्रेसच्या मि. मिल्सनीं गांधींच्या प्रार्थनेचें, चरख्याचें वर्णन केलें; पण तें नीरस होईल असें वाटून एक मांजर त्या वर्णनांत सोडलें. तें मांजर दररोज गांधींचें दूध पितें असें सदर बातमीदारानें 'सत्य' छापलें. पण त्याहिपेक्षां स्लोकंबचें आश्चर्य वाटतें. येरवड्याच्या तुरुंगांत हे गृहस्थ सरकार व गांधी यांच्यामध्यें तडजोड करावयास गेले होते. त्यांच्याकडून सत्याची अपेक्षा करणें चूक ठरलें असतें काय ?

स्लोकंबनें गांधीजींची पुष्कळच स्तुति केली. त्यांच्या औदार्याबद्दल लिहिलें आणि तें औदार्य दाखवण्याकरितां एक प्रसंग चितारला. 'प्रिन्स ऑफ वेल्स हिंदुस्थानांत गेले असतां गांधींनीं त्यांच्या पुढें लोटांगण घातलें.' अशी त्यांनीं बातमी फैलावली. 'तुम्हांला अधिक अचूक माहिती असली पाहिजे अशी माझी अपेक्षा होती. तुमच्या कल्पकतेलाहि हें श्रेयस्कर नाहीं. मी हिंदुस्थानांतील गरीबांतल्या गरीब भंग्यापुढें, हरिजनापुढें गुडघे टेकीन. कारण त्याला शतकानुशतक आम्ही चिरडण्यांत भागीदार आहोंत. मी त्याच्या पायाची मातीहि डोक्याला लावीन. पण मी राजपुत्रापुढेंच काय, पण राजापुढेंहि लोटांगण घालणार नाहीं. कारण तो एका उन्मत्त सत्तेचा

प्रतिनिधि आहे.' स्लोकंबसाहेब इंग्लंडमधील वृत्तपत्रीय वातावरणांत वाढलेले; ते अपवाद कसे ठरतील ?

## ३१. बालकांच्या सहवासांत

म. गांधींनीं, लंडनच्या ज्या गरीब वस्तींत ते उतरले होते, येथील मुलांना वेडच लावलें. किंग्स्ले हॉलमधील बालगृहांतील एका तीन वर्षांच्या मुलानें गांधींचें नांव 'गांधीकाका' असें ठेवलें.

'आई, आम्हांला सांग ना, गांधी काय खातात आणि ते बूट कां घालीत नाहींत तें.' असें प्रश्न मुलें आपल्या आयांना विचारीत.

आणि एके दिवशीं एक आई आपल्या मुलाला म्हणाली, 'हं, गांधी म्हणूं नकोस; मिस्टर गांधी म्हण. तुला ठाऊक आहे ना, मि. गांधी किती किती चांगले आहेत ते !'

'आईग, मी त्यांना आतां गांधीकाका म्हणेन' असें त्या चिमुकल्या बालकानें आपली चुकी सुधारण्याकरितां उत्तर दिलें. देवालाहि लहान मुलें 'अंकल गॉड' ( देवकाका ) म्हणत. आपण देवबाप्पा म्हणतों.

मग गांधींचा वाढदिवस आला. त्या दिवशीं लहान मुलांनीं गांधी-काकांना काय काय बक्षिसें पाठवलीं असतील ?

कोणी एकानें खेळण्यांतलें कुत्रें पाठवलें आणि कोणी मिठाई पाठवली. त्यांत प्रेम, आदर व जिव्हाळा होता. 'तुम्हीं तुमच्या वाढदिवशीं आमच्याकडे याल का ? आम्ही गाणीं गाऊं, बँड वाजवूं आणि मेणबत्त्या लावूं.' असेंहि पत्र त्यांना आलें.

एका चार वर्षांच्या मुलीचा बाप गांधीजींकडे आला. तो दिवस गांधींचा वाढदिवस होता. 'मला तुमच्या विरुद्ध फिर्याद करायची आहे.'

'कशाबद्दल ?' गांधींनीं हंसत विचारलें.

‘ आमची लहान छोकरी जेन आहे ना, ती रोज पहांटे माझ्याकडे येते, मला मारते, उठवते आणि म्हणते, ‘ हं, मला माराल तर खबरदार ! गांधीकाकांनीं आम्हांला परवां सांगितलें कीं, कोणी आपल्याला मारलें, तर आपण उलट मारूं नये. ’

दुसरे अनेक आईबाप गांधीजींकडे आपल्या मुलांच्या फिर्यादी घेऊन येत. ‘ आमच्या मुलांनीं नुसता कहर केला आहे ! तीं म्हणतात, आम्हांला पहांटे उठवा. गांधीकाका पहांटे फिरायला जातात, तेव्हां त्यांना ‘ गुड मॉर्निंग ’ करायला आम्हांला जायचें आहे. ’ बिचारे आईबाप उशीरां उठत. त्यांना त्यांच्या मुलांनीं गांधींमुळें लवकर उठण्याची संवय लावली म्हणून त्या फिर्यादी.

गांधीजींविषयींचें हें प्रेम शाळांशाळांतून व्यक्त होऊं लागलें. एका दहा वर्षांच्या मुलीनें गांधींच्या वाढदिवशीं एक निबंध लिहिला :

सेंट फ्रॅन्सिसला ॲसिसिचा गरीब माणूस म्हणत. तो सर्व बाबतींत गांधींसारखा होता.

ते दोघेहि लहान मुलें व फुलें यांसारख्या निसर्गावर प्रेम करीत. सेंट फ्रॅन्सिस जेव्हां पृथ्वीवर वावरत होता, तेव्हां तो गांधींप्रमाणेंच पंचा नेसत असे.

गांधी व सेंट फ्रॅन्सिस दोघेहि श्रीमंत व्यापाऱ्यांचीं मुलें होतीं. एके रात्रीं सेंट फ्रॅन्सिस आपल्या अनुयायांसह मेजवानी झोडीत असतां त्याला गरीब इटालिअन्सची आठवण आली. तो बाहेर पळाला आणि त्यानें आपले भपकेबाज कपडे व पैसे गरिबांना देऊन टाकले आणि त्यानें गांधींप्रमाणें जुनीं गोणपटें पांघरलीं.

सेंट फ्रॅन्सिसनें आपले कांहीं अनुयायी घेतले, त्यांनीं झाडांच्या झोंपड्या केल्या. गांधींनींहि तेंच केलें. गांधींनीं आपली सारी श्रीमंत चैनीची रहाणी गरीब हिंदी लोकांना देऊन टाकली.

गांधींच्या लोकांनीं त्यांना लंडनला येण्याकारितां पंचे दिले. त्यांनीं आम्हां किंग्सले हॉलच्या मुलांना सांगितलें, मी कपडे घेण्याइतका श्रीमंत नाहीं.

सोमवारीं ते बोलत नाहींत. कारण तो त्यांचा धर्म आहे. गांधींच्या वाढदिवशीं त्यांना लांकडी खेळणीं मेणबत्त्या व मेवामिठाई मिळाली. ते शेळीच्या दुधावर व फळांवर रहातात.

अशा प्रकारचे निबंध गांधींसंबंधीं तेथील मुलेंमुली आपल्या शाळेंत लिहीत.

दुसऱ्या एका १० वर्षांच्या मुलानें पुढील निबंध लिहिला:

मि. गांधी हे हिंदी गृहस्थ आहेत. १८९० सालीं ते लंडनला कायद्याचे विद्यार्थी होते. आपल्या लोकांना चांगले दिवस यावेत म्हणून त्यांनीं तें शिक्षण सोडलें.

ते इंग्लंडला गोलमेज परिषेदला जे आले आहेत, ते हिंदुस्थानला परत व्यापार मिळवण्याच्या प्रयत्नाकरतां आले आहेत. ब्राह्मणांनीं अस्पृश्यांना आपल्या देवळांत येऊं द्यावें म्हणून ते प्रयत्न करीत आहेत. सुमारें ६० लाख लोक तेथें असे आहेत कीं, ज्यांना चांगलें जेवण कशाला म्हणतात तें ठाऊक नाहीं. त्यांनीं आपल्या सर्वस्वाचा त्याग केला आहे व ते गरीबांतला गरीब हिंदी माणूस होण्याचा प्रयत्न करीत आहेत. म्हणून ते पंचा नेसतात.

ते शेळीचें दूध, फळें व भाज्या खातात. ते मांस किंवा मासे खात नाहींत. कारण त्यांना कोणाचा जीव घ्यावा असें वाटत नाहीं. गांधी हे ख्रिश्चन हिंदी आहेत.

गांधी स्वतः कापसाचें सूत कांततात. ते इंग्लंडमध्यें दररोज तासभर सूत काढतात आणि इस्पितळांतहि ते सूत कांतोत. ते लँके-

शायरच्या कापड्याच्या गिरण्यांना भेट देऊन नुकतेच आले आहेत.

ते रविवारीं संध्याकाळचे सात वाजल्यापासून सोमवारीं संध्या-काळचे सातवाजेपर्यंत प्रार्थना करतात. जर तुम्ही त्या वेळांत त्यांच्याशीं बोललांत तर ते उत्तर देत नाहींत. जेव्हां ते बाहेर भेटी-करतां पडले तेव्हां माझ्या घरीं आले. माझी आई तेव्हां कप-ड्यांना इस्त्री करीत होती. पण ते म्हणाले, 'थांबू नका; कारण मलाहि तेंच करावें लागलें होतें.' मी त्यांच्या बरोबर हस्तांदोलन केलें आहे. हॅलो किंवा गुड बायला हिंदी शब्द नमस्कार आहे.

महादेवभाई देसाई म्हणतात, 'किती खरे, शुद्ध व अमोल बोल आहेत हे!' त्यांच्या शिक्षकांनींच त्यांना गांधींची ओळख करून दिली होती. किती हिंदी बालविद्यार्थ्यांनीं असलें प्रेमळ वर्णन गांधींचें केलें असेल?

## ३२. गुप्त पोलीस घरचे झाले

गांधीजी जेव्हां विलायतेस गेले, तेव्हां त्यांच्या रक्षणाकरतां दोन गुप्त पोलीस ब्रिटिश सरकारनें नेमले होते. ही पोलीसांची जोडी छायेप्रमाणें गांधींच्या बरोबर असे. त्या गुप्त पोलीसांचा जन्मजात धंदा प्रत्येक व्यक्ती-कडे संशयानें पहाण्याचा असे. गांधींच्या जीविताचें रक्षण करणें हा जसा त्यांचा व्यवसाय होता, तसा गांधी कांहीं वेडेंवांकडें करतात कीं काय हेंहि ते पहात असत. पण लवकरच त्यांच्या जीवनांत बदल झाला. ते गांधींवर प्रेम करूं लागले. गांधींना ते 'छोटा माणूस' म्हणूं लागले आणि त्यांचे मित्र बनले. गांधींची पडेल ती सेवा ते करावयास लागले. गांधींच्या परि-वारांतील मंडळींना जेव्हां जादा काम पडे, तेव्हां ते त्यांच्या मदतीला जात. थोडक्यांत ते पोलीस गांधींच्या परिवारांतच सामील झाले.

[library stamp]

गांधी जेव्हां लंडनहून निघाले, तेव्हां एका सरकारी अधिकाऱ्यानें गांधींना विचारलें, ‘ आपल्याकरतां आम्ही कांहीं करण्याची जरूरी आहे का ?’ गांधी म्हणाले, ‘ हे जे दोघे गुप्त पोलीस आहेत, त्यांना माझ्याबरोबर ब्रिंडिसीपर्यंत पाठवा. ’ त्या अधिकाऱ्याला वाटलें, गांधींना आपल्या रक्षणाकरतां ते हवे असावेत. पण त्यानें गांधींना कारण विचारलें. गांधींचे व त्या पोलीसांचे प्रेमसंबंध जमले होते व त्यांचा विरह त्यांना जाणवत होता. गांधी म्हणाले, ‘ते आमच्या कुटुंबापैकींच आहेत. तेव्हां त्यांना ब्रिंडिसीपर्यंत पाठवा. ’ गांधींची विनंती अर्थात् मान्य केली गेली.

या गुप्त पोलीसांच्या खिशांत दोन घड्याळें आहेत. ते तीं घड्याळें जीवापलीकडे बाळगतात. त्या घड्याळांवर एम्. के. गांधी यांजकडून सप्रेम भेट अशीं अक्षरें खोदलीं आहेत.

## ३२. गांधीजींचें सौंदर्य

‘ गांधीजी जेव्हां लंडनला येत आहेत असें मीं ऐकलें तेव्हां मी बर्लीनला होतों. ’ असें होम्स म्हणतात. ‘ गांधीजी येताहेत, ते बोटीवर चढले आहेत, ते समुद्रांत आहेत, वगैरे बातम्या मीं ऐकल्या तेव्हां मीं सारीं कामें सोडलीं आणि लंडनला धांवत आलों. ते बंदरावर पाय ठेवतील तेव्हां त्यांची गांठ पडेल अशी मला आशा नव्हती. पण योगायोगानें १२ सप्टेंबर १९३१ रोजीं शनिवारीं मी फोकस्टोनच्या बंदरावर त्यांची वाट पहात उभा राहिलों.

‘ ती इंग्लंडची विशिष्ट हवा होती. धुकें, थंडी आणि मधून मधून पावसाच्या सरी येत होत्या. हाडापर्यंत थंडी जाऊन भिडत होती. मी एका पोलीस अधिकाऱ्याशीं बोलत होतों. त्याला गांधींचें शरीररक्षक नेमलें होतें. उत्तरेकडील डोव्हरच्या कड्यांकडे बोट दाखवून तो

म्हणाला, 'तो कडा तुम्हांला दिसतो का ? त्याच जागीं सीझर आपल्या फौजांसह इंग्लंड जिंकण्याकरितां उतरला होता.

'इंग्लंड जिंकण्याकरतां ! त्यानंतर हजार वर्षांनीं नॉर्मंडीचा विल्यम तेथें इंग्लंड जिंकण्याकरतां उतरला. आणखी हजार वर्षांनीं दुसरा एक जेता या वादळी समुद्रांतून येत आहे. तो शिपाई नाहीं; पण शिपायापेक्षां बलिष्ठ आहे. त्याच्या हातांत पोलादी तलवार नाहीं; पण आध्यात्मिक तलवार असलेला तो एक देवदूत आहे. तो मुलुख बेचिराख करणारा शत्रु नाहीं; पण तो इंग्लिशांच्या अंतःकरणांत खळबळ उडवणारा आणि त्यांना आश्चर्य-चकित करून टाकणारा मित्र आहे. जर इंग्लंड कधीं संकटांत असेल तर तें आतांच आहे. गेल्या दोन हजार वर्षांत एक परस्थ तिसऱ्यांदां शांतते-च्या अटी सांगण्याकरितां येत आहे.'

'माझ्या चष्म्यावरील पावसाचें पाणी मीं पुसलें आणि धुक्यांतून दर्याकडे पाहिलें. एक जहाज क्षितिजांतून वर येत होतें. एकाच सरकारी प्रति-निधीला बोटीवर जाऊं दिलें. आम्हीं सर्वजण गांधींचे मित्र व चहाते पावसांत उभे होतों. पण आम्हीं फार वेळ ताटकळलों नाहीं. थोड्या वेळांत आम्हीं बोटीवर चढलों. मी गांधींच्या केबिनच्या दारांत माझ्या परिचयाची पाळी केव्हां येते याची वाट पहात उभा राहिलों. त्याच वेळीं मीं गांधींना प्रथम पाहिलें. ते आपल्या जागेवर मांडी घालून बसले होते आणि रेनॉल्डस्-बरोबर गंभीरपणें बोलत होते. रेनॉल्ड्स गांधींच्या आश्रमांत होते व दांडी-यात्रेपूर्वीं गांधींचा खलिता त्यांनींच व्हाईसरॉयकडे नेला होता. गांधींचे पाय उघडे होते आणि अंगावर खादीची शाल होती.

'माझी पाळी आली. मी त्या लहान केबिनमध्यें गेलों. गांधीजी उभे राहिले आणि शाळेंतील मुलाच्या चपळतेनें धांवत मला भेटावयास आले. त्यांच्या डोळ्यांतील चकाकी चष्म्याच्या जाड भिंगांनीं सुद्धां लपत नव्हती. मी त्यांना पहातांच गोंधळलों, गडबडलों. ते काय माझ्याशीं बोलले याचें

मला स्मरण नाहीं. पण या पहिल्या भेटींत शब्दांपेक्षां भावना जास्त महत्त्वाच्या होत्या. मी त्या माणसासमोर होतों, ज्याच्या आत्म्याजवळ मी फार वर्षांपूर्वीं हजारों मैलांच्या समुद्रापलीकडे जाऊन केव्हांच पोहोंचलों होतों. त्याचें प्रत्यक्ष दर्शन माझ्या मनावर कायमचा ठसा उमटवीत होतें.

' माझ्या मनावर पहिली छाप कसली पडली ? ती छाप त्या माणसाच्या सौंदर्याची होती.

'गांधीजी कुरूप आहेत ही कल्पना लोकांना कुठून आली ? त्यांना ते ' खुजा ' आणि 'लहान माकडी माणूस' कां म्हणतात ? गांधींना पहातांच पहिली छाप जी पडते ती त्यांच्या शरीराच्या देखाव्याची नसून आध्यात्मिकतेची पडते. त्यांचा साधेपणा, त्यांचा प्रामाणिकपणा, त्यांची निर्वैरता लक्षांत येते. लहान बालकांतील नैसर्गिकता आणि स्फूर्ति यांसह ते आपल्याजवळ येतात. ज्याला स्वतःची जाणीव म्हणतात ती गांधींजवळ बिलकुल नाहीं. जगानें त्यांना कितीहि मोठे म्हटलें आणि त्यांची कितीहि वहावा केली तरी गांधींच्या जवळ गर्व, कृत्रिमता, वगैरे नाहीं. त्यांना पहातांच ते कसे दिसतात याऐवजीं ते कशाचे घडले आहेत हाच विचार मनांत येतो. या शरीराच्या मांसरूपी अपुऱ्या पांघरुणाखालीं चकाकत असणारें सत्य आपल्याला दिसतें. ह्यामुळेंच गांधीजी सुंदर आहेत. सत्य म्हणजेच सौंदर्य आहे ! सुप्रसिद्ध कवि किट्सनीं सौंदर्य हेंच सत्य आहे आणि सत्य हेंच सुंदर आहे असें म्हटलें आहे, त्याची आठवण होते.

' थोडक्याच वेळांत आम्ही बोटींतून खालीं उतरलों आणि लंडनच्या मार्गाला लागलों. गांधी सरकारी मोटारींत होते आणि पोलीस त्यांचें रक्षण करीत होते. देवदास, प्यारेलाल, मिराबाई, वगैरेंसह आम्ही आगगाडींतून निघालों. '

## ३४. लॉर्ड सँकीची आठवण

१४ सप्टेंबर १९३१ रोजीं गोलमेज परिषदेची पहिली बैठक सेंट जेम्स राजवाड्यांत भरली होती. तो गांधींचा मौनवार होता. गांधींनीं एक शब्दहि तोंडावाटे काढला नाहीं.

१५ सप्टेंबरला त्यांनीं पहिलें भाषण केलें. त्यांच्या त्या भाषणासंबंधीं त्याच वेळीं केलेलें पुढील टिपण लक्ष्यवेधक आहे. 'गांधीजी फार सावकाश व विचारपूर्वक बोलत होते. दर मिनिटाला ५७ शब्द ते उच्चारीत. ते सुमारें तासभर बोलले. त्यांच्या जवळ टिपण वगैरे कांहीं नव्हतें. भाषणाला सुरुवात करण्यापूर्वीं त्यांनीं हात जोडले. त्यांचा उद्देश कदाचित् प्रार्थना करण्याचा असेल. ते माझ्या शेजारीं बसले होते. त्यांच्या पायांत चपला होत्या, ते पंचा नेसले होते व त्यांच्या अंगावर शाल होती.'

लॉर्ड सँकीनें आपल्या नोंदवहींत लिहून ठेवलेलें हें गांधींचें वर्णन आहे.

लॉर्ड सँकी म्हणतात, 'गांधींची व माझी पहिली भेट १३ सप्टेंबर १९३१ रोजीं झाली. कांहीं महिनेपर्यंत आम्ही दिवसचे दिवस व तासचे तास एकमेकांशेजारीं बसत असूं.

'अत्यंत क्लिष्ट अशा वादविवादाच्या प्रसंगीं आणि अत्यंत चिंताजनक क्षणीं त्या माणसाशेजारीं बसल्यानंतर एक तर त्याच्याविषयीं आवड उत्पन्न व्हायला पाहिजे किंवा तिरस्कार वाटायला पाहिजे. गांधींचा स्नेही म्हणून माझी गणना करावयास हरकत नाहीं.'

त्यांच्या प्राथमिक परिचयानंतर लॉर्ड सँकींना विनंति करण्यांत आली कीं, त्यांनीं एका कोपऱ्यांत जाऊन गांधींबरोबर सर्व परिस्थितीची चर्चा करावी. कारण ते फेडरल स्ट्रक्चर समितीचे अध्यक्ष होते.

'गांधींनीं मला आपले विचार विस्तारपूर्वक सांगितले. त्यांना मुख्य चिंता,सरकार भरमसाट खर्च करतें व तो खर्च कराच्या रूपानें गोरगरिबांना

द्यावा लागतो ही होती. आमच्या सर्व संभाषणांत गांधींना गरिबांविषयीं वाटणारा जिव्हाळा हा प्रामुख्यानें व्यक्त होत होता. जे खेडोपाडीं रहातात त्यांच्या भवितव्याविषयीं गांधींना कळवळा वाटत होता. त्यामुळेंच ते म्हणाले, 'मोठ्या प्रमाणावरील औद्योगीकरण हें पाप आहे.'

'इतक्या दीर्घकालीन चर्चेनंतर त्यांच्याविषयीं माझ्या मनावर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. सर्व भाषणांत त्यांच्या अंतःकरणांतील धार्मिक कळकळ व्यक्त होत होती.

'गोलमेज परिषदेची बैठक संपल्यानंतरच गांधींच्या खऱ्या कामाला सुरुवात होई. रात्रीचे कित्येक तास आणि पहांटेहि ते निरनिराळ्या हित-संबंधीं लोकांबरोबर बोलत, मुलाखती घेत व त्यांना आपल्या विचारसरणी-वर आणण्याचा आटोकाट प्रयत्न करीत. पंतप्रधानांना व डिक्टेटरना आपले विचार दुसऱ्यावर लादण्याची संधी असते व साधनेंहि असतात; पण ज्यानें आपल्या प्रयत्नानें व आदर्शानें कोट्यवधि जनता आपल्या हयातींत आपल्या बाजूला आणली असें उदाहरण गांधींशिवाय दुसऱ्या कोणाचें असेल असें वाटत नाहीं.

'माझ्या सुदैवानें मला हिंदुस्थानांतील पुष्कळ ख्यातनाम व्यक्तींशीं भेटण्याचा प्रसंग आला. त्यांत वृद्ध होते, तरुण होते. ते निरनिराळ्या जातींचे व वर्गांचे होते. त्यांना गांधींचें म्हणणें पटो वा न पटो; पण सर्वांवर गांधींच्या अलौकिक व्यक्तिमत्तेची छाप पडलेली होती.

'क्षणोक्षणीं त्यांना अंतर्नादानें प्रेरणा मिळत असे. जगाच्या इतिहासांत निरनिराळ्या काळीं अन्य महापुरुषांना असेच अनुभव आले आहेत. सॉक्रे-टिस् व सेंट पॉल यांचीं नांवें उदाहरणादाखल सांगतां येतील. गांधीजी हे राजकीय दृष्ट्या गूढवादी आहेत. कांहीं प्रसंगीं त्यांचें म्हणणें अशक्य वाटलें तरी त्यांच्यांत धर्मभावना आहे. त्यांना सतत चिंता कोणाची वाटत असेल तर हिंदुस्थानची व गरिबांची.

'गांधींनीं आपल्या पुढें उच्च ध्येय ठेवलें आहे हें तर निर्विवाद आहे. मला कित्येक वेळा आश्चर्य वाटे कीं जर या माणसावर हिंदुस्थानांतील भिन्नभिन्न धर्मीय व वर्गीय लोकांनीं जबाबदारी टाकली व त्यांना अधिकार दिले तर यांचें काय होईल ? परिस्थितींत राजकारणी माणूस निरनिराळे मार्ग व साधनें यांचा विचार करतो; पण भिन्न साधनें व मार्ग हे द्रष्ट्याकरतां नसतात. अखेरीस द्रष्टा हा बहुशः राजकारणी माणसाला पराभूत करतो. माझें जर मत विचाराल तर मी असें सांगेन कीं, जेव्हां गांधींजीची जीवनयात्रा संपेल, तेव्हां हें कबूल करावें लागेल कीं जें जग त्यांच्या जन्मकाळीं होतें त्यापेक्षां त्यांनीं तें जग आपल्या प्रयत्नांनीं जास्त चांगलें केलें.'

लॉर्ड सँकींनीं गांधीजींच्या जीवनाचें केलेलें हें मूल्यमापन अत्यंत बोधप्रद व यथार्थ आहे.

## ३५. मिस् रॉयडन् यांची मुलाखत

'गांधीजींनीं जगाला एक नवी देणगी दिली व जगाची नैतिक उंची वाढवली यांत शंका नाहीं.

'हरिजनांचे आठवड्याआठवड्याला येणारे अंक, एकाद्या तप्त व तृषित भूमींत असणारांना शुद्ध जलपानाप्रमाणें वाटतात. पुष्कळ वर्षें येथील राजकीय व धार्मिक विश्वांत घालविल्यावर गांधींची सत्यनिष्ठा ही स्वर्गीय निःश्वासाप्रमाणें वाटते.'

गांधींच्याबद्दलचे हे उद्गार रॉयडन नांवाच्या एका एम्. ए., डी. डी. झालेल्या विदुषीनें काढले आहेत.

गांधीजी गोलमेज परिषदेला गेले होते. त्यांनीं गिल्ड हाउसमध्यें 'ऐच्छिक

दारिद्या'वर भाषण केलें. हॉल भरला होता व बाहेर शेंकडों लोक उभे होते. त्यांच्या भाषणानंतर त्यांना प्रश्न विचारले.

गांधीजी एका प्रश्नाला उत्तर देतांना म्हणाले, 'जवळ अगदींच कांहीं नसणें हें अंगावरील कपडे काढून टाकण्यासारखें नसून हाडावरील मांस काढून टाकण्यासारखें आहे.' इतक्यांत एकानें विचारलें, 'पण तुमच्या अंगावर तर कापड आहे. मजजवळ कांहीं नाहीं असें तुम्ही कसें म्हणूं शकाल ?'

गांधीजी म्हणाले, 'जोंवर मला शरीर आहे, तोंवर तें कशानें तरी गुंडाळलें पाहिजे, होय ना ?' पुढें हास्य निर्माण करून ते म्हणाले, 'येथें जमलेल्यांपैकीं, कोणालाहि जर माझ्या अंगावरील वस्त्र पाहिजे असेल तर त्यानें तें घ्यावें. मी पोलिसाला बोलावणार नाहीं.'

त्या वेळीं तेथें गांधींच्या रक्षणाकरतां नियुक्त केलेले पोलिस उभे होते. त्यांना आपलें हसूं आवरेना. इतरांची तीच स्थिति झाली.

मिस् रॉयडन आपल्या गाडींत गांधीजींना घेऊन स्वतः गाडी हांकीत चालल्या होत्या. वाटेंत गांधींनीं त्यांना विचारलें, 'ही डी. डी. पदवी कशाची ?' रॉयडन म्हणाल्या, 'ही पदवी ग्लासगो युनिव्हर्सिटीनें मला सन्मानार्थ दिली आहे.'

'अरेच्या ! तुम्हांला परमार्थाबद्दल सारी माहिती आहे तर !'

'गांधीजींनीं मला आपल्या पुढील कार्यक्रमाकरितां नेण्याचें कबूल केलें होतें; पण आम्ही जेव्हां गिल्ड हाउसच्या बाहेर पडलों तेव्हां लोकांचा प्रचंड जमाव आमच्याभोंवतीं जमला. मला माझी गाडी लवकर सांपडेना. लंडनमधील प्रत्येक गाडीवाला गांधींच्या जवळ येऊन बसण्याचा मान आपल्याला द्यावा अशी इच्छा प्रदर्शित करी. तो दिवस थंडीचा व पावसाचा होता आणि गांधींच्या अंगावर अगदीं थोडे कपडे होते. गांधीजींना तसें ताटकळत ठेवणें योग्य नाहीं असें मला वाटलें. मीं म्हटलें, 'येईल त्या गाडींत बसूं; माझ्या गाडीकरतां थांबूं नका.' त्यावर गांधीजी म्हणाले,

‘ छे, मी तुमच्याच गाडीची वाट पाहीन. ’ मला वाटलें माझ्या डोक्यावर गांधींनीं राजमुकुट चढविला.

‘मला त्यावर येशूच्या अनुयायाचें वचन आठवलें ‘ स्वतःचें कांहीं नाहीं; पण सर्व स्वतःचें आहे. ’ गांधींची गाडी नव्हती; पण गांधींच्या भोंवतीं अनेक गाड्या त्यांनीं आपल्या गाडींत यावें म्हणून फिरत होत्या.’

## ३६. क्लेअर शेरिडन यांनीं घेतलेली मुलाखत

गांधीजींच्या लंडनमधील आठवणी फारच विविध आहेत. सकाळच्या वेळीं त्यांना अनेकजण भेटावयास येत. कोणी जुन्या आठवणी काढीत, कोणी प्रश्न विचारीत. प्रत्येकाबरोबर सारखें बोलत रहाणें शक्य नसतें. गांधीजी त्यांना अचूक उत्तरें देत व वाटेला लावीत.

क्लेअर शेरिडन यांनीं त्यांच्या एका दिवसाच्या मुलाखतीचें वर्णन केलें आहे:

‘ दररोज सकाळीं १० ते १२ वाजेपर्यंत गांधीजी कोणालाहि भेटत असत. त्यांना बंधुत्वाच्या प्रेमानें भेटत, बोलत; पण आपल्या कांतण्यांत व्यत्यय आणूं देत नसत. एकदांच ते एका भेटीला आलेल्या गृहस्थाकरितां उठले. प्रत्यक्ष राजा आला असता तरी ते उठले असते असें मला वाटत नाहीं; पण इंग्लंडच्या चर्चचे कॅनन आले होते, त्यांच्याकरतां गांधीजी उठले. त्यांच्याजवळ एक पुस्तक होतें. त्या पुस्तकांत ‘ आम्ही चांगले ख्रिश्चन होण्याकरतां काय करावें ’ यासंबंधीं गांधींनीं संदेश द्यावा अशीं त्यांची विनंती होती.

गांधीजी अत्यंत निग्रहानें पण सौम्यपणानें जे फार वेळ बसत किंवा अप्रस्तुत प्रश्न विचारीत त्यांना घालवून देत.

असाच एक गृहस्थ आला. तो गांधींना म्हणाला, ‘ मी तुम्हांला

आफ्रिकेपासून ओळखतों.' त्यांनीं गांधींची स्मृति जागृत करण्याचा निष्फळ प्रयत्न केला.

'आपली द. आफ्रिकेंतलीं बोलणीं तुम्हांला आठवत नाहींत, मि. गांधी ?'

'मला द. आफ्रिका आठवते...'

'दरबानामधील हॉटेलची बाग तुमच्या स्मरणांत नाहीं ?'

'मला एका हॅाटेलांत, बागेंत जायचें नाहीं, या अटीवर प्रवेश मिळाल्याचें स्मरतें. हिंदु जर आपल्याच खोलींत राहिला तर तो हॅाटेलांत खपे. पण त्याचें मला महत्त्व नाहीं. मि. ए. आपल्याला पाहून मला आनंद झाला; पण जर तुम्ही गर्दींत असाल तर तुमचा वेळ मी घेऊं इच्छित नाहीं.'

मि. ए. पराभूत मनःस्थितींत निघून गेले.

त्यानंतर दुसरे गृहस्थ भेटीला आले. भेटणारांची रांगच तेथें होती. हे दुसरे गृहस्थ चांगला पोशाख केलेले, नमुनेदार इंग्लिशमन होते. गांधीजी त्यांना मोठ्या स्नेहभावानें भेटले. पण भाषणांत इंग्लंडची हवा आणि इंग्लंडमधील हरित तृणांकुर यापेक्षां जास्त कांहीं निघेना. हे गृहस्थ डॉक्टर होते. त्यांनीं गांधींवर मेणबत्त्यांच्या प्रकाशांत ॲपेंडिसायटिसची शस्त्रक्रिया केली होती व त्यांचे प्राण वांचविले होते.

या डॉक्टरनंतर एक फ्रेंच स्त्रीवकील आली. गांधींनीं विचारलें, 'फ्रान्सची युद्धमनोवृत्ति अद्याप कायम आहे ना ?' या प्रश्नाला हरकत घेऊन ती म्हणाली, 'मॉन्शुर गांधी, आम्हीं युद्ध केलें नाहीं. आम्हीं स्वतःचें रक्षण केलें.' त्यावर 'मॉन्शुर' गांधी हंसले.

नंतर एक डाव्या गटाच्या साप्ताहिकाचे संपादक गांधींना भेटावयास पुढें सरसावले. 'माझ्या मनांत जे प्रश्न विचारावयाचे होते ते त्यांनीं चर्चेकरतां मांडले. त्यांचे मुद्दे अचूक होते; पण गांधींचीं उत्तरेंहि निर्णायक व समाधानकारक होतीं.' संपादकाची पाठवणी केल्यानंतर पॉल रोबसनच्या

पत्नी आल्या व अमेरिकेंतील निग्रोंबद्दल तुमचें मत काय आहे असें विचारूं लागल्या. त्या प्रश्नाचा गांधींनीं पूर्वीं विचार केला नसावा. मिसेस् रोबसननीं आंकडे वगैरे मांडले.

‘ कधीं काळीं निग्रोंचें प्राबल्य होईल असें तुम्हांला वाटतें का ? ’

गांधींना तसें वाटत नव्हतें. पण तिनें पिच्छाच पुरविला.

‘ आम्ही मिसळून जाऊं असें तुम्हांला वाटतें का ? ’

‘ कदाचित् —’

‘ आणि नंतर—’

‘ नंतर निग्रोंचा असा प्रश्नच उरणार नाहीं. ’

इतक्यांत एकाएकीं एक जर्मन स्त्री पूर्वसूचना न देतां तेथें धडकली.

गांधींची व आपली इतकी ओळख असल्याचें तिनें दाखविलें कीं, शिष्टाचाराची तिला जरूरीच वाटली नाहीं. ते कांततां कांततां थांबले व त्यांनीं आपला हडकुळा लवचिक हात पुढें केला. तिनें दोन्ही हातांनीं तो हात धरला आणि जणुं काय आपल्या हातांत एक पवित्र वस्तु आपण धरीत आहों असें तिला वाटलें.

‘ तुम्ही जर्मनीला परत जात आहां ? ’ गांधींनीं विचारलें.

तिनें आपलें डोकें नमवलें, तिचे ओंठ स्फुरण पावले; पण तिनें उत्तर दिलें नाहीं. तिच्या डोळ्यांत अश्रू चमकूं लागले.

‘ येतें—’

तिनें एक पाऊल मागें घेतलें. तिचे हात पसरलेलेच होते. तिचे डोळे तन्मयावस्थेंत गांधींवर खिळले होते.

एक हुंदका आणि ती निघून गेली.

एक पागोटें घातलेला आगाखानांचा दूत नंतर आला. ‘ फार महत्त्वाचें...आगाखानांना आशा आहे कीं, आपण लवादाला तयार व्हाल—’ असें पत्र तो घेऊन आला.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत


नंतर एक हिंदु विद्यार्थी आपल्या अमेरिकन पत्नीसह आला. गांधींनीं तिच्यावर भेदक कटाक्ष टाकला आणि त्या तरुणाला विचारलें,

' तूं आपल्या पत्नीला हिंदुस्थानांत घेऊन जाणार का ? '

त्यानें होकारार्थी उत्तर दिलें; पण त्यांत घाबरटपणाचा नाद होता. ती वधू निष्पाप, तेजस्वी व आत्मविश्वासी होती.

' महात्माजी, तुम्ही अमेरिकेंत केव्हां येणार ? '

' अजून नाहीं —'

' तिकडे तर सर्वजण तुमच्याकरितां वेडे झाले आहेत. '

गांधीजींचे डोळे चमकले. ' माझे माहीतगार स्नेही म्हणतात मला तिकडे प्राणिसंग्रहालयांत ठेवणार आहेत. ' ( 'छे, छे, व हास्य' )

नंतर सी. एफ्. अँड्र्यूज गांधींच्या पुढील आठवड्यांतील कार्यक्रमाची चर्चा करण्याकरितां आले.

' हो, हो. ' गांधीजी कबूल झाले; पण ते तुटलेला धागा जोडण्यांत निमग्न झाले होते.

'—आणि आज संध्याकाळीं पंधरा अँग्लिकन बिशप तुम्हांला भेटण्याकरितां येणार आहेत, तें विसरूं नका. लंडनचे बिशप तुम्हांला खास भेटण्याकरितां सात वाजतां येणार आहेत. '

गांधीजी तीक्ष्ण नजरेनें पाहून म्हणाले, ' पण सात वाजण्याच्या प्रार्थनेचें काय ? '

अँड्र्यूज म्हणाले, ' ती प्रार्थना पुढें ढकलावी किंवा अगोदर घ्यावी. '

गांधींनीं निर्णय दिला, ' प्रार्थना वाटेंत मोटारगाडीमध्यें होईल ! '

पाश्चात्त्य धामधुमींत पौर्वात्य संन्यस्त जीवनाची कशी ओढाताण होत होती हें कोणालाहि पहावयास मिळे.

सोमवारच्या मौनवारावर सतत हल्ले होत; पण तो दिवस निग्रहपूर्वक प्रयत्नानेंच पाळला जाई. जेवणाच्या वेळेचीहि अशीच नेहमीं व्यग्रता असे.

गांधींनीं एकदां क्वेअरना प्रार्थनेस येण्याची परवानगी दिली. त्यांना आनंद झाला. पण गांधी म्हणाले, 'तुम्ही पहांटेच्या तीन वाजण्याच्या प्रार्थनेला आलांत, तर किंग्स्ले हॉलमध्यें रात्रीं रहाण्याची तुमची सोय करीन. मात्र आम्ही गरीब लोक आहोंत, तेव्हां येतांना तुमचीं ब्लँकेटें आणलीं पाहिजेत.'

'धुकें पडलें होतें, बर्फ गोठत होतें. अशा वेळीं मी तेथें गेलों व मला एका लहान शुभ्र मठासारख्या खोलींत नेण्यांत आलें. त्या रात्रीचें आणि तिच्या गूढ सौंदर्याचें मला विस्मरण होणें शक्य नाहीं. अर्धवट झोंपेंत फरचा कोट पांघरलेल्या मिराबाईनें मला महात्माजींच्या कोठडींत नेलें. ती कोठडी लहान, पांढरी स्वच्छ आणि गारठलेली होती. गांधीजी जमिनीवर अंथरलेल्या चटईवर बसले होते. त्यांनीं खादी पांघरली होती व ते अगदीं अशक्त दिसत होते.

'त्यांचे चिटणीस आमच्यांत आले. दिवा विझवला गेला आणि उघड्या दारावाटे अंधुक, गार, निळें धुकें येत होतें. दोघे हिंदु व एक आंग्ल संत ब्राह्मणसूत्रें म्हणत होते. मला वाटलें, मी स्वप्नांतच आहें.

'पांचच्या थोडेंसें अगोदर मिराबाईनें मला पुनः जागें केलें. ती महात्माजींची फिरण्याची वेळ होती व त्या वेळीं संभाषणाला चांगली संधी मिळते अशी वार्ता होती.

'महात्माजी आपली धार्मिक तपोनिष्ठा लंडनमधील राजकीय व अन्य चळवळींत कशी टिकवूं शकतात हें त्यांच्या आध्यात्मिक शिस्तबद्ध जीवनामुळेंच समजूं शकतें. पण मी थंडी, धुकें आणि अर्धवट झोंपेमुळें मनानें, शरीरानें व अध्यात्मानें सुन्न झालों होतों; माझ्यांत ती आध्यात्मिक शिस्तबद्धता आली नव्हती म्हणून माझी अशी अवस्था झाली. त्यांच्या पहांटेच्या फिरण्याच्या वेळीं मला बरोबर जाण्याची जी संधी मिळाली तिचा मी उपयोग करून घेऊं शकलों नाहीं. गांधींच्या बरोबर जाणें सोपें नाहीं. अंगावर खादी

टाकून ते इतक्या झपझप पावलें टाकीत कीं, त्यांची व आमची धुक्यांत चुकामूक होऊं नये म्हणून आम्हांला धांवावें लागे. आमच्या मागें दोघे दुर्दैवी गुप्त पोलिस धापा टाकीत गांधींच्या रक्षणाकरतां धांवत होते.

'गांधींना फिरण्याचा रस्ता पाठ होता. तो कालव्याच्या कडेनें जात होता. ते डोळे मिटून त्या रस्त्यानें गेले असते. धुक्यांत जरी पाणी दिसत नव्हतें तरी त्याचा खळखळाट ऐकूं येत होता. एकाच रांगेंत जेमतेम दोन माणसें चालूं शकतील इतकी ती अरुंद वाट होती. मिराबाईनें मला पुढें ढकललें. 'आतांच तुम्हांला संधी आहे.' असें त्या म्हणाल्याचें मला अंधुक आठवतें. आम्ही धर्मावर बोललों; आणि त्यांनीं मला सांगितलें कीं, 'ज्यांना सत्याबद्दल प्रेम आहे आणि ज्यांनीं द्वेष व कटुता काढून टाकली आहे, त्यांना जगभर नातलग आहेत.' पण गांधींनीं हे विचार शब्दांनीं व्यक्त करण्याची खरोखर जरूर नव्हती. त्यांच्याजवळ असलें म्हणजे कोणीहि एका उच्च पातळीवर आरूढ होऊं शके. त्यांच्याजवळ असतांना निःस्तब्धपणें चिंतन करणारा खास कांहीं लाभ करून घेऊं शकतो.

'सात वर्षांनंतर भावना दूर झाल्यावर व स्मृति स्वप्नवत् ठरल्यावर मी पूर्ण सत्यत्वानें सांगूं शकतों कीं गांधींची ओळख पटल्यामुळें माझ्यांत कांहीं तरी बदल झाला. ज्याला आपण दुसरा चांगला शब्द नसल्यामुळें स्फूर्ति म्हणतों ती माझ्यांत संचरली होती.'

गांधींसंबंधींची ही आठवण किती उब्दोधक आहे.

## ३७. काथ्याची बाज व वल्लभभाईचें संस्कृत

पाने-११६ ८८/९४ ५४ क्रि-२५०३ ३६, भवानी

येरवड्याच्या तुरुंगांत गांधी, वल्लभभाई व महादेव देसाई असे तिघेजण होते. गांधी बाहेर उघड्यावर निजत. पावसाळ्याच्या दिवसांत रात्रीं पाऊस आला म्हणजे नवार विणलेली कॉट व्हरांड्यांत आणणें मोठें ताप-

दायक होई. ती खाट फार जड असे. म्हणून गांधींनीं जेलअधिकाऱ्या-जवळ हलकी खाट मागितली. ते म्हणाले, 'आमच्याकडे काथ्याच्या दोरीची बाज आहे ती चालेल का?' बापू म्हणाले, 'हो. चालेल.' मेजर म्हणाले, 'तुम्ही म्हणत असाल तर काथ्या काढून टाकूं आणि नवार बांधून देऊं.' संध्याकाळीं बाज आली. बापू म्हणाले, 'ही ठीक आहे. नवार बांधण्याची कांही जरूर नाहीं. माझी पथारी त्यावर टाका.' वल्लभभाई म्हणाले, 'अरे, हें काय? यावर तुम्ही निजणार? तुमच्या गादींत काथ्या काय कमी आहे, म्हणून तुम्ही काथ्याच्या दोरीवर निजत आहां?'

बापू—पण पहाना, ही बाज किती स्वच्छ राहूं शकेल.

वल्लभभाई—हो, तुमचें म्हणणें ठीक आहे. या बाजेच्या चार बाजूंच्या चार खुंटांना नारळ बांधण्याचें बाकी आहे. असली अपशकुनी बाब नाहीं चालणार. मी उद्यां तीवर नवार बांधून देईन.'

बापू—नको, वल्लभभाई. नवारींत धूळ सांचते; ती धुतां येत नाहीं. पण काथ्यावर पाणी ओतलें कीं साफ.

वल्लभभाई—नवार धोब्याला दिली कीं दुसरे दिवशीं धुऊन येते.

बापू—पण काथ्याची दोरी काढावी लागत नाहीं. ती तशीच धुतां येते.

महादेव—हं. ही गरम पाण्यानें साफ करतां येते. आणि तींत ढेकूण राहूं शकत नाहींत.

वल्लभभाई—चला, आतां तुम्ही पण आपलें मत दिलेंत! या बाजेंत ढेकूणबिकूण इतके होतात कीं, विचारतां सोय नाहीं.

बापू—मी यावरच निजणार. माझ्याकडे लहानपणीं अशीच बाज वापरीत. मला त्याची आठवण आहे. माझी आई तर यावर आलें घांसत असे.

महादेव—तें काय बुवा? मला नाहीं समजलें.

बापू—आल्याचें लोणचें करायचें असलें म्हणजे आलें सुरीनें न तासतां काथ्यावर घांसावें, म्हणजे सारी साल निघून जाते.

वल्लभभाई—त्याचप्रमाणें हा काथ्या हाडावरची साल सोलून काढील. म्हणून म्हणतों नवार बांधा.

बापू—नवार तर, 'बुड्ढी घोडी आणि लाल लगामा' सारखी होईल. या बाजेला नवार शोभणार नाहीं. काथ्याच शोभेल.

वल्लभभाई—ठीक तर. माझें म्हणणें ऐकत नाहीं ना? ठीक

बापूंनीं ती बाज व्हरांड्यांतून खालीं आणवली. त्यावर वल्लभभाई म्हणाले, 'आतां पाऊस आला तर?'

बापू—तर मग वर घेऊं.

वल्लभभाई—ततो दुःखतरं नु किम्!

बापू—हें मला ठाऊकच होतें कीं, या श्लोकाचा उपयोग करण्याकरतां तुम्ही हा प्रश्न विचारलात!

वल्लभभाई जेलमध्यें संस्कृत शिकायला लागले. पण ते संस्कृतचे मोठे मार्मिक विद्यार्थी होते. महादेवभाईंना ते विचारीत नृपः प्रमाणें राजः आणि विद्वानः अशीं रूपें कां होत नाहींत? पण वल्लभभाई गीता वाचूं लागल्यावर तर त्यांनीं कहर केला. गीतेचेहि श्लोक ते अशा सुंदर रीतीनें उपयोगांत (का दुरुपयोगांत) आणीत कीं, ऐकणारे थिजत आणि चहूंकडे हास्याचे फवारे उडत. लहान मुलाला जसें एखादें खेळणें सांपडावें तसें त्यांना झालें. 'स्वर्गद्वारमपावृतम्' अशी त्यांची अवस्था झाली.

## ३८. एका म्हणीच्या दोन कल्पना

लो. टिळक व श्री. केळकर या दोघांनीं 'सल्लागार' शब्दाचे दोन अर्थ कसे केले व त्या समासाचा विग्रह कसा केला हें पुष्कळांना माहीत आहे. म. गांधी व वल्लभभाई ह्या दोघां पुढाऱ्यांनीं एका गुजराती म्हणीची व्युत्पत्ति निरनिराळ्या प्रकारें सांगितली. 'संघर्यो साप पण कामनो'

संग्रह केलेला सापहि कामीं येतो अशी ती म्हण. ही म्हण कशी प्रचारांत आली ?

गांधी म्हणाले, ' एक होती म्हातारी. तिच्याकडे एक साप निघाला. तो मारण्यांत आला. तो टाकून देण्याऐवजीं तिनें तो छपरावर ठेवला. इतक्यांत एक घार उडत उडत तेथून जात होती. तिनें तो साप पाहिला. घारीच्या चोंचींत एक मोत्याचा हार होता. घारीनें विचार केला, आपल्या चोंचींतल्या हारापेक्षां छपरावरचा साप अधिक मौल्यवान आहे, म्हणून तिनें हार तेथें टाकला आणि साप उचलला. अशा प्रकारें त्या म्हातारीनें सापाचा संग्रह केल्यामुळें मोत्यांचा हार मिळाला. '

पण सरदारांनीं त्या म्हणीचा इतिहास पुढीलप्रमाणें सांगितला :

'एक होता वाणी. त्यांच्या घरीं साप निघाला. त्या सापाला मारणारा मिळाला नाहीं; त्याला मारण्याची हिंमत नव्हती किंवा मारायचा नव्हता म्हणून त्या वाण्यानें त्या सापावर एक तपेलें टाकलें व साप झांकून ठेवला. त्या रात्रीं वाण्याच्या घरीं चोर आला. त्या चोराला वाटलें, या तपेल्याखालीं डबोलें असावें. म्हणून त्यानें कुतूहलानें तें तपेलें काढलें. त्याबरोबर सापानें त्याला दंश केला आणि चोर मरण पावला. '

अशा प्रकारें एकाच म्हणीची व्युत्पत्ति दोघांनीं सांगितली.

## ३९. बुक–बाइंडर वल्लभभाई

वल्लभभाईंना एकदां गांधीजी म्हणाले, ' तुम्ही कधीं बुक बाइंडिंगचें काम केलें आहे का ? नसलें केलें तर मी शिकवतों. '

गांधीजींना आकाशदर्शनाचें तुरुंगांत वेडच लागलें होतें. ते आकाशांत नक्षत्रें व तारे पहात आणि इतरांना दाखवीत. त्या विषयावरील ते पुस्तकेंहि वाचीत. आश्रमांतल्या रहिवाशांना पत्रामधून नक्षत्रविद्येचे पाठ देत. त्यांच्या

कडे ‘ खगोलचित्र ’ नांवाचें एक पुस्तक आलें. तें जुनें होतें. त्याचा पुठ्ठा वगैरे निघाला होता. आतां हें पुस्तक कसें नीटनेटकें करायचें ? गांधींनीं वल्लभभाईंना वरील प्रश्न विचारला.

दुसरे दिवशीं सकाळीं फिरतां फिरतां गांधीजी म्हणाले, ‘ या लहान-सहान गोष्टी करण्याचा नाद तुम्हांला लहानपणापासून आहे, का इथं लागला ? म्हणजे तुम्ही पूर्वी कारागीर होतां कां इथं झालांत. ? ’

वल्लभभाई म्हणाले, ‘ छे, तसं कांहीं नाहीं. पण पाहिलें म्हणजे सुचे. ’

गांधी म्हणाले, ‘ ही दृष्टि जन्मतःच असते. दासबाबूंना सुईंत दोरा कसा ओवावा हें ठाऊक नसे. मोतीलालजी अनेक वस्तू करून घेत. ’—गांधी.

महादेवभाई म्हणाले, ‘ मोतीलालजींनीं पाणी जंतुरहित करण्याचें यंत्र स्वतःच घरीं बनविलें होतें आणि ते आजारी माणसांना जंतुरहित पाणी पाजीत असत. ’

वल्लभभाईंनीं ‘ खगोलचित्र ’ हें पुस्तक फार चांगलें शिवलें. त्याच्या-मागें पट्टी पण चांगली लावली. गांधीजींच्याकडून वल्लभभाईंना बुक-बाइंडर म्हणवून घेण्यांत अधिक आनंद झाला का मुत्सद्दी म्हणवून घेण्यांत अधिक आनंद झाला कोण जाणे ! पण मुत्सद्यापेक्षां गांधींनीं त्यांना चांगला बुक-बाइंडर म्हटलें त्याचेंच त्यांना बरें वाटलें असेल.

## ४०. ईश्वरी साक्षात्कार ?

डॉ. मॉट नांवाचे एक अमेरिकन मिशनरी सेवाग्रामला दोनदां आले. १९३६ सालीं ते प्रथम आले व नंतर १९३८ सालीं. १९२८ सालीं ते अहमदाबादला गांधींना भेटले होते. त्यांचें वय ७३ वर्षांचें होतें. ते अत्यंत संयमित जीवन घालवीत. पैशाचा किंवा अधिकाराचा मोह त्यांना संकल्पित कार्यापासून परावृत्त करूं शकला नाहीं. अमेरिकेंत त्यांना मोठमोठ्या जागा

देऊं केल्या; पण खऱ्या ख्रिश्चन धर्माच्या प्रचाराचें काम त्यांनीं अंगावर घेतलें. त्याकरतां त्यांनीं १०० कोट रुपये जमविण्याची आकांक्षा बाळगली. त्यांचें हिंदुस्थानवर अत्यंत प्रेम असे. ते महात्माजींना म्हणाले, 'आमच्या देशाला हिंदुस्थान दुसऱ्या कोणत्याहि देशापेक्षां अधिक शिकवूं शकेल.' गांधींच्याबद्दल त्यांना अत्यंत आदर व प्रेम असे.

एकदां त्यांचा व गांधींचा ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल संवाद झाला. डॉ. मॉटनीं विचारलें,

'तुम्ही संकटांत सांपडलांत, तुम्हांला संदेह वाटला किंवा तुमच्यापुढें नाना प्रश्न उभे राहिले तर तुमच्या आत्म्याला कशामुळें समाधान वाटलें आहे ?'

गांधी—ईश्वरावरील जिवंत श्रद्धेमुळें.

डॉ. मॉट—तुमच्या जीवनांत तुम्हांला ईश्वराचा निःसंदेह असा साक्षात्कार अनुभवावयास मिळाला आहे का ?

गांधी—मीं असें पाहिलें आहे आणि माझी अशी श्रद्धा आहे कीं, ईश्वर देहधारण करून कधींहि तुमच्यापुढें येत नाहीं; पण तो कृतीच्या रूपानें येतो. तुमच्या जीवनांत अत्यंत अंधकारमय प्रसंग आला असला आणि त्यांतून तुम्ही सुटलांत तर त्या सुटकेला दुसरें कारण असूं शकत नाहीं.

डॉ. मॉट—याचा अर्थ असा कीं, ईश्वराशिवाय गोष्टी घडत नाहींत.

गांधी—होय. त्या एकाएकीं घडतात आणि आपल्याला पूर्वकल्पना नसतांना घडतात. माझ्या स्मरणांत एक प्रसंग अगदीं ठसठशीतपणें त्या-संबंधींचा आहे. अस्पृश्यता निवारण्याकरतां २१ दिवसांचा मीं जो उपास केला त्यासंबंधीं तो अनुभव आहे. नेहमींप्रमाणें रात्रीं मी झोंपीं गेलों. माझ्या मनांत दुसऱ्या दिवशीं उपास जाहीर करण्याची यत्किंचित्‌हि कल्पना नव्हती. रात्रीचे बारा वाजले असतील. त्या वेळीं मला कोणी तरी जागें करीत आहे असा मला भास झाला, आणि कुठला तरी आवाज-

[stamp]

बाहेरचा का आंतला तें सांगवत नाहीं—मला हळूच सांगूं लागला, 'तूं उपास सुरू केलाच पाहिजे.' मीं विचारलें,'किती दिवस ?' तो आवाज पुनः मला सांगतो, 'एकवीस दिवस.' मीं आणखी विचारलें, 'केव्हां सुरू करूं ?' त्या आवाजानें सांगितलें, 'उद्यांपासून.' मी उपास सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि शांतपणें झोंपीं गेलों. सकाळची प्रार्थना संपेपर्यंत मी माझ्या जवळच्याहि कोणाबरोबर उपासासंबंधीं बोललों नाहीं. प्रार्थना संपल्यावर मीं एक चिठ्ठी जवळील मंडळींच्या हातीं दिली. त्यांत मीं त्यांना कळविलें, मीं २१ दिवसांचा उपास सुरू करीत आहें. माझ्याशीं चर्चा करूं नका. कारण माझा निर्धार बदलणार नाहीं.

'डॉक्टरना वाटलें मीं या उपासांत जगत नाहीं. पण आंतून कोणी तरी सांगत होतें, 'तूं, वांचशील. पुढें चल.' या अनुभवासारखा अनुभव मला त्यापूर्वीं आला नाहीं व त्यानंतरहि आला नाहीं.'

डॉ. मॉटनीं गांधींना विचारलें, 'ही प्रेरणा कोणा दुष्ट शक्तीची नसेल कशावरून ?'

गांधी म्हणाले, 'माझ्या आयुष्यांत जर आध्यात्मिक उपास घडला असेल तर तो हाच. ईश्वराला साक्षात् पहावयाचें असेल तर तुम्ही शरीर-भोगाचा त्याग करावयास हवा.'

## ४१. खरी भक्ति

१९३३ सालीं महात्माजींनीं हरिजनांकरतां दौरा काढला होता. हिंदुस्थानांत ते गांवोगांव जात. त्यांचा मुख्य उद्योग निधि गोळा करण्याचा असे. लहानापासून थोरापर्यंत ते द्रव्य, दागिने मागत. सभेंत वस्तूंचा लिलांव करीत. स्टेशनवर हात पसरीत. अशा प्रकारें थोड्या अवधींत ३–३॥ लाख रुपये त्यांनीं जमविले.

एकदां भोपाळला सभा भरली होती. गांधींच्या स्तुतिपर सात मुलींनीं संस्कृत पद म्हटलें. त्या सात जणींत जी प्रमुख होती, ती गांधींना पुष्पांजली अर्पण करावयास आली. गांधी म्हणाले, ‘ नुसतीं फुलेंच ? दक्षणा नाहीं ? तुझी आंगठी हरिजन फंडाला कां देत नाहींस ? ’ ‘ घ्या कीं. ’ असें म्हणून ती डाव्या हातांतल्या बोटांतली आंगठी काढूं लागली.

‘ नको, नको, नको. तुझी आई किंवा बाप तुला रागें भरतील. असूं दे. काढूं नकोस. ’ गांधी म्हणाले.

‘ नाहीं हो. ते नाहीं बोलणार मला. ’ मुलगी म्हणाली.

‘ पण नको. नको काढूंस. ’ गांधी म्हणाले. ती पोर हिरमुसली. आपली आंगठी गांधी घेत नाहींत, यामुळें तिची निराशा झाली. ती काकुळतीनें म्हणाली ‘ घ्या ना. ’

‘ तर मग दे. ’ गांधींनीं भक्ताची परीक्षा पाहिली.

पण बोटांतून आंगठीच निघेना. तिनें गांधींपुढें हात धरला. गांधींनीं आंगठी काढण्याचा मिनिट दोन मिनिट प्रयत्न केला. पण त्यांनाहि जमेना. ‘ छे, बुवा ! निघत नाहीं. ’ गांधी म्हणाले. ती मुलगी खट्टू झाली. पण ती ताबडतोब खालीं उतरली. एका गृहस्थाकडे जाऊन तिनें आंगठी काढण्यास सांगितलें. आंगठी फारच घट्ट बसली होती. त्यालाहि ती निघेना. पण तिनें गांधींना आंगठी देण्याचा कृतनिश्चय केला होता.

तिनें पाणी आणवलें व त्यांत बोट घातलें. गार पाण्यामुळें बोट आकसलें आणि आंगठी निघाली. ती हर्षानें नाचत गांधींकडे गेली व त्यांच्यापुढें तिनें आंगठी ठेवली. गांधींनीं आंगठी घेतली तेव्हां तिला अत्यंत आनंद झाला.

[library stamp]

## ४२. एकवीस रुपये तीन वार !

तुमसररोड स्टेशनवरून गाडी सुटत होती, इतक्यांत एक पाश्चात्त्य धर्तीचा पोशाक केलेला गृहस्थ गांधींच्या डब्यांत शिरला आणि टोपी काढून व मान वांकवून त्यानें 'गुड मॉर्निंग, मि. गांधी' असें म्हटलें. गांधी कोपऱ्यांत बसले होते. त्यांच्याकडे त्यांनीं बघितलें.

'येथें मी एकटाच युरोपिअन आहें.' असें ते म्हणाले.

'तुमचें ठीक चाललें आहे ना ?' गांधींनीं विचारलें.

'होय, मी एकटाच युरोपिअन आहें.' पुनः तेंच वाक्य त्यांनीं उच्चारलें.

'तुम्ही काय करतां ?' महात्माजींनीं विचारलें.

'मी रेल्वेंत होतों. मला अपघात झाला; म्हणून मी निवृत्त झालों.'

'अस्सं काय !'

आकाशाकडे दृष्टि वळवून तो म्हणाला, 'परमेश्वर आपणास यश देवो.' इतक्यांत गाडीनें शिट्टी फुंकली.

'मि. गांधी, माझें नांव यंग आहे.' असें म्हणून त्यानें ते आनंदित होत्साते चालत्या गाडींतून उतरले.

पुढें गोंदिया स्टेशन आलें.महात्माजी झोंपेंतून उठले. मांडी घालून बसले. दर्शनाकरतां लहानथोर स्त्रीपुरुषांची चिक्कार गर्दी झाली होती. ते दाराजवळ येऊन उभे राहिले. कांहीं हरिजनांचीं मुलें त्यांच्या पायाला स्पर्श करीत व तोच हात डोळ्यांना लावीत. 'पुरे, पुरे' असें गांधी म्हणत होते.

'मला पैसा, दोन पैसे, जें काय असेल तें द्या.' असें गांधी जमावाला ओरडून सांगत होते. 'तुम्ही गरीब आहां हें मला ठाऊक आहे. पण तुमच्यापेक्षांहि हरिजन गरीब आहेत. त्यांना मदत करण्याकरतां मला पैसा हवा आहे!' उजव्या हातानें ते हरिजन मुलांच्या पाठी थोपटत होते व डावा हात त्यांनीं भिक्षेकरतां पुढें केला होता.

एका मुलानें केळीं आणलीं. गांधी म्हणाले, 'वांटून टाक साऱ्या मुलांना.'

इतक्यांत एका बाईनें त्यांना एक चाळण दिली.

'हें काय आहे ?' गांधांनीं विचारलें. गाडी सुटायला मिनिटभर अवकाश होता. पण तेवढ्यांत त्यांनीं सौदा केला.

'पहा, किती सुंदर व उपयोगी जिन्नस आहे हा.' असें म्हणून त्यांनीं ती चाळण उंच धरली. त्या चाळणीचा ते लिलांव करीत होते.

चार आण्यांपासून लिलांवाला सुरुवात झाली. पण तो लिलांव सारखा चढूं लागला. ५ रु., ६ रु., १२ रु. असें होत होत २१ रुपयाला गांधींनीं तीन वार केले.

ते जागेवर येऊन बसले, तेव्हां त्यांच्या हातांत तांब्याच्या नाण्यांचा वर्षाव झाला. एका म्हाताऱ्यानें दुरून एक पैसा गांधीजींकडे टाकला. तो खिडकीला लागला व गांधींच्या मांडीवर पडला. गांधींनीं हंसून त्या म्हाताऱ्याचे आभार मानले.

## ४३. हरिजन फंड व लिलांवावर लिलांव

गांधींना हरिजन दौऱ्यांत कोणीं काय द्यावें त्याला धरबंधच नव्हता. चित्रें, खेळणीं, वगैरे तर होतींच; पण एके ठिकाणीं त्यांना सिगरेटची पेटी देण्यांत आली. अर्थात् अशा वस्तूंचा ते लिलाव न करतां त्या मालकाला परत देत. एके ठिकाणीं कोणा एकानें दोन शेर कणिक त्यांना दिली. तिचा लिलांव करून त्यांनीं ४० रुपये मिळवले !

एकदां गांधी विजगापट्टमला चालले होते. वाटेंतल्या एका लहान स्टेशनवर त्यांची गाडी उभी राहिली व एका तरुणानें त्यांना गुलबाचें फूल आणून दिलें. 'मला गुलाब कशाला ? गुलाबाच्या फुलांनीं का मला हरिजनसेवा करतां येईल ?' गांधींनीं प्रश्न विचारला.

इतक्यांत दुसरा एक गृहस्थ मोरपिसाचा पंखा घेऊन आला. गांधींनीं विचार केला, गुलाबाच्या फुलापेक्षां ही जिन्नस लिलांव करायला चांगली आहे. त्यांनीं पंख्याचा वारा घेतला व लोकांना दाखवलें, या वस्तूचा किती उपयोग आहे तो. पण त्या पंख्याला फक्त १॥ आणाच मागणी झाली.

त्यावर गांधी म्हणाले, 'हा मुलूख मागासलेला दिसतो.'

हें ऐकतांच प्रांताभिमान उसळला व एका गृहस्थानें पंख्याला एका रुपयाची मागणी घातली.

मागणी बरी आहे असें म्हणून गांधींनीं पसंतीदर्शक मान हलवली. असें करतां करतां पांच रुपयाला पंख्याचा लिलांव झाला. गांधी म्हणाले, 'कोण म्हणेल हा भाग मागासलेला आहे ! तो चांगला पुढारलेला आहे की.'

पुढें गाडी राजमुंद्रीला पोहोंचली. राजमुंद्रीला गांधींना एक नारळाच्या करंवटीची आंगठी एकानें बक्षिस दिली. त्या करंवटीच्या कड्यावर एक मौल्यवान् खडा बसवला होता. नेहमींप्रमाणें गांधींनीं त्या आंगठीचा लिलांव पुकारला. कोणी तरी 'दीड रुपया' ओरडलें.

'छे छे ! एवढ्यानें कसें भागेल ? ' पटाईत व्यापाऱ्याप्रमाणें गांधींजी आंगठीची स्तुति करूं लागले. सोन्याच्या आंगठीपेक्षांहि हिची किंमत अधिक आहे.' त्यांनीं ती आंगठी बोटांत घातली आणि लोकांना दाखवली. 'पहा, कशी सुंदर दिसते ती ! गांधींच्या ह्या वर्णनानें आंगठीची किंमत चढली; पण ती २॥ रुपयांपलिकडे गेली नाहीं.

तितक्यांत त्यांना एक सोन्याची आंगठी एकानें आर्पण केली. 'छे ! मला कशी ही घालतां येईल ? ' असें म्हणून त्यांनीं त्या आंगठीकडे मिस्किलपणें पाहिलें. 'मीं जर आंगठी घातली, तर मला पुनः लग्न करावें लागेल. आणि तसें झालें तर येरवड्याच्या तुरुंगांत असलेल्या त्या म्हातारीला काय वाटेल ?'

गांधींच्या ह्या विनोदानें सर्वांना हसूं लोटलें.

## ४४ जवाहरलालना काय वाटतें?

'हिंदुस्थानांतील राष्ट्रीयत्वाची चळवळ ही सर्व राष्ट्रीय चळवळींप्रमाणें बुर्झ्वा चळवळ होती. त्या चळवळीला कामगार-चळवळ म्हणणें चूक आहे. हिंदी चळवळीचे गांधीजी प्रतिनिधि आहेत. राष्ट्रीय ध्येयवादाच्या कक्षेंत राहून गांधीजींनीं चळवळ केली; पण त्यांच्या जीवनांतला प्रधान हेतु आम जनतेचा उद्धार करावा, हा होता. या बाबतींत ते राष्ट्रीय चळवळीच्या पुढें असत. हिंदुस्थानांतील व जगांतील आर्थिक घटनांमुळें हिंदी राष्ट्रीयत्व हें सामाजिक क्रांतीकडे जोरानें ढकललें गेलें आणि आज तें राष्ट्रीयत्व नव्या सामाजिक ध्येयवादाच्या कांठावर घोटाळत आहे.'

असें पं. जवाहरलाल नेहरूंनीं केलेल्या हिंदी चळवळीच्या वर्णनाचें सार आहे.

'पण' जवाहरलाल म्हणतात, 'गांधींची हिंदुस्थानला व हिंदी जनतेला जर कोणती मुख्य देणगी असेल तर ती राष्ट्रीय सभेंत केलेल्या प्रचंड चळवळींची. राष्ट्रव्यापी चळवळींच्या द्वारां त्यांनीं कोट्यवधी लोकांना घडवले आणि त्यांत त्यांना पुष्कळसें यश आलें. नीतिभ्रष्ट, भित्र्या, निराश झालेल्या, प्रभावी शक्तीच्या धाकदपटशाला बळी पडलेल्या, चिरडलेल्या आणि प्रतिकाराला अक्षम असलेल्या जनतेला गांधींनीं स्वाभिमानी, स्वावलंबी, जुलमाविरुद्ध प्रतिकार, सामुदायिक उठाव, आणि उच्च ध्येयाकरतां त्याग करणारी अशी बनवली. त्यांनीं जनतेला राजकीय व आर्थिक प्रश्नांचा विचार करावयास लावलें. आणि प्रत्येक खेड्यांतून व बाजारांतून जनतेंत संचरलेल्या नव्या आशा व नव्या कल्पना यांच्या चर्चेचे आणि युक्तिवादांचे पडसाद उठले. ही मानसिक क्रांति आश्चर्यकारक होती. त्या क्रांतीकरतां काळ परिपक्व झाला होता; आणि जागतिक परिस्थिति या क्रांतीकरतां अनुकूल होती; पण परिस्थितीचा व अवस्थांचा फायदा घेण्याकरतां

मोठा पुढारी लागतो. तो पुढारी गांधीजी होते. त्यांनीं आपल्या मनाला दुर्बल करणारे आणि बंदीवान बनविणारे अनेक पाश दूर केले. ज्यांना या बंधमुक्ततेचा अनुभव आहे, त्यांना कधींहि आपल्याला झालेल्या हर्षाचें आणि वाटलेल्या विमुक्ततेच्या भावनेचें विस्मरण होणार नाहीं. गांधीजींनीं या क्रांतिकाळांत अत्यंत महत्त्वाची कामगिरी केली. बाह्य परिस्थितीचा जास्तींत जास्त उपयोग कसा करावा, हें गांधींना ठाऊक होतें. ते जनतेच्या अंतःकरणाला जाऊन भिडले. गांधींचें हें कार्य चालू असतां अन्य गट अधिक प्रागतिक ध्येयवादाला बिलगून हवेंत वावरत होते. कारण ते विद्यमान परिस्थितींत बसूं शकत नव्हते आणि त्यामुळें जनतेकडून भरीव प्रत्युत्तर ते मिळवूं शकले नाहींत.

'गांधींना ब्रिटिश साम्राज्यशाहीचा हस्तक म्हणणें हें कमालीच्या नादानपणाचें लक्षण आहे. त्यामुळें फक्त हंसू येतें. त्याचें उत्तर ब्रिटिश सरकार व ब्रिटिश साम्राज्यवादीच देतील.ते गांधींना आपला भयंकर शत्रू मानीत आले.

'राष्ट्रीयत्वाच्या भूमिकेवरून कार्य करणारे गांधी वर्गविग्रहाच्या दृष्टीनें विचार करीत नाहींत हें खरें आहे. वर्गसमन्वयाचा प्रयत्न करतात. पण जी कृति ते आचरतात आणि जनतेला शिकवतात तींतून आम जनतेची जाणीव खूपच वाढली आणि सामाजिक प्रश्न तीव्र झाले.

'गांधींच्या व काँग्रेसच्या कृतीमागें कांहीं व्यक्तीमत्त्व आहे व त्यालाच महत्त्व आहे.'

त्यांचीं कार्यें व धोरण हीं ह्या व्यक्तीमत्तेनें रंगलेलीं आहेत. हें व्यक्तिमत्त्व स्लोकंब्रच्या शब्दांत जवाहरलालनीं वर्णिलें आहे व तें आपल्याला मान्य आहे असें म्हटलें आहे. स्लोकंब्र म्हणतात :

' मीं गांधींच्यापेक्षां अधिक तीव्र प्रामाणिक, अधिक स्फटिकतुल्य, कळकळीचा, अहंकार, गर्व, संधि साधणारा व महत्त्वाकांक्षा नसलेला माणूस पाहिला

नाहीं !' हें स्लोकंबचें मत कोट्यवधि हिंदी लोकांचें आहे असें जवाहरलाल म्हणतात.

## ४५. मौनाला सुरुवात

प्रार्थना, उपवास, मौन, वगैरे प्रकार गांधीजींच्या आयुष्यांत महत्त्व पावले आहेत. त्यांना ते जीवनसिद्धीच्या दृष्टीनें अत्यंत मोलाचे मानीत. १९३६ सालीं त्यांनीं डॉ. मॉटना आपल्या मौनाचा इतिहास सांगितला. गांधीजींनीं त्या सालीं दोन महिने मौन पाळलें होतें. ज्या दिवशीं हे डॉक्टर त्यांना भेटले त्याच दिवशीं गांधींचें मौन सुटलें होतें. 'या मौनाच्या जादूंतून मी अद्याप बाहेर पडलों नाहीं.' असें गांधी म्हणाले.

'अलिकडे सायंकाळची प्रार्थना संपली म्हणजे मी मौन धारण करतों व दुसरे दिवशीं दुपारीं २ वाजतां तें सोडतों. मौन ही आतां शारीरिक व आध्यात्मिक आवश्यकताच झाली आहे. सुरुवातीला कामाचा शीण हलका करावा म्हणून मी मौन पाळूं लागलों.

'नंतर लेखनाकरतां वेळ मिळावा म्हणून मी मौन पाळी. कांहीं दिवस मौनाची संवय झाल्यावर मला त्याची आध्यात्मिक योग्यता दिसून आली. एकाएकीं माझ्या मनांत एक कल्पना चमकून गेली कीं, ईश्वराशीं एकरूप होण्याकरतां मौनाची वेळच अत्यंत चांगली. आतां तर मला वाटतें कीं, माझी स्वाभाविक ठेवणच मौनाची आहे. माझ्या बाळपणापासून माझी मौनासंबंधींच ख्याति होती. मी शाळेंत बिनबोलका विद्यार्थी होतों आणि लंडनमधील माझ्या वास्तव्यांत माझे मित्र मला मुकस्तंभच समजत असत.

## ४६. तुम्हांला हिंदुस्थानी आलें पाहिजे

१९४६ सालीं गांधी दौऱ्यावर होते. बंगाल-आसामचा दौरा संपवून ते आंध्र प्रांतांत गेले.

एका रेल्वे स्टेशनवर त्यांना इंग्रजींत मानपत्र देण्याच्या समारंभाची योजना केली होती. एक गृहस्थ तें मानपत्र इंग्रजींत वाचूं लागले. थोडेंसें होतांच गांधीजींना तें वाचन असह्य झालें त्याणि ते हिंदुस्थानींत म्हणाले, 'इंग्रजी मानपत्र वाचण्याचा तुमचा काय हेतु आहे ? तुम्ही हिंदी आहां. तुम्ही हिंदुस्थानींत मानपत्र कां लिहिलें नाहीं ? तुमची इच्छा असेल तर तेलगूंत बोला. इंग्लिश लोकांकरतां इंग्रजी वापरावी. तुम्हांला इंग्रजी येत असेल;पण तुम्हांला हिंदुस्थानी आलें पाहिजे. इतर प्रांतांतल्या तुमच्या बांधवांना तुमचें म्हणणें कळलें पाहिजे. मी तुम्हांला एकहि इंग्रजी शब्द वाचायला परवानगी देणार नाहीं !'

गांधींच्या या कानउघाडणीमुळें तो गृहस्थ जागच्या जागीं थिजला.

गांधीजी इंग्रजींत स्वाक्षरी देत नसत. ते हिंदुस्थानींत किंवा स्थानिक प्रांतीय लिपींत स्वाक्षरी देत.

## ४७. लिफाफ्यांतील नोट

हरिपुरा कॉंग्रेस म्हणजे गुजरातच्या वैभवाचें व आनंदाचें निधान. सारा गुजरात उत्साहानें कांठोकांठ भरला होता. महात्माजी आले, वल्लभभाई आले, आणखी कोण कोण येणार ? आपली भूमि या पुढाऱ्यांच्या आगमनामुळें धन्य व पवित्र झाली असें त्यांना वाटूं लागलें. एकदां तर साऱ्या राणीपरज कामगारांनीं कामच करायचें थांबविलें. ते म्हणाले, 'आज आमचा राजा येणार आहे, राजा !' 'कॉंग्रेसमध्यें कुठला राजा?' 'तें आम्हांला कळत

नाहीं. आमचा राजा आज ५१ बैलांच्या रथांतून येणार आहे,' असें म्हणून त्यांनीं कुदळी फावडीं टाकून दिलीं.

गांधी त्या वेळीं आजारी होते. त्यांची झोंपडी दूर बांधली होती. लोकांची वर्दळ होऊं नये व त्यांचें स्वास्थ्य बिघडूं नये म्हणून डॉक्टरांच्या सल्ल्यानें ही काळजी घेतली गेली होती. गांधींच्या झोंपडींत जायला पास काढले होते. अगदीं जवळच्या मंडळींनाहि पास घ्यावे लागत. महादेवभाईनाहि पास काढावा लागला.

एके दिवशीं डॉ. गिल्डरनीं गांधींबद्दल चिंता व्यक्त करतांच महादेवभाईनीं सर्वांनाच प्रवेशाला बंदी केली. पण या बंदीचें बंधन खेडुतांना आणि दूरच्या श्रद्धावान लोकांना काय ? एकदां दुपारीं महादेवभाई पोस्टांत पत्रें टाकण्याकरतां निघाले. वाटेंत खांद्यावर पडशा टाकलेले दोघेजण महादेवभाईकडे धांवत आले. त्यांतल्या एकाला महादेवभाईनीं ओळखलें. तो पंजाबचा म्हातारा होता व गांधींच्या प्रार्थनेला दिल्लीला जात असे.

'काय, कॉंग्रेसला आलांत ?' महादेवभाईनीं विचारलें.

'हो, आज सकाळीं आलों.'

'मग उतरायला जागा मिळाली का नाहीं ?'

'त्याची कोण फिकिर करतो ! आम्हांला प्रथम गांधींचें दर्शन घ्यायचें आहे. आम्ही त्यांची झोंपडी सारखी धुंडाळीत आहों. पण झोंपडी कांहीं सांपडत नाहीं. तुम्ही आम्हांला सांगाल, कोठें आहे त्यांची झोंपडी हें ?'

ते उपाशी आहेत व गांधींचें दर्शन घेतल्याशिवाय जेवणार नाहींत व रहाण्याकरतां जागाहि पहाणार नाहींत हें महादेवभाई जाणून होते. ते म्हणाले, 'मी पत्रें टाकून येतों आणि नंतर तुम्ही माझ्याबरोबर या.'

त्या वृद्ध गृहस्थाला गांधींच्या समोर नेतांच त्यानें एक पोस्टाचा न वापरलेला लिफाफा काढला व तो गांधींच्या समोर ठेवला. त्या लिफाफ्याबरोबर त्यानें स्वतः कातलेल्या सुताची खादीहि ठेवली. या मळक्या लिफा-

नगर वाचनालय ता.

ण्यांत काय असेल याबद्दल गांधी विचार करीत राहिले. त्यांत एक शंभर रुपयांची नोट होती.

अमृत कौर जवळ होत्या. त्यांनीं पंजाबींत विचारलें, ' ह्या लिफाफ्यांत पैसे कां आणले ? '

' मजजवळ दुसरा लिफाफा नव्हता. ' म्हातारा म्हणाला, ' आणि मीं असें ऐकलें आहे कीं, येथें पुष्कळ खिसेकापू लोक आहेत. म्हणून हरि-पुरला पोहोंचल्यावर माझा खिसा कापला जाण्यापूर्वीं पहिली गोष्ट करायची ती, पैसे गांधींना देऊन माझा बोजा हलका करायचा ही, असें मीं ठरवलें. आतां मला मोकळें मोकळें वाटत आहे. आतां मी जागा वगैरे पाहीन. येथें येण्यांत माझा हेतु साध्य झाला. '

## ४८. पठाणांच्या मुलखांत

१९३८ च्या ऑक्टोबर महिन्यांत गांधीजी सरहद्द प्रांतात दौऱ्यावर गेले होते. सरहद्द प्रांत अत्यंत सुंदर व सृष्टिसंपन्न. खुदाई खिदमतगारांची तेथील संघटना अद्वितीय होती. पण पठाणी मुलखांत कोणत्या वेळीं काय होईल हें सांगवत नसे.

उत्मनझाईला गांधींचा मुक्काम होता. गांधींबद्दल खानसाहेबांना विशेष काळजी वाटली. ज्या ठिकाणीं रात्रीं गांधींचा मुक्काम होता त्या घरावरच्या गच्च्यांवर खानसाहेबांनीं खुदाई खिदमतगारांचा जागता पहारा बसवला. ही काळजी घेण्यापूर्वीं खानसाहेबांनीं गांधींना सर्व सामान्यपणें एवढेंच विचारलें, 'पहारा ठेवण्यास तुमची हरकत आहे का ?' गांधींचें मौन होतें आणि हा प्रश्न कां विचारला जात आहे हें न समजून घेतां ते फक्त मानेनें ' नाहीं ' असें म्हणाले. खानसाहेबांनीं त्याचा अर्थ स्वतःच्या सोईप्रमाणें लावला व

पहारा ठेवला. पण जेव्हां गांधींना सशस्त्र पहाऱ्याची हकिगत समजली तेव्हां त्यांनीं हरकत घेतली.

गांधी म्हणाले, 'दुसऱ्याकरतां पहारा ठेवला तर मी तिकडे दुर्लक्ष करीन; पण माझ्याकरतां तें चालूं देणार नाहीं.' खानसाहेबांनीं सशस्त्र पहारा उठवला. पण साध्या पहाऱ्याला गांधीजींची हरकत अमान्य केली व गांधीहि त्याला कबूल झाले. पण गांधींना तें पटलें नाहीं. ते म्हणत, 'जर एक लाख अहिंसावादी स्वयंसेवक असतील तर त्यांनीं सरहद्दीपलिकडील टोळीवाल्यांचें प्रेम संपादन केलें पाहिजे व त्यांना प्रेमानें जिंकलें पाहिजे.

## ४९. पठाणांचें आदरातिथ्य

पठाणी मुलखांतून गांधी चालले होते. प्रत्येक खेडें रस्त्याच्या दुतर्फा त्यांच्या दर्शनाकरतां उभें असे. ते जमलेले लोक अत्यंत शांत असत. त्यांना तशी शिस्तच सरहद्द गांधींनीं लावली होती. पठाण अत्यंत आदरशील. तोच त्यांचा सद्‌गुण गैरसोईचा असे. गांधींनीं फुलें घ्यावींत, फळें स्वीकारावींत, असें त्यांना वाटे; पण खानसाहेबांनीं आगाऊ सूचना देऊन ह्या मोटारपासून आपल्या अनुयायांना परावृत्त केलें होतें. पण एकदां ह्या आदरातिथ्याला गांधींना मान द्यावा लागला. एका खेड्यांतल्या लोकांनीं गांधींना मोटारीबाहेर येण्यास विनविलें. त्यांनीं फळें, ऊस व भाज्या गांधींना अर्पण केल्या.

'तुम्हीं आमच्यांत येऊन राहिलें पाहिजे व हा प्रांत तुमचा म्हणून समजलें पाहिजे. तसा आमचा तुमच्यावर हक्क आहे. तुम्ही आमच्या बादशहाखानांना सहा वर्षें तुमच्या मुलखांत ठेवलेंत. आतां तुम्ही आमचे प्रेमाचे कैदी म्हणून सहा महिने तरी राहिलें पाहिजे.'

गांधीजी मनसोक्त हंसले आणि इतर मंडळीहि हंसली. गांधींना ती कैद लाभली नाहीं.

त्या गांवांतलीं लहान मुलें गांधीकडे धांवत गेलीं. एकामागून एक अशा क्रमानें ते गांधीकडे जात, दोन्ही हात त्यांच्या हातांत मिळवत आणि जणुं काय आज मोठा सुदिन लाभला या आनंदांत नाचत निघून जात. गांधी तर लहान मुलांचे मोठे मित्र. त्यांनाहि त्यामुळें अत्यंत आनंद होई.

## ५०. निस्सीम भक्ताचें प्रेम

ते रमझानचे दिवस होते. खानबंधूंचे रोझे सुरू असत. गांधींना त्या दिवसांत खानसाहेबांनीं व खुदाई खिदमतगारांनीं लांब लांबचे दौरे ठरविणें पसंत नसे. पण गांधींचें कोण ऐकतो? उत्मनझाईच्या यादौऱ्यांत घडलेला प्रसंग अत्यंत संस्मरणीय व हृदयस्पर्शी होता. खानसाहेबांनीं आपलें सारें घर गांधींजींच्या करतां रिकामें केलें. त्यांनीं आपल्या मुलाला नोकरचाकरांच्या कोठडींत पाठवून दिलें आणि स्वतः असेच कुठेंतरी निजले. त्यांची गांधीजीं-वर सारखी नजर होती. एखादी आई जितक्या प्रेमानें आपल्या मुलाला जपते, तितक्याच प्रेमानें खानसाहेब गांधींना जपत होते. गांधीजी झोंपल्या-वर चोरट्या पावलानें ते आंत डोकावत आणि प्रत्येक गोष्ट व्यवस्थित आहे का नाहीं हें बघून येत. एखाद्या नोकराच्या पायानें गालिच्यावर माती बसली असली तर ते ती आपल्या हातरुमालानें झटकून टाकीत. गांधींच्या अंगावरील चादर झोंपतांना सरकली असली तर हळुवार हातानें सारखी करीत. दुपारीं गांधी वामकुक्षि करीत असले तर खानसाहेब हळूच जवळ बसून माशा हाकीत बसत. पुनः गांधींना आपण जवळ बसलों आहों हें न कळूं देण्याची ते दक्षता घेत.

गांधींकरतां खानसाहेबांनीं आपल्या मित्रांच्या साऱ्या बागा हुडकाव्या

व त्यांतून उत्तम उत्तम फळें आणावींत. एकदां सकाळींच खानसाहेब कोठें तरी निघून गेले आणि दुपारीं परत आले, येतांना त्यांनीं द्राक्षांचा एक मोठा घड आणला. ते दिवस द्राक्षाच्या भराचे नव्हते. पण त्यांनीं संशोधन करून लवकर द्राक्षें लागलेले वेल धुंडले व ही कमाई केली. त्यांनीं आपल्या हातांनीं गांधींना द्राक्षें दिलीं तेव्हांचा त्यांचा आनंद अवर्णनीय होता.

अशा प्रकारच्या प्रेमाचा वर्षाव एक निस्सीम भक्तच करूं शकतो. खानसाहेबांचें प्रेम खानसाहेबांसारखें होतें एवढेंच आपण म्हणूं शकूं.

## ५१. पौर्वात्य तत्त्वज्ञानाचा जीवंत पुरावा

गांधीजींकडे जसे अशिक्षित पण श्रद्धावान् खेडुत येत, तसे विद्वानहि येत. कोणी श्रद्धेची अंजली गांधींना अर्पण करीत, तर कोणी ज्ञानाची तार छेडीत. एकदां सर राधाकृष्ण गांधींना भेटावयास आले. सर राधाकृष्ण यांची ऑक्सफर्ड विद्यापीठांत पौर्वात्य तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली होती. पण इंग्लंडला जाण्यापूर्वीं त्यांनीं गांधींची धूळभेट घेतली. ‘ माझी नेमणूक पंधरा वर्षांकरतां झाली आहे. पण मी वर्षांतून सहा महिने हिंदुस्थानांत राहीन अशी अट घातली आहे. मी पौर्वात्य तत्त्वज्ञानाचें शिक्षण कोणत्या भूमिकेवरून देणार आहें हें ठाऊक आहे का ? माझा जीवंत पुरावा तुम्ही आहां. तुमच्या जीवनाचा सारा आधार धार्मिक व नैतिक तत्त्वें आहेत. ’

आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ त्यांनीं महाभारतांतील व ऋग्वेदांतील कांहीं वचनें म्हणून दाखविलीं.

महाभारतांत द्रौपदी म्हणते :

कुले महति जाताऽस्मि दिव्येन विधिना किल ।
केशग्रहमनुप्राप्ता काऽनुजीवेत मादृशी ॥

“मी मोठ्या कुळांत दिव्य विधीनें जन्माला आलें असें म्हणतात. ( पण आज त्याच ) मला केसानें ओढलें जात आहे. माझ्यासारखी कोण बरें जिवंत राहील ?”

राधाकृष्ण म्हणाले, ‘पण द्रौपदी आपल्या श्रद्धेमुळें या दिव्यांत अचल अशी उभी राहिली आणि तिचें जीवन यशस्वी झालें. तुम्ही ज्या तत्त्वांचा पुरस्कार करतां, त्या तत्त्वांचा आम्हीं आश्रय घेतला, तर आम्हांला कोणतीच भीति नाहीं. नीतिमत्तेमध्यें निश्चलपणें उभें रहाणें हाच आपल्या संरक्षणाचा सर्वश्रेष्ठ उपाय आहे. तुमच्या जीवनांतील हीच धार्मिक व नैतिक बाजू मला अत्यंत पटते.

‘ऋग्वेदांतील ऋचा किती समर्पक आहे.

**यदा पश्यन्ति सूरयः।**
**तद्विष्णोः परमं पदम्**
**दिवीव चक्षुराततम्॥**

‘जसे आपण उघड्या डोळ्यांनीं आकाश पहातों, तसें ऋषी विष्णूचें परम पद (सतत) पहात असतात.

तसेंच

**ऋषिरार्यम्लेच्छानां समानमिह लक्षणम्**

‘आर्य व म्लेंच्छ यांच्यांत फरक नाहीं असें ऋषि म्हणतात.’

‘या उद्गारांत किती आत्मविश्वास व आध्यात्मिक संस्कृति भरली आहे. आपण कितीहि पददलित झालों असलों तरी आपली ही संपत्ति मौल्यवान आहे. ती आपल्याकरतां नाहीं; पण सर्व जगाकरतां आहे. या विशाल संस्कृतीचे आपण प्रतिनिधि आहां.

‘मला कांहींजण विचारतात, महायुद्ध झालें तर हिंदुस्थान काय करील ? मी त्यांना सांगतों, जगांतील हिंसेवर आधारलेल्या पुष्कळ सुधारणा नष्ट झाल्या. आम्ही अहिंसेला सोडणार नाहीं. आम्ही अहिंसेच्या तत्त्वाकरतां

नष्ट झालों तर काय होणार आहे ? आम्ही एका महान् तत्त्वाकरतां जगलों व मेलों असें तरी म्हटलें जाईल ?'

## ५२. गांधींची हरिजनांसंबंधींची तळमळ

डेलांगला गांधी-सेवा-संघाचें संमेलन भरलें होतें. ओरिसामधील हवा सुंदर होती. पण महादेवभाई म्हणतात, 'त्या दिवसांइतके दुःखकारक दिवस माझ्या आयुष्यांत मीं कधींच अनुभवले नाहींत. मार्च ३०, १९३८ चा तो दिवस. गांधींचा रक्तदाब भयंकर वाढला. त्यांतून कांहीं अनिष्ट घडतें कीं काय अशी महादेवभाईंना भीति वाटूं लागली. त्याला कारण आपण आहों असें महादेवभाईंना वाटत होतें. महादेवभाईंनीं दुसरे दिवशीं सकाळीं आपण गांधींची ही व्यथा वाढविण्यास कारणीभूत झालों असें प्रार्थनेच्या वेळीं सर्वांना सांगितलें. गांधी तेथें नव्हते; पण त्यांना तें निवेदन कळलें.

प्रसंग असा होता. गांधी सेवा-संघाच्या बैठकीला मंडळी निघाली. महादेवभाईंच्या पत्नी अशा बैठकींना सहसा जात नसत. पण पुरीला जायला सांपडेल या इच्छेनें त्यांनीं बैठकीला जाण्याचा विचार केला. महात्माजींनीं महादेवभाईंना सांगितलें कीं, 'त्यांच्या जाण्यासंबंधीं सर्व व्यवस्था नीट करा.' महादेवभाईंना आपल्या पत्नीनें पुरीकरतां यावें हें पसंत नव्हतें. पण गांधींनीं दोनदां तीनदां व्यवस्था करण्यास सांगितलें. त्यामुळें महादेवभाईंनीं त्यांना नेलें. महादेवभाईंच्या पत्नींना जगन्नाथपुरीचें देवालय हरिजनांना खुलें नाहीं हें माहित नव्हतें.

गांधींनीं पहिल्याच दिवशीं प्रदर्शन उघडतांना सांगितलें कीं, जगन्नाथाचें देऊळ जोंवर हरिजनांना खुलें नाहीं तोंवर तो जगाचा नाथ नाहीं. तो त्याच्या आश्रमावर जगणाऱ्या व मेजवान्या झोडणाऱ्यांचा नाथ आहे.'

महादेवभाईंना वाटलें, ह्या इषाऱ्यामुळें आपल्या पत्नी सावध रहातील. तरीहि त्या देवदर्शनाला जाणारच नाहींत ही त्यांना खात्री नव्हती. महादेवभाईंना वाटलें, ज्या अर्थी गांधीजी तीनतीनदां आपल्या पत्नीची पुरीला नेण्याबद्दल व्यवस्था करण्यास सांगत आहेत त्या अर्थी आपल्या पत्नीनें देवदर्शनाला जावें अशी त्यांची इच्छा असावी. गांधींची अहिंसा ही एकाकी नव्हती. गांधींनीं याच अहिंसेमुळें झुलू बंडांत गोऱ्या शिपायांची दारूची मागणी पुरी केली आणि द. आफ्रिकेंत आपल्या मित्रांची मांसाशनाची इच्छा तृप्त केली. त्याच अहिंसेमुळें ते आपल्या पत्नींनीं जगन्नाथाचें दर्शन घ्यावें असें कशावरून इच्छित नसतील असें महादेवभाईंना वाटलें.

त्यांना उलट असेंहि वाटलें कीं देवळांत गांधीचे दुसरे चिरंजीव मणिलाल व इतर अनेक मंडळी जात आहेत. त्यांतील कांहीं बाहेर रहातीलच आणि आपली पत्नी त्या बाहेर रहाणाऱ्यांपैकीं एक असेल. पण भाईनीं पत्नींना खडसून बजावलें नाहीं कीं तिच्या देवळांत जाण्यानें गांधींचें हृदय फाटेल. गांधींच्या विशाल हृदयांत हा आपल्या पत्नींचा अपराध सामावूं शकेल अशी त्यांची कल्पना होती. त्याकरतां ते स्वस्थ राहिले. आपल्या पत्नीच्या अंतःकरणांतली देवभक्ति विचलित करावी ही त्यांना इच्छा नव्हती. महादेवभाईंना त्या देवळांची आणि तेथील पंड्यांची शिसारीच होती; पण पत्नींच्या आत्मसमाधानाकरतां ते तिला परावृत्त करूं इच्छित नव्हते.

कस्तुरबाहि देवळाकडे जाणार होत्या. त्या निदान देवळांत पाऊल टाकणार नाहींत आणि त्याचा परिणाम आपल्या पत्नीवर व इतरांवर होईल अशीहि आशा महादेवभाईंना वाटत होती. त्यांतले कांहींजण बाहेर राहिले. महादेवभाईंचा मुलगा न जाणाऱ्यांपैकीं होता.

संध्याकाळीं ही मंडळी देवदर्शनाहून परतली. गांधींना तें समजलें.

त्यांना दुःख झालें. रात्रभर त्यांना झोंप आली नाहीं. त्यांनीं महादेव-भाईंना, कस्तुरबांना व महादेवभाईंच्या पत्नींना चांगलेंच फैलावर घेतलें. त्यांना उभें राहाण्याची शिक्षा केली. आपण रडले व त्यांनाहि रडवलें अशीहि लोकवार्ता प्रसृत आहे.

अनेक कारणें, सबबी गांधींना या मंडळींनीं परोपरीनें सांगितल्या; पण त्यामुळें ते अधिकच कातवले. या सर्वांला महादेवभाई कारणीभूत आहेत असें त्यांच्या मनानें घेतलें. ते म्हणाले कीं, महादेवनें पुरीच्या देवालयाचा हरिजन चळवळीचा सगळा इतिहास आपल्या पत्नीला सांगावयास हवा होता आणि त्याहि उपर जाऊं म्हणत्या तर गांधींची मदत घ्यावयाची होती आणि याचाहि उपयोग झाला नसता तर त्यांना जाऊं द्यावयाचें होतें. गांधींच्या दृष्टीनें महादेवभाईंनीं सर्वांवर आणि कार्यावरहि अन्याय केला. त्यांनीं गांधी-सेवा-संघाच्या सभासदांपुढें आपलें अंतःकरण मोकळें केलें. त्यांच्या म्हणण्याचा आशय पुढीलप्रमाणें होता :

'महादेवभाईंनीं तुम्हांला काय घडलें यांची हकिगत सांगितली हें चांगलें झालें; आतां मीहि माझ्या मनांत काय आहे तें सांगतों. तुम्ही जे विविध प्रकारचे विधायक कार्यक्रम करतां ते सत्याचें व अहिंसेचें बाह्य स्वरूप आहेत. ते कार्यक्रम तुम्हांला सत्य-अहिंसेच्या मार्गाला आणि शेवटीं स्वातंत्र्याला कोठवर नेतात याचे दर्शक आहेत. अस्पृश्यता-निवारण हें अहिंसेचें अत्यंत मोठें स्वरूप आहे. मी दररोज प्रार्थना करतों व तुमचीहि प्रार्थना असावी, कीं, जर अस्पृश्यता नष्ट होत नसेल तर हिंदुधर्म न जगलेला बरा. या माझ्या तळमळीचें व्यक्त स्वरूप तुम्हांला माझ्या हरिजन दौऱ्यांत पहावयास सांपडेल. त्या दौऱ्याचा मुख्य उद्देश हरिजनांना देवळें मोकळीं करावींत हा होता. ज्यांचा अस्पृश्यता-निवारणावर विश्वास आहे त्यांनीं हरिजनांना मोकळ्या नसलेल्या देवळांत जाऊं नये असें मी दररोज ओरडत आलों आहें. आतां तुम्हीच सांगा, माझी पत्नी आणि जिला मी

माझी मुलगी मानतों त्या जर अशा देवळांत गेल्या तर मला तो विचार कसा सहन होईल ? मी त्यांची विनवणी करीन, त्यांच्या पाया पडेन आणि जर माझ्या विनंतीचा उपयोग झाला नाहीं, तर मी वैयक्तिक संबंध तोडून टाकीन. मी या तत्त्वाप्रमाणें इतकीं वर्षें वागत आलों आहें;आणि जेव्हां मला हा प्रकार कळला तेव्हां मला शरमल्यासारखें झालें. त्या वेदना माझा शरीरपात त्वरित घडवून आणण्यास पुरे होत्या. यंत्रानें रक्तदाब भयंकर वाढला आहे असें दाखविलें; पण यंत्रापेक्षां मला जास्त ज्ञान आहे. यंत्राला दाखवितां येणार नाहीं, इतकी माझी वाईट दशा झाली. गीतेंत अनासक्ति सांगितली आहे. पण त्या अनासक्तीचा अर्थ अशा प्रकारचे धक्के बसले तर उदासीन रहावें असा होत नाहीं. ते धक्के म्हणजे आपल्या जीवलगांच्या हातून झालेल्या कर्तव्य-च्युतीचे धक्के. जे तिघेजण गेले त्यांचा अपराध अगदीं थोडा आहे. अज्ञानानें ते गेले. माझा आणि माझ्याहिपेक्षां महादेवचा जास्त दोष आहे. त्यानें त्यांचा धर्म काय हें त्यांना समजावून सांगितलें नाहीं. तसेंच या धर्मच्युतीचा परिणाम माझ्यावर काय होईल हेंहि त्यांना समजावलें नाहीं. ती मंडळी अज्ञानी होती हें मला ठाऊक आहे; पण त्यांच्या अज्ञानाबद्दल आम्ही जबाबदार आहों. त्यांचें अज्ञान नष्ट न करणें हें अहिंसाविरोधी वर्तन आहे. मी त्यांना पुरीला बोलावलें तें त्यांनीं देवळांत जावें याकरतां बोलावलें नाहीं. त्यांनीं हरिजन जेथवर जातात तेथवर जावें व पुढें जाण्याचें नाकारावें हा त्यांना पुरीला आणण्यांत माझा हेतु होता. ह्याच पध्दतीनें हरिजनप्रचार चांगला झाला असता व हरिजन-सेवा त्यांच्या हातून घडली असती. भंगी काम करणें, हरिजनांच्या बरोबर जेवणें किंवा त्यांना अन्न देणें पुरेसें नाहीं; आपणहि आपल्या या बांधवांना जोंवर देवळांत जाण्यासारख्या गोष्टी करूं देत नाहीं, तोंवर ते हक्क नाकारणें हेंहि त्याबरोबरच आवश्यक आहे. '

महादेवभाईना गांधींनीं व्यक्त केलेल्या या वेदनांमुळें अधिक वेदना

झाल्या. गांधीजी अत्यंत असंतुष्ट दिसले. दुसऱ्या दिवशीं ते इतके अशक्त झाले कीं, त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडेना. त्यामुळें त्यांनीं दिवसभर मौन पाळलें. महादेवभाईंना प्रश्न पडला, आपण काय करावें ? युक्तिवादामुळें प्रकरण जास्तच चिघळलें असतें; पण आपल्यामुळें गांधींची प्रकृति ढांसळली ही गोष्ट महादेवभाईंना बेचैन करूं लागली. रात्रभर त्यांचीहि तडफड सुरू होती. 'जर मीं एवढी भयंकर चूक केली असेल तर मी त्यांची सेवा कशी करूं शकेन ? मी गांधींचा द्वारपाल कसा राहूं शकेन ? ' उद्वेग, निराशा व पश्चात्ताप वाटून महादेवभाईंनीं गांधींना पत्र लिहिलें व विनंति केली कीं मला सेवामुक्त करा, हें पत्र वाचून गांधीजी अधिकच बेचैन झाले. ते म्हणाले, 'माझ्यावर प्रेम करणारांच्या हातून मला मृत्यु आला तर चालेल; पण ज्यांचें माझ्यावर प्रेम नाहीं त्यांनीं जीवदान दिलें तरी मला तें नको. '

गांधींचे उद्गार अगदीं तप्त रसासारखे वाटत होते. महादेवभाई म्हणाले, ' गांधींनीं प्रेमाचा क्लोरोफॉर्म वापरून पुष्कळ आध्यात्मिक शस्त्रक्रिया केल्या; पण ही शस्त्रक्रिया त्यांनीं क्लोरोफॉर्मशिवाय केली. ' अगदीं संतापून महादेव-भाई ओरडले,

' To live with the saints in heaven
is a bliss and a glory.
But to live with a saint on earth
is a different story. '

' साधुसंतां बरोबर स्वर्गामध्यें रहाणें हा एक वर आहे व तें एक वैभव आहे; पण एखाद्या संताबरोबर पृथ्वीवर रहाणें मात्र अगदीं निराळें आहे. '

गांधींनीं राईचा डोंगर केला असें महादेवभाईंचें मत; पण तें ठरविणार मी कोण असें ते विचारतात. ज्यांनीं आपल्या आयुष्याचें अर्ध शतक सत्य-अहिंसेच्या पाठलागांत, अत्यंत जागरुकतेनें घालवलें, त्यांचेंच मत ग्राह्य मानलें पाहिजे असें महादेवभाईंना वाटलें. त्यांना क्षुल्लक वाटणारी गोष्ट गांधींना

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

जीवन-मरणाचीहि वाटली असेल. महादेवभाई म्हणतात, 'गांधींच्या बरोबरचें जीवन कधीं कधीं कितीहि कठीण वाटलें, तरी त्यांचा विरह त्यांहिपेक्षां अधिक असह्य होता.' आपण संत नाहीं असें गांधी म्हणत. 'आमच्यापैकीं लहानांतला लहान असेल त्याच्या बरोबरीचा मी आहें.' असें गांधी म्हणत तेव्हां अशा पुरुषाबरोबरचा संबंध तोडून टाकण्याची कल्पना आपल्याला आली याचेंहि महादेवभाईंना वाईट वाटलें. वेडाच्या झटक्यांत आपण हें पत्र लिहिण्याला प्रवृत्त झालों असें ते म्हणाले.

ते म्हणतात, 'मी गांधींच्या पासून गेलों असतों तर पांच यार्डांपुढें न जातां पश्चात्तापदग्ध होऊन परत आलों असतों, असें मला तें पत्र वाचून वाटलें.'

ह्या दुःखदायक प्रसंगामुळें गांधींची हरिजनांसंबंधींची तळमळ किती प्रखर असे हें दिसून आलें. ते आपल्या तत्त्वाकरतां जीवहि टाकावयास तयार झाले. 'जरी पांडुरंगीं होई अंतराय, हो का मायबाप त्यजावीं तीं' इतकी प्रखर निष्ठा गांधीजींची या प्रश्नाबाबत होती. गांधींनीं सेवकांच्या अंतःकरणावर विद्युद्-आघात केला आणि त्यांनीं आपल्याबरोबर हरिजन-सेवेचा दिव्य संदेश नेला ! बिचाऱ्या कस्तुरबांची आणि महादेवभाईंच्या पत्नीची काय अवस्था झाली असेल याची कल्पनाहि करवत नाहीं.

पाने-११८
८८१९४
६४
२५०३

## ५३. गांधीजींची आपुलकी

१९४० सालीं वैयक्तिक सत्याग्रहाला सुरवात झाली. म. गांधी हे स्वतः प्रत्येक सत्याग्रहीची माहिती करून घेतल्याशिवाय कोणालाहि सत्याग्रह करण्यास परवानगी देत नसत. त्या वेळीं मी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीचा हंगामी अध्यक्ष होतों व माझ्याकडे याद्या घेऊन जाणें व त्या म. गांधींच्याकडून मंजूर करून आणणें हें काम होतें. मला दोनतीन वेळां

सेवाग्रामला त्याकरतां जावें लागलें. महात्माजी जरी प्रत्येक सत्याग्रही सूत कांततो कां नाहीं, वगैरेंबाबत दक्ष असत, तरी प्रांताच्या अध्यक्षाला प्रत्येक व्यक्तीची काय माहिती असणार ? जिल्ह्याकडून प्रांताकडे याद्या येत व त्या निर्दोष असतील असें समजून मी त्या त्या सत्याग्रहीबद्दल महात्माजींना ग्वाही देत असें. कांहीं कांहीं सत्याग्रहींबद्दल पुढें माझाहि भ्रमनिरास झाला. तुरुंगांत त्या सत्याग्रहींची भेट झाल्यावर त्यांना कांतणें बिलकूल ठाऊक नाहीं असा अनुभव येऊं लागला. तुरुंगांत जाण्याची त्या त्या व्यक्तींना घाई असें समजून ते आपल्या जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांना आपण सूत कांततों असें सांगत असत. गांधींना ह्याची कल्पना नव्हती असें नाहीं. त्यांनीं पुढें पुढें ही चवकशी अत्यंत कडक केली आणि महिन्यांत किती सूत कांतलें यांचा हिशेब मागायला सुरवात केली. त्यांतहि कांहीं फसवणुका होऊं लागल्या.

याद्या मंजुरीकरतां नेल्या म्हणजे त्यांत अनेक सदरें घालून त्या पुऱ्या कराव्या लागत. त्यांत एक सदर असें होतें कीं सत्याग्रहीवर अवलंबून माणसें किती आहेत व सत्याग्रहींचें उत्पन्न काय आहे ? मीं महात्माजींना विचारलें, ' ही माहिती तुम्ही कशाकरतां विचारतां ?' त्यांनीं उत्तर दिलें, 'मला या सत्याग्रहाचें एक पुस्तक छापावयाचें आहे व तें पार्लमेंटकडे पाठवावयाचें आहे.'

' पण त्या सत्याग्रहीवर किती माणसें अवलंबून आहेत व त्याचें उत्पन्न काय आहे ही माहिती कशाला हवी ?' मीं विचारलें. गांधीजी म्हणाले, ' मला ब्रिटिशांच्या व जगाच्या नजरेस आणावयाचें आहे कीं, हिंदी स्वातंत्र्याकरतां सत्याग्रह करणारा व तुरुंगांत जाणारा सत्याग्रही हा किती थोर दर्जाचा असतो. हिंदी सत्याग्रही आपल्या कुटुंबांत असणाऱ्या माणसांच्या चरितार्थाविषयीं यत्किंचित् फिकीर न करतां तुरुंगांत जातो व आपल्या नातेवाईकांना हालांत दिवस काढायला भाग पाडतो. पण सध्यांच्या

युद्धांत जे ब्रिटिश लोक सामील होतात ते स्वतःचा पगार वाढवून घेण्याकरतां कसा प्रयत्न करतात व त्यांना कसा भरमसाट पगार दिला जातो हें मला दाखवावयाचें आहे.'

त्यांनीं मला एका संपादकाचें उदाहरण सांगितलें. तो संपादक एका इंग्रजी वृत्तपत्रांत होता. त्याचें लिखाण, त्याचा दर्जा व त्याचा पगार हा मामुलीच होता. पण केवळ तो इंग्रज माणूस आहे म्हणून त्याला ४००-५०० रुपये पगारावरून एकदम दीड दोन हजार रुपयांची जागा दिल्लींतील माहितीखात्यांत देण्यांत आली. त्या अधिकाऱ्याशिवाय इतर उदाहरणें काय थोडीं आहेत? ब्रिटिश व हिंदी सामान्य डॉक्टरांना हजारांनीं पगार देऊन व हुद्दे अर्पण करून युद्धांत काय कमी नागवणूक केली गेली?

हिंदी स्वातंत्र्याकरतां लढणारा सत्याग्रही हा विनावेतन लढला आणि ब्रिटिश स्वातंत्र्याकरतां लढणारा अधिकारी व इतर बिनलढाऊ अधिकारी कसे पैशाकरतां लढतात हें महात्माजींना दाखवावयाचें होतें. पण पुढें गांधींनीं हा ग्रंथप्रकाशनाचा बेत सोडून दिला असें दिसतें, कारण तसें प्रसिद्ध झालें नाहीं.

गांधींच्याकडून अशीच एक यादी मंजूर करून घेतल्यावर व त्यांची त्यावर सही घेतल्यावर मी त्यांचा निरोप घेऊं लागलों. मला त्यांनीं विचारलें, 'आजच तुम्ही परत जाणार का?'

मीं 'होय' म्हटलें. 'आतां ताबडतोब मेलनें जाणार आहें.' 'तर मग तुम्ही एक काम कराल का?' असें त्यांनीं विचारलें. मीं म्हणालों, 'अत्यंत आनंदानें.' ते म्हणाले, 'आमच्या आश्रमांत एक मुलगी आहे, तिला सुरतेकडे जावयाचें आहे. तेव्हां तुम्ही तिला बरोबर न्या आणि भुसावळला सुरतेच्या गाडींत बसवा. तुमचा तांगा आहे का?' मीं 'होय' म्हटलें.

त्यांनीं त्या मुलीला बोलावलें व तिला सांगितलें, 'बेटा, तुझी तयारी झाली का? देवगिरीकर भाईबरोबर जा. ते तुला गाडींत बसवून देतील.

कांहीं काळजी करूं नकोस. पोहोंचल्यावर मला पत्र पाठव. नीट जपून जा.'

मलाहि त्यांनीं जाण्यापूर्वीं तीनतीनदां बजावून सांगितलें. नंतर मी बाहेर पडलों. इतक्यांत प्यारेलाल मला भेटले व त्यांनीं मला एक निकडीचें पत्र मेलमध्यें टाकण्याकरतां द्यावयाचें आहे असें सांगितलें. प्यारेलाल बाहेर अंधुक सूर्यप्रकाशांत पत्र लिहूं लागले. त्यांचें पत्र-लेखन लांबूं लागलें व मलाहि मेल कशी गांठतां येईल याची उत्कंठा लागूं लागली. अखेरीस त्यांचें पत्र तयार झालें व आम्ही तांग्यांतून निघालों.

ती महात्माजींची फिरण्याची वेळ होती. आमचा तांगा त्यांच्या फिरण्याच्या रस्त्यावरून जात होता. गांधीजी दिसतांच आमचा तांगा थांबला. गांधींनीं पुनः त्या मुलीबद्दल सांगितलें. आश्रमांतल्या प्रत्येक व्यक्तीबद्दल गांधींना किती जिव्हाळा व किती आपलेपणा वाटतो हें पाहून मला आश्चर्य वाटलें. अगदीं लहानसहान बाबींबद्दल ते तिला सूचना देत होते व मलाहि सांगत होते. आमची गाडी चुकली नाहीं व भुसावळ आल्यावर मीं त्या मुलीची व्यवस्थाहि केली. बारातेरा वर्षांची मुलगी एकटी जाणार होती, याबद्दल गांधी दक्षता घेत होते हें खरें आहे; पण त्या दक्षतेंत आपुलकी व प्रेम होतें व त्याचेंच मला कौतुक वाटत होतें.

## ५४. अग्निदिव्य

'बावीस वर्षांपूर्वीं तिशीच्या ऐन ज्वानींत असलेला एक तरुण माझ्या-कडे आला आणि म्हणाला,

'मला तुम्हांला कांहीं विचारावयाचें आहे.'

'विचारा, आणि मला शक्य असेल तर तें मी तुम्हांला देईन.'

'तुमच्या देवदासप्रमाणें मला तुमचा मुलगा म्हणा.'

'कबूल' गांधी म्हणाले, 'फक्त मजजवळ तुम्हांस द्यावयास कांहीं नाहीं. तुम्ही मला दिलें पाहिजे.'

हा तरुण जमनालाल बजाज होते. या स्वयंदत्तक गेलेल्या पुत्रानें काय कामगिरी केली हें थोड्यांना ठाऊक आहे. पूर्वी कोणत्याहि मानवाला अशा प्रकारच्या मुलाची देणगी मिळाली नव्हती. 'माझें कांहीं काम केलें या अर्थानें मला पुष्कळ मुलें व मुली आहेत, पण जमनालालनीं आपलें सर्वस्व मला अर्पण केलें होतें. त्यांची बुद्धिग्राह्यता अत्यंत शीघ्र होती. ते व्यापाऱ्याचे राजे होते. त्यांनीं मला आपली विशाल संपत्ति अर्पण केली होती. ते माझ्या वेळेचे आणि आरोग्याचे संरक्षक होते. आणि हें सर्व ते सार्वजनिक हिताकरतां करीत. ज्या दिवशीं ते मरण पावले, त्या दिवशीं ते आणि जानकीदेवी मला भेटावयास येणार होते. ज्या वेळीं ते माझ्याकडे यावयाचे होते त्याच वेळीं ते मरण पावले. चवदा वर्षांपूर्वीं मगनलालना माझ्यापासून जेव्हां उचलून नेलें तेव्हां मला जितकी खिन्नता वाटली, तितकीच याहि प्रसंगीं वाटली. पण मला तेव्हांहि शंका नव्हती आणि आजहि नाहीं कीं, अशा प्रकारच्या आपत्ती म्हणजे वर आहे. परमेश्वर माझी पुरेपूर कसून परीक्षा घेत आहे. या दिव्यांतून पार पडण्यास परमेश्वर मला शक्ति देईल अशी माझी श्रद्धा आहे.'

## ५५. आगाखान वाड्यांतील शेवटचा दिवस

५ मेला सकाळीं आयू. जी. पी. आले तेव्हां ते जरा चमत्कारिकपणेंच वागले व फारसे बोललेहि नाहींत. ते सहज म्हणाले, 'डॉक्टरच्या मताप्रमाणें गांधी शंभर मैलांचा प्रवास करूं शकतील का नाहीं कोण जाणे.' पण यापलिकडे ते कांहीं बोलेनात. गांधीजी आगाखान वाड्यांत राहूं इच्छित नव्हते. जनतेचा इतका पैसा खर्च होत असलेला त्यांना पसंत नव्हता. कोट्यावधी

लोक उपाशी मरत असतां त्यांचे पैसे उधळणें हा गुन्हा आहे असें ते म्हणत. 'एवढे पहारेकरी काय करायचेत? मी का पळून जाणार आहें?' असेंहि ते म्हणत. ती जागा मलेरियाची होती. गांधी आजारी होते व त्यांना तेथून हलवावें अशी बाहेर चळवळ सुरू होती. जेलचे अधिकारीहि चिंताग्रस्त असत. तेव्हां गांधींना हलवणार असें गांधींच्या परिवाराला वाटत होतें. पण आमची ताटातूट होणार का, त्यांना कोठें नेणार, बापू या नव्या बदलाला टिकतील का, असे प्रश्न गांधींच्या परिवारांतील मंडळींना त्रासून सोडत होते. पण गांधींना त्याचें कांहीं वाटत नव्हतें. त्यांना एकच प्रश्न सतावित होता. आपल्याकरतां राष्ट्राचा इतका खर्च होतां कामा नये. सुटकेचा प्रश्न त्यांच्या मनांतहि नव्हता. प्रकृतीकरतां गांधींना सोडतील ही कल्पनाहि कोणाला नव्हती.

प्यारेलालनीं वर्णन केलेल्या गांधींच्या मुक्ततेची ही पार्श्वभूमि आहे.

'( ५ तारखेला ) सुमारें पांच वाजतां आम्हांला सांगितलें कीं, येरवड्यांतून येणाऱ्या कैद्यांच्या तुकडीला आम्हीं रजा द्यावी. गांधींच्या खोलींत आय्. जी. व जेल सुपरिंटेंडेंट जाऊन आल्यानंतर आम्हांला तें कळविलें. आय्. जी. नीं गांधींच्या प्रकृतीची चौकशी केली आणि सांगितलें कीं, उद्यां सकाळीं ८ वाजतां सर्वांना बिनशर्त मुक्त करण्यांत येणार आहे. हें ऐकतांच गांधी चमकले. 'तुम्ही थट्टा तर करीत नाहीं ना?' आय्. जी. म्हणाले, 'छे, मी खरेंच सांगत आहें. तुम्हांला वाटल्यास तुम्ही प्रकृतीच्या स्वास्थ्याकरतां कांहीं दिवस येथें रहा. उद्यां सकाळीं पहारा उठेल आणि तुम्ही आपल्या मित्रांना मोकळेपणानें भेटूं शकाल. तुम्हांला हवें असेल तर तुम्हीं पुण्यामुंबईस मित्रांकडे रहा. व्यक्तिशः तुम्ही येथें ( आगाखानवाड्यांत ) राहूं नये असें मला वाटतें. हा लष्करी विभाग आहे आणि येथें दर्शनाकरतां गर्दी जमूं लागली म्हणजे खटका उडेल व तें तुम्हांला आवडणार नाहीं. गांधीजी पहिल्या धक्क्यांतून आतां बाहेर पडले होते. ते हंसले आणि

थट्टेनें म्हणाले, 'पण मी कांहीं दिवस पुण्यास राहिलों तर माझ्या रेल्वे भाड्याचें काय ?' 'तुम्ही पुणें सोडाल तेव्हां तें तुम्हांला मिळेल.' आय्. जी. पी. म्हणाले.

त्या दोघां अधिकाऱ्यांना आपल्या खांद्यावरचें ओझें उतरलें. म्हणून अत्यंत आनंद झाला.

आय् जी. गेल्यावर आम्ही संध्याकाळच्या जेवणाला बसलों. परत आल्यावर पाहिलें तों बापू विचारग्रस्त दिसले. त्यांना दुःख होत होतें. तुरुंगांत आजारी पडणें हें पाप आहे असें ते म्हणत. प्रकृतीच्या करतां सुटणें त्यांना क्लेशदायक वाटे. एकदां ते म्हणाले, ' खरंच का मला ते प्रकृतीकरतां सोडीत आहेत ?' लागलीच ते सावरले आणि म्हणाले, ' त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवणेंच बरोबर आहे.' आम्हीं सात वर्षें तुरुंगांत रहाण्याची तयारी केली होती. युद्ध संपण्यापूर्वीं आपण सुटणार नाहीं असें गांधी म्हणत. सात वर्षांपैकीं आम्हीं २१ महिनेच काढले होते. इतक्या दीर्घ-कालीन निवासाकरतां जमविलेली सामग्री आम्ही बांधूं लागलों. पुस्तकें, वृत्तपत्रें, औषधाच्या बाटल्या बांधणें मोठें त्रासाचें होतें. बांच्या आजारी-पणांत बाटल्या खूपच सांठल्या होत्या. गांधीजींनीं आम्हांला ताकीद दिली होती कीं, 'आठ वाजण्याच्या आंत सर्व तयारी झाली पाहिजे. आठ-नंतर मी एक मिनिटहि तुम्हांला देणार नाहीं.' ते म्हणाले. आम्ही रात्रभर बांधाबांध करीत होतों; पण गांधीजी रात्रभर विचारांत गढून गेले होते. प्रत्येकाचें लक्ष गांधीकडे होतें. राष्ट्राच्या त्यांच्यासंबंधीं फार आकांक्षा होत्या. नादुरुस्त प्रकृतीच्या सबबीखालीं जाणाऱ्याच्या माझ्या हातून त्या अपेक्षा कशा पुऱ्या होणार ?

'सकाळची प्रार्थना ५ ला सुरू झाली. प्रत्येकाचें स्नान झालें होतें. त्यानंतर गांधींनीं आपलें शेवटचें पत्र सांगितलें. सरकारला त्यांनीं त्या पत्रांत बा व महादेव यांचें जेथें दहन केलें ती जागा मागितली. 'ती जागा पवित्र झाली आहे व रूढीप्रमाणें त्या जागेचा दुसऱ्या कोणत्या कामाकरतां उपयोग करतां-

कामा नये.' असें गांधींनीं म्हटलें. आम्ही कैदी या नात्यानें समाधीचें शेवटचें दर्शन घेतलें. आमचे दोन प्रिय प्राण तेथें होते. मला वाटलें, तीन महिने अगोदर सुटलों असतों तर बा बरोबर येत्या. पण एकदम मला आठवलें बा माता होत्या. त्यांना वाटलें कीं, महादेवला आपण येथें कायमचें ठेवून जातां कामा नये, म्हणून त्या तेथें राहिल्या. आम्हीं समाधीला फुलें वाहिलीं आणि नेहमींची प्रार्थना करून वाड्यांत आलों. त्या वेळीं ७-३० वाजले होते.

'७. ४५ ला आय्. जी. पी. आले. गांधीजींनीं हातांत बाहेर जाण्याकरतां काठी घेतली. 'थांबा, महात्माजी. थोडा वेळ आहे अजून.' आम्ही सर्वजण व्हरांड्यांत गोळा झालों. आठाचा ठोका पडतांच आय्. जी. पी. अग्रेसर झाले. त्यांनीं गांधींना व डॉ. सुशीला यांना आपल्या गाडींत घेतलें. बाकीचे सर्वजण दुसऱ्या गाडींत बसले. बरोबर ९० आठवड्यांनीं आम्ही त्या कांटेरी तारेबाहेर पडलों. आय्. जी. पोलिसची गाडी बाहेर पडते तोंच एका पोलिस अधिकाऱ्यानें ती थांबवली. डॉ. सुशीला यांच्यावर एक नोटीस बजावण्यांत आली. आगाखान वाड्यांत स्थानबंदीच्या काळांत घडलेल्या हकिगती त्यांनीं फोडतां कामा नये अशी ती नोटीस होती. गांधींनीं त्यांना सही करण्यास सांगितलें.' माझ्यावर नोटीस नाहीं का?' असें गांधी म्हणाले. पण त्यांना नोटीस नव्हती. त्यांच्यावर नोटीस बजावली तर ते सही करणार नाहींत व बाहेर जाणार नाहींत अशी अधिकाऱ्यांना भीति होती. बाकीच्या मंडळींवर तशाच नोटिसा बजावल्या. ते सह्या करीनात; पण कोणी म्हणाले सही करणें याचा अर्थ आपण अटी पाळल्याच पाहिजेत असा होत नाहीं. गांधींनीं त्या अटींना कांहींच महत्त्व दिलें नाहीं. हा हुकूम अशा व्यापक व संदिग्ध शब्दांच्या भाषेंत लिहिला आहे कीं तो कोणी पाळला पाहिजे अशी अपेक्षाहि करतां कामा नये. आपण त्याचा अर्थ काढूं असे शब्द उच्चारून गांधींनीं डॉ. गिल्डरना गृहखात्याकडून त्याचा अर्थ करवून घ्या असें सांगितलें.

'गाडी पर्णकुटीकडे चालली असतां गांधी दुःखग्रस्त झाले. ते बांचा विचार करीत होते. बांची तुरुंगाबाहेर पडण्याची तीव्र इच्छा होती. त्या आमच्या आधीं बाहेर पडल्या खऱ्या; पण तसें बाहेर पडण्याची त्यांची इच्छा नव्हती. गांधीजी पुटपुटले, 'पण त्यापेक्षां तिला अधिक चांगलें मरण आलें नसतें. बा व महादेव या दोघांनीं स्वातंत्र्यदेवीच्या स्थंडिलावर आपले प्राण अर्पण केले. ते अमर झाले. ते बाहेर मरण पावते तर त्यांना हें वैभव लाभलें असतें का ?'

## ५६. गांधींचा प्रसाद

गांधीजी सकाळीं सुटणार ही वार्ता पुण्यांत पोहोंचली होती. त्यामुळें आगाखान वाड्याजवळ गर्दी जमेल अशी अपेक्षा होती. पण गांधींच्या सुटकेबाबत सरकार पाठशिवणीचा खेळ खेळत आलें होतें. रात्रीं बेरात्रीं, आडगांवाला, ठरलेल्या वेळेपेक्षां अगोदर अशाच बहुतेक गांधींच्या सुटका झाल्याचें लोकांना ठाऊक होतें. त्यामुळें सकाळीं ८ वाजतां गांधी सुटणार असले तरी ते आगाखान वाड्यांतून सुटतील व आपल्याला त्यांचें दर्शन घडेल अशी लोकांना खात्री नव्हती. शिवाय आगाखान वाडा हा काय जवळ होता ? इतक्या लांब मोटारशिवाय किंवा सायकलीशिवाय कसें जातां येणार ? आम्ही कांहींजण तेथें हजर होतों. मी आदल्याच दिवशीं एक महिन्याच्या पॅरोलवर नाशिकहून बाहेर आलों होतों. आगाखान वाड्याजवळ सुमारें शंभर एक मंडळी दुतर्फा शांतपणें उभी होती.

बरोबर आठाचा ठोका पडतांच वाड्याचें बाहेरचें फाटक उघडलें. आंत मधील पोलिसांच्या तुकडीनें गांधींची मोटर निघतांच सलामी दिली. ती सलामी गांधींना नसावी, त्यांच्या अधिकाऱ्यांना असावी. गांधी मोटारींतून बाहेर पडतांना दिसले. तेथें आरडाओरड घोषणा कांहींच नव्हत्या.

गांधींच्या मनांत जसे दोन मृत्यु होते, तसे आमच्याहि मनांत होते. पण त्याशिवाय आणखीहि भावना मनांत उचंबळल्या होत्या. १९४२ च्या लढ्यांतल्या किती तरी भीषण घटना मनापुढें आल्या; पण सर्वांत गांधींचा तो २१ दिवसांचा उपास आणि त्यांचें तें आजारीपण मनावर जास्त प्रभाव करीत होतें.

गांधी आम्हांला फक्त दिसले होते; त्यांच्या दर्शनाची किंवा भाषणाची संधी मिळाली नव्हती. म्हणून आम्ही कांहींजण गर्दीगर्दीनें मोटारींतून पर्णकुटीवर गेलों. तेथें मी, नगीनदास मास्तर आणि काकासाहेब लिमये असे तिघेच जण पर्णकुटीच्या पायऱ्यांवर उभे राहिलों. आम्हांला वाटलें गांधी आमचे आधीं तेथें पोहचले असतील. पण चौकशी केली तों गांधी आले नसल्याचें समजलें. गांधींना काय झालें ? त्यांना दुसरीकडे नेलें का ? सरकारचें धोरण काय असेल कोणालाच कल्पना येईना. अशा प्रकारच्या विचारांत आम्ही तरंगत असतां एकदम गांधींची मोटार आली आणि गांधी बाहेर आले. त्यांना गर्दी टाळण्याकरतां लांबच्या रस्त्यानें आणलें होतें.

आम्ही तेथें थोडेच जण असल्यामुळें आम्हांला गांधींचें अत्यंत चांगलें दर्शन झालें.

गांधींच्या चेहऱ्यावर आजारीपणाची फारशी छटा नव्हती. नेहमींप्रमाणें त्यांची कांति तेजस्वी व चकाकीत दिसत होती. प्रथम एक दोघां मुलांनीं गांधींना लवून नमस्कार केला. नंतर नगीनदास वांकले व त्यांनीं गांधींच्या पायांला स्पर्श करून नमस्कार केला. गांधींनीं त्या वृद्ध नगीनदासच्या पाठीवर दोन धपाटे मारले. नंतर मीं पायाला स्पर्श करून नमस्कार केला. मलाहि चारदोन धपाटे त्यांनीं लगावले. 'क्या कैसे हो ?' असें त्यांनीं मला विचारलें. चार दोन शब्द बोलून होतात न होतांत तोंच पर्णकुटींत ते शिरले.

गांधींचा प्रसाद किती प्रेमळ होता ! ह्या प्रसादाचें स्मरण झालें म्हणजे

अजूनहि आनंद होतो. त्यांत काय नव्हतें ? पितृतुल्य स्नेहभाव, वात्सल्य, जिव्हाळा, प्रेम, सर्व कांहीं त्यांत सामावलें होतें. मला त्याबद्दल धन्यता वाटते.

गांधी मला पूर्वींचे गांधी वाटले. दुःखावर विजय मिळवण्याची विलक्षण शक्ति त्यांच्यांत होती. त्यांचें तें निर्व्याज व निरागस हास्य आणि ती प्रसन्नता पाहून आनंद झाला. त्या आनंदांत आम्ही परतलों.

## ५७. बुद्धाचें अनुकरण करा

जॉर्ज कॅटलिन हे १९४७ सालीं आशिया परिषद चालू असतां म. गांधींना भेटावयास आले. ते जगभर हिंडत होते. जगांतील दुष्ट प्रवृत्तींविरुद्ध कसें लढावें याच्या शोधांत ते गांधींना भेटले. त्यांनीं ‘ In the Path of Mahatma Gandhi ’ या नांवाचें एक पुस्तक लिहिलें आहे.

कॅटलिन हे अलाहाबादला असतांना गांधींनीं त्यांना तार पाठवली. गांधी चार दिवस पाटण्याहून दिल्लीला आशिया परिषदेकरतां जाणार होते. तेथेंच कॅटलीनला त्यांनीं बोलावलें. गांधींना कसें भेटावयाचें ? दिल्लीचे टेलिफोन नीट चालत नसत. गांधींचा वाल्मीकि आश्रमांतला फोन नंबरहि आशिया परिषदेच्या सेक्रेटरीला बरोबर ठाऊक नव्हता. गांधींना सकाळीं भेटावयाचें कॅटलीननें ठरविलें. त्यांनीं भाड्याची मोटार केली. पण त्या मोटारचा ड्रायव्हर रस्ता चुकला. अखेरीस एकदाचा त्यांना तो हरिजन वसाहतींतील आश्रम सांपडला.

त्यांना तेथें मिराबाई भेटल्या. त्या म्हणाल्या, ‘ आतां तिबेटचें शिष्टमंडळ येणार आहे, नंतर सर राधाकृष्णांची मुलाखत आहे; पण तुमची भेट झालीच पाहिजे. तुम्हांला तार पाठविली आहे ना त्यांनीं ? ’

त्या वेळीं सकाळीं गांधी विश्रांति घेत होते. नंतर त्यांचें मालीश, केशकर्तन, स्नान, वगैरे होणार होतें. मिराबाई गोंधळल्या होत्या. गांधींचे केस कापण्याचें मशीन त्या दिवशीं नीट चालत नव्हतें.

कॅटलीन आश्रम पहात इकडे तिकडे हिंडत होते, इतक्यांत गांधींकडून निरोप आला. ‘ तिबेटी मंडळ येईपर्यंत तुम्ही थांबा; पण तुम्हांला एकटें भेटणेंहि मला आवडेल. स्नानगृहांत तुम्ही भेटीला येतां का ? ’ असा तो निरोप होता.

कॅटलीन स्नानगृहांत गेले. स्वागत करतांना गांधीजी म्हणाले, ‘ पहा, तुमच्यावर माझा किती विश्वास आहे तो ! ’ दोघांनीं किती वेळ मुलाखत चालवयाची तें ठरविलें.

दोघांची प्रचलित स्थितीबद्दल बोलणीं सुरू झालीं. त्यांत गोव्याचा प्रश्न होता, ख्रिश्चन मिशन्‌सचा होता. कॅटलीन गांधींना पूर्वी भेटले होते. त्यांच्या त्या वेळच्या संभाषणाची त्यांनीं आठवण दिली. ‘ जगांतील युद्धें थांबावयास माणसाला औदार्याचे धडे पुनः दिले पाहिजेत. ’ विंडेल विल्कीच्या ‘ वन वर्ल्ड ’ संबंधीं बोलणें निघालें. गांधी म्हणाले, ‘ जग जर एक व्हावयाचें असेल तर तें सत्याबद्दल आदर असणाऱ्या संघांच्या पायावरच होईल. ’ जगाच्या ऐक्याची आशा सत्य-अहिंसेच्या पायावरच अवलंबून आहे. शंका आली कीं, अहिंसा पाळावी, कारण अहिंसेनें आजपर्यंत कोणाला कांहीं उपद्रव दिला नाहीं. ’

सत्याग्रह हा भित्रेपणाचा विरोधी आहे आणि न्यायाला हिंसा करावी लागते असें नाहीं. गांधीवादाची हीच सूत्रावलि आहे असें कॅटलीनला वाटलें.

गांधींचें स्नान उरकलें होतें. कॅटलीन तेथून बाहेर पडले. थोड्या वेळानें गांधी कपडे बदलून व मांडी घालून एका चटईवर बसले. त्यांच्या समोर दूध व कांजीचीं भांडीं होतीं. ते तिबेटी प्रतिनिधींची वाट पहात होते. कॅटलीन पुन्हां गांधींकडे गेले व त्यांनीं गांधींना ख्रिश्चन धर्माचे मुख्य

धर्मगुरु पोपनीं देण्याकरितां दिलेली एक शुभ्र माळ दिली. गांधींना त्यामुळें संतोष झाला. पोपकडून आलेली ही देणगी सन्मानाची व प्रेमाची होती. अत्यंत सदाचारी व्यक्तीला ही देणगी दिली जाते. पोप असें समजत कीं माळ म्हणजे परमेश्वराच्या सिंहासनाकडे जाण्याकरतां एक दोर आहे.

तिबेटचे प्रतिनिधी तितक्यांत आले. ती लहान खोली त्यांनीं भरून गेली. ते जमिनीवरच बसले होते. त्यांनीं आपल्या नोकरांना आज्ञा केली कीं, गांधींकरतां आणलेल्या देणग्यांचे गठ्ठे व मौल्यवान् वस्तू आणा. त्या देणग्यांत रेशमी वस्त्रांचे तागे होते, रेशमांनीं गुंफलेल्या किनारी असलेलीं बुद्धाचीं चित्रें होतीं. रेशमी राष्ट्रीय पोशाख घातलेल्या लहान आकृत्या होत्या; त्याचप्रमाणें दलाई लामाचा संदेश असलेली एक बंद केलेली गुंडाळी होती. दलाई लामानें गांधींना ह्या देणग्या पाठविल्या होत्या.

कॅटलीन म्हणतात, 'तें दृश्य अविस्मरणीय होतें. पांढरें शुभ्र वस्त्र परिधान केलेली ती पवित्र हिंदी व्यक्ति तिबेटियन मंडळींना विनोदानें म्हणत होती कीं तुम्हांला ही कांजी मला देतां येत नाहीं, आणि या वेळेशिवाय तुम्हांला भेटावयाला मला दुसरा वेळ नाहीं. ते तिबेटी प्रतिनिधी उंच धिप्पाड ताठ असे बसले होते. त्यांनीं केसांच्या वेण्या घातल्या होत्या व त्या वेण्यांत ओबडधोबड सोन्याचे व tourquoise जे भपकेबाज दागिने घातले होते. तेथें फक्त त्यांचा दुभाष्या इंग्रजींत बोलत होता. इतर सर्वजण त्यांच्या वहिवाटीप्रमाणें अगदीं निश्चल बसले होते.

म. गांधींनीं आपल्या पाहुण्यांची बोळवण नुसत्या थट्टामस्करीनें केली नाहीं. तें रेशीम त्यांनीं हिंदुस्थानकडून नेलें होतें ह्याबद्दल गांधींनीं खात्री करून त्यांना विचारलें, 'हें रेशीम बिर्लांच्या गिरणींतून तुम्हीं खरेदी केलेंत काय ?' नंतर त्यांनीं रेशमी कपडे घातलेल्या बाहुल्यांकडे वळून म्हटलें, 'ही असली झकपक कशाला ! तुमच्या त्या मोठ्या छोट्या दलाई लामांना सांगा कीं, बुद्धांची प्रतिमा करण्यास हीं झगझगीत वस्त्रें कशाला ! दलाई

लामा माझे नातू म्हणण्याइतके वयानें लहान आहेत म्हणून त्यांना मी छोटे म्हणतों; पण ते अधिकारावर आहेत म्हणून मी त्यांना थोर म्हणतों. गौतम बुद्ध गरीब व नम्र म्हणून बाहेर आले; ते जवळ जवळ नग्नावस्थेंत संचार करीत असत. ते भपकेबाज कपडे व दागिने घालीत नव्हते. तुमच्या दलाई लामांना सांगा हें सर्व टाळा व बुद्धाचें अनुकरण करा.'

कांहीं वेळानें हा देणगीचा समारंभ संपला. बाहेर राधाकृष्णन् उंच पांढरा रुमाल बांधून एका बांकावर आपल्याला मुलाखत केव्हां मिळते याची वाट पहात होते. कॅटलीन म्हणतात, 'माझी व गांधींची ही शेवटची मुलाखत.'

## ५८. शेवटची आठवण

मार्गारेट बर्क व्हाईट नांवाच्या अमेरिकन स्त्री वृत्तपत्रप्रतिनिधि गांधींच्या मृत्यूनंतर त्यांच्या कलेवराजवळ बसल्या होत्या. ब्रिजकिसननीं आपल्या मांडीवर गांधींचें डोकें अत्यंत प्रेमानें घेतलें होतें. आजूबाजूला स्त्रिया साश्रु नयनांनीं भगवद्गीतेंतील श्लोक म्हणत होत्या. बाहेर गर्दी वाढत होती आणि त्या गर्दीमुळें डोळ्यांत येणारे अश्रूहि परतत होते. कांचांच्या खिडक्यांवर व दारांवर दाणदाण दणके बसत होते. आणि गांधींच्या मृतदेहाभोवतीं पसरलेलें शांत व गंभीर वातावरण भंग पावत होतें.

व्हाईट म्हणतात, 'मला आठवलें कीं गांधींची व माझी त्या दिवशीं जी मुलाखत झाली ती त्यांच्या जीवनांतलि शेवटचीच मुलाखत होती.

'त्यांनीं मांडी घातली होती. समोर घड्याळ ठेवलें होतें आणि ते माझ्याकडून प्रश्नाची वाट होते.

मीं म्हटलें, 'गांधींजी तुम्ही नेहमीं म्हणतां कीं मी १२५ वर्षे जगणार आहें. तुम्ही कोणत्या आशेवर हें सांगतां?'

त्यांचें उत्तर त्रोटक व चकित करणारें होतें ' माझी ती आशा संपली आहे. '

'कां ?' मीं विचारलें.

' जगांत चाललेल्या भयंकर घडामोडींमुळें मला अंधकारांत आणि वेडेपणांत जगायचें नाहीं. मी जगूं शकणार नाहीं ' ...ते थांबले. तुटलेला धागा ते सांधत होते. ' पण जर माझ्या सेवेची जरूरी असेल–किंवा मला जर आदेश मिळाला तर मी सव्वाशें वर्षें जगेन.'

मीं म्हटलें, ' गेल्या वर्षीं बंगालमध्यें तुम्ही हिंदुमुसलमानांच्या दंगल-विभागांत गेलां होतात. आणि तुम्ही म्हणालांत, ' मला चहूंकडे अंधार दिसत आहे.' तुम्हांला प्रकाश दिसला का ? '

'नाहीं, अद्याप मला प्रकाश दिसत नाहीं. मी त्याकरतां धडपडत आहें. मला जर प्रकाश दिसला तर माझी आशा पल्लवित होईल. '

मी त्यांना म्हटलें, ' अमेरिकन लोकांना सुद्धां दुश्चिन्हें दिसत आहेत. विशेषतः ॲटम बॉम्बबद्दल ते भयभीत आहेत. तुम्ही अणुबॉम्बविरुद्ध अहिंसेचा उपयोग कसा कराल ? '

'हं, हं , मी कसें उत्तर देऊं ? ' क्षणभर सूत काढल्यावर ते म्हणाले, ' प्रार्थनेच्या कृतीनें. '

मीं विचारलें , ' डोक्यावर विमानें फिरत असतां तुम्ही प्रार्थना करीत रहाल ? '

गांधीजींनीं होकारार्थीं मान हलविली.

' मीं प्रार्थनेच्या कृतीनें असें म्हटलें. मी बाहेर उघड्यावर येईन आणि वैमानिकाला पाहूं देईन कीं माझ्या चेहऱ्यावर त्याच्याबद्दल दुष्ट हेतु नाहीं.' गांधी पुनः थबकले.' पण त्या वैमानिकाला इतक्या उंचीवरून माझा चेहरा दिसणार नाहीं; पण माझ्या अंतःकरणांत त्याच्या विषयीं असलेली सद्भावना त्याच्या अंतःकरणापर्यंत पोहोंचेल आणि माझ्यापासून त्याला भीति नाहीं हें त्याला

समजेल व त्याचे डोळे उघडतील. हिरोशिमामध्यें बाँबनें जे लोक मेले, ते जर प्रार्थनेच्या कृतीनें मेले असते, ते जर उघड्यावर येऊन प्रार्थनायुक्त अंतःकरणानें मरते व त्यांनीं मरतांना किंचाळी फोडली नसती तर तें युद्ध इतक्या लाजीरवाण्या प्रकारानें संपलें नसतें. ज्यांनीं युद्ध जिकलें ते खरोखर जेते आहेत का जित आहेत हा प्रश्न आहे. जगांत अद्याप शांतता नाहीं...जग अद्याप भयंकर स्थितींत आहे.'

गांधींची ही शेवटची मुलाखत होती व जगासंबंधीं काढलेले ते उद्गार शेवटचे होते.

● ● ●

नगर वाचनालय सातारा
पु ११६
८८११४
चं ६४
कि. २.५०
३६, भवानी

## आमचीं प्रकाशित पुस्तकें

श्री० वि. स. खांडेकर.

नवा प्रातःकाल (दु. आ.) २॥
पूजन (दु. आ.) ३
पाहिल्यावहिल्या २।
गोफ आणि गोफण ३

श्री० वि. वि. बोकील.

'वसंताच्या लीला'

१ बेबीचा भाऊ (दु. आ.) ३
२ साडेतीन शहाणे ३
३ चिमखडे २॥
४ वसंत ३
५ भाऊ भाऊ २॥

बेबी २
गारा आणि धारा ३

श्री० कवठेकर.

नाद निनाद १॥
चांदण्यांतील सावल्या ३
शालन ३
मंदा २

श्री० ना. धों. ताम्हनकर.

मामा (दु. आ.) २॥
विद्यामंदिरांत ॥।
आमचे हे ३
सावटांतलं रोप २

श्री० चिं. वि. जोशी.

संचार २॥
ओस डवाडींचे देव २
एरंडाचें गुऱ्हाळ (ति. आ.) ३॥
सोळा आणे २॥

श्री० अनंत काणेकर.

घरकुल १
काळी मेहुणी १॥।

श्री० ना. ह. आपटे.

मी वाट पाहीन ! २॥
एकटी ५

श्री० गोपीनाथ तळवलकर.

अनुराधा २
आशियाचे धर्मदीप (ति. आ.) २

श्री० र. गो. सरदेसाई.

स्वाति १॥

श्री० 'धनंजय'

कलावंताचे सहवासांत ३

श्री० श्री. बा. चिरडे.

भंगलेली मूर्ति २

सौ० शांता नाशिककर.

नीलेचा दिलरुबा २

श्री० दत्त उद्धव वैद्य.

मोगरीचा गजरा १॥

श्री० प्रभाकर पाध्ये.

प्रकाशांतील व्यक्ति १॥।

श्री० ग. त्र्यं. माडखोलकर.

जीवनसाहित्य २॥

आचार्य कालेलकर.

जीवन आणि समाज १॥।

साने गुरुजी.

अमोल गोष्टी (दु. आ.) १॥
कुरल ३

श्री० शा. नी. ओक.
धोत्र्याचे कळे २।
श्री० जे. एल्. रानडे.
गोड ललकाऱ्या १॥
श्री० जी. एस्. पाटणकर.
मधुर चीजें १।
श्री० त्र्यं. र. देवगिरीकर.
घटना परिषद २
चिरस्मृति २॥
श्री० भा. कृ. केळकर.
सुभाष ३॥
श्री० रा. त्रि. पाटणकर.
आपलें राष्ट्रीय सरकार १
'मनमोहन'
युगायुगाचे सहप्रवासी २
श्री० रा. वि. फडतरे.
तिसरी झेप ३
'रमातनय'
ज्ञान आणि विज्ञान १
'रामतनय'
प्रमिलाबेन ४
श्री० रमाकांत वेलदे.
भूक ४
प्रो० नांदापूरकर.
मायबोलीची कहाणी १॥
सौ० शांता शेळके.
वर्षा २
सौ० मालतीबाई दांडेकर.
आकर्षक संसार ४
श्री० का. न. केळकर.
शमीपूजन ५
श्री० अरविंद गोखले.
जन्मखुणा २॥
श्री० ना. सी. फडके.
अंजलि ६
श्री० कुलकर्णी.
नागरनीति ४
श्री० नणदीकर.
सोव्हिएत बालकथा ॥।
श्री० ग. वि. अकोलकर.
रशियांतील विद्यामंदिर ३॥
श्री० ल. नी. छापेकर.
उसना मेवा ५॥
श्री० य. गो. जोशी.
साहित्यिकांची सफर १॥
आचार्य अत्रे.
अत्रे उवाच २
डॉ. सहस्त्रबुद्धे.
डोळ्यांचें आरोग्य ।=

पाने ११६
दा नं ८८९१४
कि -३.५०

## आमचीं आगामी प्रकाशनें

**श्री० वि. स. खांडेकर.**
विसावें शतक
सुवर्ण मध्य
मी मनुष्य आहें

**श्री० सानेगुरुजी.**
बेंजामिन फ्रँकलीन
शशिकुमार घोष

**श्री० द. र. कवठेकर.**
हा आमचा संसार !
विनंति विशेष
गुन्हा
श्री
साडेतीनशे रुपये

**श्री० चिं. वि. जोशी.**
आमचापण गांव
संशयाचें जाळें

**श्री० ग. त्र्यं. मांडखोलकर.**
भंगलेलें देऊळ ( ति. आ. )

**श्री० वि. वि. बोकील.**
विजयी वसंत
अरविंद शेख महंमद

**श्री० ना. धों. ताम्हनकर.**
कोळशाची भट्टी
तो
जानबा तुकाराम

**श्री० अरविंद गोखले.**
शाल
समाधान
प्रतिभाचिन्ह

**श्री० पु. भा. भावे**
सतरावें वर्ष

**श्री० ना. सी. राजूरकर**
व्यवसाय- साधन

**श्री० गोपिनाथ तळवलकर.**
आनंद भुवन
शांतिनिकेतन
उद्यांचे आधार

**श्री० ह. भा. वाबोलीकर.**
गुप्त खजिना
गोकुळ

**श्री० ना. ह. आपटे.**
कोणी एक प्राध्यापक !

**श्री० य. गो. जोशी.**
हात ग काऊ
जाई–जुई

**श्री० कुसुमाग्रज.**
कल्पनेच्या तीरावर

**श्री० दत्तू बांदेकर.**
आंवळ्यांची मोट

**श्री० प्र. के. अत्रे.**
कावड

**श्री० बा. भ. बोरकर.**
भावीण

**कै. प्रेमचंद.**
मंदिर

**A. L. Bhagwat**
Read Your Own Palm

**खालिल जिब्रान.**
तुटलेले पंख